❊ प्रकरण ५ वे ❊

# ग्रेस यांच्या कवितेची भाषा आणि ग्रेस यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी

## ❋ प्रकरण पाचवे ❋

## ग्रेस यांच्या कवितेची भाषा आणि ग्रेस यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी

ग्रेस यांच्या कवितेची भाषा, नाविन्यपूर्ण शब्दयोजना आणि ग्रेस यांच्या कवितेतील प्रतिमा यांचा अभ्यास करणे व विवेचन करणे.

ग्रेस यांच्या कवितेवरील प्रभाव आणि ग्रेस यांचा मराठी कवितेवरील प्रभाव यांचा अभ्यास करणे.

प्रबंधिकेच्या या ५ व्या प्रकरणात आपणास कवी ग्रेस यांच्या 'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या दोन काव्यसंग्रहातील कवितांच्या अनुषंगाने ग्रेस यांची भाषाशैली, शब्दकळा, शब्दजाणीव या बाबी अभ्यासवयाच्या आहेत.

या दोन कविता संग्रहातील कवितातून येणाऱ्या अद्‌भूत आणि अमर्याद प्रतिमा सृष्टीचे स्थूलमानाने वर्गीकरण करून त्या प्रतिमांचे स्वरूप अभ्यासावयाचे आहे. ग्रेस यांची चित्रांप्रमाणे आकर्षण अशी प्रतिमायोजना जाणून घ्यावयाची आहे.

याच प्रकरणात आपणास ग्रेस यांच्या कवितातून व्यक्त होणारी दुःख जाणीव आणि त्यांचे काव्यनिर्मिती विषयक विचार जाणून घ्यावयाचे आहेत.

ग्रेस यांच्या काव्यनिर्मितीचे श्रेष्ठपण त्यांच्या शब्दकळेत सामावले आहे. अत्यंत समृद्ध, देखणी, लाघवी आणि मोहक अशी ग्रेस यांची शब्दकळा आहे. भाषेची ही समृद्धी, झळाळी आणि ताजे टवटवीत प्रसन्न उन्मेष साठोत्तरी कवितेत केवळ ग्रेस यांच्याच कवितेत आढळतात. प्रचंड मोठ्या शब्दभांडारातून नेमके पैलूदार शब्द निवडून ते भावाशयाच्या अभिव्यक्तीसाठी आकर्षकपणे मांडण्याचे कौशल्य ग्रेस यांच्या भाषाशैलीत आहे. ग्रेस यांच्या शब्दसिद्धीबद्दल त्र्यं. वि. सरदेशमुख म्हणतात, "शब्द वेचण्याचे, गुंफण्याचे व सांधण्याचे चातुर्य, विशेष आकर्षक असूनही ग्रेस यांची कविता अखेर चित्रलिपी प्रमाणे होते. पु. शि. रेग्यांचे कवितांनी ग्रेस यांची शब्दसिद्धी व रचनापद्धती प्रभावित झाली आहे. पण रेग्यांच्या कविताविषयक इतर विचार त्यांनी आपलेसे मानलेले दिसत नाहीत. त्यामुळे स्वतःची आशय घनता त्यांनी गमावली नाही."[१]

ग्रेस यांच्या भाषेचा दर्जेदार गुण म्हणजे तिची आशय घनता होय. कमालीचे शब्दलाघव असलेली अर्थकाहूर कविता ग्रेस यांच्या भाषाप्रभुत्वाचा परिचय

करून देते. समृद्ध शब्दभांडाराचे ग्रेस हे श्रीमंत, कुबेर आहेत. काव्यनिर्मिती करताना ग्रेस यांना या शब्दसंपत्तीचा जबरदस्त मोह होतो. आणि हा मोहच काही वेळा त्यांच्या कवितेचा दुर्गुण होऊनबसतो. या संदर्भात त्र्यं. वि. सरदेशमुख लिहितात, ''ग्रेस यांची कविता शब्दपिसेपण वैभावाने मिरवते. पिसेपण या शब्दाचा गैरअर्थ न व्हावा. अंत:करणातील भावकल्लोळाला, बुद्धीच्या ज्वरावस्थेला आणि चेतनेच्या ताणवेदनेला मुक्तद्वार देण्यासाठी शब्दांची (उपमा-रूपकांची) बिनदिक्कत उधळमाधळ होते. स्पर्शकाहूर शीलालेख, 'प्राक्तनगंधी मोती', 'प्रलयभरला कंठ', 'शिशिरभिजली हाक', 'दु:खसावळी मिथिला', 'व्योमव्याकुळ अंधार' यासारख्या शब्दप्रयोगाकडे पाहिले, त्यांचा नादार्थ ऐकला आणि त्यात गोठवलेली भावचेतना जाणवली म्हणजे ग्रेस यांच्या शब्दपिसेपणातील गूढता कायम राहूनही आश्चर्य नाहीसे होते. कारण कवितेच्या या जातीच्या नवेपणाला फार प्राचीन परंपरा आहे हे आपल्याला कळून चुकलेले असते''.[२]

ग्रेस यांची भाषा त्यांची स्वत:ची पृथगात्म शैली विकसित करते. विशेषण-विशेष्याच्या नव्या जोड्या, नवी शब्दजोडणी, नवे संकेत, नव्या जाणीवा, नवी प्रतीके, चपखल शब्दाचा प्रसरणशील प्रयोग, अभिनव कल्पना आणि प्रतिन्यास वापरण्याच्या कौशल्यामुळे ग्रेस यांच्या शब्दकळेवर रसिक वाचक मोहित होतो. त्यांच्या सुंदरतम मोहमयी भाषेमुळे त्यांच्या कवितेतील दोषांचा विसर पडतो. शब्दांचे गारूड ग्रेस अशा तऱ्हेने करतात की, वाचक मंत्रमुग्ध होऊन आशयाचे भान विसरून जातो. ग्रेस यांची स्वतंत्र व वेगळी शब्दजोडणी, शब्दप्रयोग त्यादृष्टीने उदाहरणादाखल देता येतील.

| | |
|---|---|
| राघववेळ | शिल्पभरले |
| गंधगार | प्रलय भरला |
| छायावेळ | मरणफुले |
| हिमकंपित | सशिल्प दु:ख |
| दिशांचा जोग | प्रहरवेळ |
| सागरतंद्री | हंसगीत |
| हिमभारी | मृण्मयी धूळ |
| शुभ्र फुलांची ज्वाला | प्रलयगंध |

घनभारी

कैवल्यपूर्ण

मरणगंध

स्पर्श गांधार

पारदर्शक मरण

हिममंद

शिल्पउदास

व्योमव्याकुळ

अक्षम्य स्तन

दिगंतपार लय

स्पर्शकाहूर

गर्भगंधारी

पृथ्विबिंब

सलिलसंभ्रम

ख्रिस्तव्याकुळ

सागरवेळा

प्राणगहन

बर्फउत्सव

संध्याकाळच्या कविता

चंद्रव्याकुळ

नेत्रप्रारंभ

घनवसंत

पळसपेटला

अंधारकृष्ण

रक्तसमर्पण

अरण्यमधुर

अस्तित्वमयूर

गौळण भरला

सशिल्पधर

समुद्रभर

ऊन कावळा

हळद्फुले

प्रश्नचूर लाज

प्राणभरती

रंगनदी

पाशवी प्रकाश

अंगकोवळा

विश्वप्रतारक किंकाळी

रंगभोर डहाळी

आत्मवैराण

स्पर्शप्रारंभी प्रारब्ध

चरित्रस्पंदन

अश्ववाही रंग

चंद्रशिल्प

निष्पर्ण आकाश

रक्तारक्ताचे पहारे

दुःखद नक्षी

रक्तगुंफा

सांजभोर वेणा

रंग तारणी

प्राणगर्भ खिन्नता

चंद्रकुळातील पक्षी

आकाश भाकिते

अभय करूण

विजव्याकुळ

घनचकित

चंद्रकंच मोगरी

हळद फेडणी

चंद्रमाधवीचे प्रदेश

ग्रेस यांच्या कवितेतून काही नवीन संकल्पना, नवीन क्रिया दर्शविणारी क्रियापदे येतात. उदा.

पाठीवर आकाश सुजणे.

अस्थिंचे झुंबर फुटणे.

चंद्र मरून पडणे.

दु:खाचा बहर पिकणे.

बर्फधुळीचे उत्सव भरणे.

क्षितिजाने सावली पांघरणे.

पारिजाताचे वणवे उत्कर्षाने पेटणे.

बर्फाच्या थडग्यांची आरास कोसळणे.

संध्याकाळच्या कविता

पाण्यावर चंद्रखुणांची निळी सावली वेल येणे.

रक्तगंधाचे दिवे लावणे.

बाहुलीच्या शोकात नगरीचा आत्मा रडणे.

आईने पान्हा दळणे.

डोळ्यांना जाळीदार मोत्यांची सरणे सजणे.

विवस्त्र वाद्यांचे सूर निनादणे.

संभोगाच्या प्रज्ञावंत हिऱ्यांची झळाळी चमकणे.

मळवट भरली मिठी मारणे.

फाटली चोळी देवचाफ्याने शिवणे.

पाऊलपणाचा डोळा लागणे.

चैत्रवनात हंसगीत विझणे.

नर्तकीचा अंधार खोली भरून वाहणे.

आरसा दु:खाने पोपटी होणे.

वृक्षांनी नगर सोडणे.

चंद्रमाधवीचे प्रदेश

ग्रेस यांच्या प्रतिभापातळीवरील प्रतिमाविश्वातील अनुभूतीचा आविष्कार करण्यासाठी त्यांनी निर्माण केलेली ही नवी अनोखी विशेषणे-विशेष्याची जोडणी, अननुभूत नवीन क्रियापदे, नवी शब्द जोडणी, नवे समास, नव्या कल्पना, प्रतिन्यासात्मक शब्द वाचकांना कवितेच्या मोहात पाडतात. ग्रेस यांचे वाचक या त्यांच्या शब्दकलेच्या सौंदर्यावर लुब्ध होतात. ग्रेस यांची शब्दकला नादमधुर, लयबद्ध, संगीताकर्षी आहे. संगीताचे आकर्षणच ग्रेस यांच्या कवितेला गेय बनविते. तर हृदयनाथ मंगेशकरांच्या सारख्या सिद्धहस्त संगीतकाराला मोहविते.

ग्रेस यांची ही स्वयंसिद्ध भाषाशैली कवितेचा आशय गुंफते. अनुभूतीचे संक्रमण करणाऱ्यांना निसर्गातील अनुभूतीचे घटक बनून जाते. ग्रेस यांची शब्दशक्ती सुंदर 'गॅलरी' सजविते. आत्मशोध आणि जीवनशोध घेताना या प्रतिमाविश्वाची नेत्रसुखद सहल रसिकांना सुखावते.

# ग्रेस यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी

मराठी कवितेमध्ये ग्रेस यांची कविता स्पष्टपणे वेगळी आणि लक्ष वेधून घेणारी आहे. ग्रेस यांच्या कवितेचे वेगळेपण जसे त्यांच्या भाषासौंदर्यातून जाणवते तसेच त्यांच्या आगळ्या वेगळ्या, विस्मयचकित करणाऱ्या, अनंत प्रतिमासृष्टीमुळेही जाणवते. त्यांची प्रतिमासृष्टी वैविध्यतेने नटलेली आणि अभिनव आहे. आजपर्यंतच्या परंपरागत प्रतिमांपेक्षा ग्रेस यांच्या प्रतिमा पृथक आणि अनोख्या आहेत. अनेक प्रतीक प्रतिमांच्या योजनेद्वारे ग्रेस अर्थाभिव्यक्ती करताना दिसतात. प्रतिकाद्वारे एकच एक अर्थ सूचित होत असतो. तो अर्थ प्रामुख्याने वस्तुनिष्ठ, स्थलनिष्ठ अशा स्वरूपाचा असतो. पण प्रतिमांच्या बाबत मात्र असे असत नाही. प्रतिमा या अत्यंत बहुआयामी, विविधार्थसूची अशा स्वरूपाच्या असतात. ग्रेस यांच्या कवितेत जेव्हा जेव्हा आणि ज्या ज्या ठिकाणी एखादी प्रतिमा (उदा. घोडा, आई, कावळा इ.) येते तेव्हा तेव्हा आणि त्या त्या ठिकाणी ती एकाहून अधिक अर्थ सूचित करणारी असते. सामान्यत: आपण व्यंजनेतून जो अर्थ व्यक्त करू पाहतो तोच अर्थ प्रतिमांतून व्यक्त होत असतो. म्हणून ग्रेस यांच्या कवितांबाबत तरी प्रतिकांपेद्वा प्रतिमांचाच आणि त्यातून साकार होणाऱ्या प्रतिमासृष्टीचाच शोध आणि वेध घेणे सयुक्तिक आहे असे वाटते.

ग्रेस यांच्या प्रतिमासृष्टीवरून असे लक्षात येते की, त्यात विविधता आहे. प्राणी, पक्षी इ. प्रतिमांबरोबरच ग्रेस पौराणिक संदर्भ, दंतकथांचे संदर्भ असणाऱ्या स्त्री-पुरूष, घटना, वस्तु, आयुधे यांच्याही प्रतिमा उपयोजतात. रामायण, महाभारत ही महाकाव्य ग्रेस यांच्या अनेक प्रतिमांचे उगमस्थान ठरली आहेत. पाश्चिमात्य वाङ्मय, ख्रिश्चनिटी, इस्लामच्या प्रार्थना, संतवाङ्मय ग्रेस यांच्या प्रतिमासृष्टीचे स्त्रोत ठरले आहे. 'स्त्री' संकल्पनेतून निर्माण होणाऱ्या सर्व प्रतिमा-प्रतिकांचा आणि नातेसंबंधाचा शोध ग्रेस आपल्या कवितातून घेतात.

ग्रेस यांच्या कवितेत सातत्याने येणाऱ्या प्रतिमांचे कवितानुसार वर्गीकरण स्थूलमानाने पुढीलप्रमाणे होईल. परंतु स्त्री-प्रतिमा आणि पक्षी, प्राणी यांच्या प्रतिमा या सर्वच कवितातून अनेक रूपांनी, अनेक ठिकाणी सातत्याने भेटत असल्याने त्यांच्या वर्गीकरणात कवितांच्या शीर्षकांचे तपशील दिले नाहीत.

## स्त्री प्रतिमा

ग्रेस यांच्या कवितांमध्ये आणि त्यांच्या जीवनामध्येही त्यांच्या भावविश्वातील 'स्त्री' चे ठिकाण अत्युच्च आहे. त्यांच्या प्रतिभारूपाचा प्रथम साक्षात्कार घडविणारी स्त्रीच आहे. त्यांच्या कवितातून 'स्त्री' प्रतिमा अनंत रूपांनी भेटते, ती रूपे पौराणिक, देशी, विदेशी, काल्पनिक, ऐतिहासिक आणि देशस्थलकालसंदर्भातीत आहे. अशा या 'स्त्री' प्रतिमा आपण पाहू.

| | | |
|---|---|---|
| आई | नारायणी | जाईबाई |
| कमळण | गीता रॉय | जाऊबाई |
| उल्का | मीनाक्षी | माय |
| राधा | मिथिला | रांड |
| वृद्धा | दुःखसावली | गंगा |
| मिथिला | कुंती | वेडी |
| राधा | वैरीण | चंद्रमाधवी |
| निर्मला | नागवी स्त्री | बडबडणारी बाई |
| सीता | पोरी | विधवा |
| मैथिली | बकुळा | एकटी |
| गांधारी | बाहुली | चार बाया |
| संयोगिनी | राधा | मथुरा |
| कुंती | बाई | मुली |
| पोर | जलवंती | सखी |
| गर्भ गांधारी | माई | एमिली |
| इन्ग्रिड बर्गमन | संध्यामाई | विधवेची पोर |
| अॅना फ्रँक | मथुरा | गरती |
| आई | मुक्ताई | सवतीची पोर |
| ऊर्मिला | गर्भवती | साजणी |

| | | |
|---|---|---|
| निर्झरिणी | अप्सरा | गौळण |
| पोरी | माऊली | नवरी |
| शांता | जान्हवी | देवकी |
| नववधू | वैष्णवी | भूमिकन्या |
| निष्कासिनी | ॲना | मानसकन्या |
| सती | जोगीण | उष्टावली पोर |
| मरलिन मेन्रो | इनोसंन्ट एलिस | अंध विधवा |
| चित्रबंदिनी | मधुवंती | उदासिनी |
| व्याकुळा | सखी | सती |
| द्रौपदी | नर्तकी | देवकी |
| बाई | जलवंती | राणी |
| सखये | मानिनी | गर्भवती |
| माझी विधवा | हडळ | गांधारी |
| वैदेही | मिथिला (नगरी) | श्यामला |
| अहिल्या | जानकी | शिला |
| कौशल्या | सुमित्रा | शबरी |
| द्वारका (नगरी) | मीनाक्षी | |

## स्तन प्रतिमा


| कविता | कवितासंग्रहाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| रंग | संध्याकाळच्या कविता | २७ |
| श्रावण | संध्याकाळच्या कविता | २७ |
| शिल्प | संध्याकाळच्या कविता | ५० |
| वॉर्ड नं. ६ ऑर्थोपिडिक्स | संध्याकाळच्या कविता | ७२ |
| उर्मिलेच्या कविता | संध्याकाळच्या कविता | ७५ |

| | | |
|---|---|---|
| बर्फाच्या कविता | संध्याकाळच्या कविता | ७८ |
| फुलांचे दिवे | चंद्रमाधवीचे प्रदेश | ६ |
| राखण | चंद्रमाधवीचे प्रदेश | ११ |
| राधा पार्थसारथी | चंद्रमाधवीचे प्रदेश | १२ |
| आई : २ | चंद्रमाधवीचे प्रदेश | ३८ |
| सत्य | चंद्रमाधवीचे प्रदेश | ४७ |
| गावातल्या आठवणी | चंद्रमाधवीचे प्रदेश | ४९ |
| गर्व | चंद्रमाधवीचे प्रदेश | ६० |
| दूध | चंद्रमाधवीचे प्रदेश | ६९ |
| बहर | चंद्रमाधवीचे प्रदेश | ८८ |
| नभ | चंद्रमाधवीचे प्रदेश | ९७ |
| उखाणा | चंद्रमाधवीचे प्रदेश | ९३ |
| तू नाचत जाशी पोरी | चंद्रमाधवीचे प्रदेश | ९६ |
| पाणी : २ | चंद्रमाधवीचे प्रदेश | १०८ |
| ऊन : २ | चंद्रमाधवीचे प्रदेश | ११२ |
| चंद्रमाधवीच्या कविता : २ | चंद्रमाधवीचे प्रदेश | ११९ |
| चंद्र | चंद्रमाधवीचे प्रदेश | १४९ |
| चुडे | चंद्रमाधवीचे प्रदेश | १५० |
| सखी | चंद्रमाधवीचे प्रदेश | १५४ |
| जलवंती | चंद्रमाधवीचे प्रदेश | १७२ |
| छाया | चंद्रमाधवीचे प्रदेश | १७४ |
| कावळा | चंद्रमाधवीचे प्रदेश | १७६ |

| | | |
|---|---|---|
| घोडा | चंद्रमाधवीचे प्रदेश | १८४ |
| धर्मांतराच्या प्रार्थना | चंद्रमाधवीचे प्रदेश | १९५ |

## 'घोडा' प्रतिमा

| कविता | कवितासंग्रहाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| घोडे | संध्याकाळच्या कविता | ६१ |
| घोडे | चंद्रमाधवीचे प्रदेश | २५ |
| काळा घोडेस्वार | चंद्रमाधवीचे प्रदेश | ५१ |
| दुरावा | चंद्रमाधवीचे प्रदेश | ६७ |
| दुसरा घोडा | चंद्रमाधवीचे प्रदेश | ६८ |
| पाषाणाचे घोडे | चंद्रमाधवीचे प्रदेश | ८७ |
| घोडे | चंद्रमाधवीचे प्रदेश | १८४ |

## 'कावळा' प्रतिमा

| कविता | कवितासंग्रहाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| कावळ्याचा रंग | संध्याकाळच्या कविता | ३६ |
| ऊन कावळा | चंद्रमाधवीचे प्रदेश | १०१ |
| कावळे | चंद्रमाधवीचे प्रदेश | १७५ |
| कावळा | चंद्रमाधवीचे प्रदेश | १७६ |
| कावळे उडाले स्वामी | चंद्रमाधवीचे प्रदेश | १७७ |

## 'पक्षी', 'प्राणी' यांच्या प्रतिमा

कावळा या पक्ष्याचे स्वतंत्र स्थान ग्रेस यांच्या कवितेत असल्याने त्या प्रतिमेचा वेगळा गट केला आहे. तरीही ग्रेस यांच्या कवितेतून विविध पक्ष्यांच्या, प्राण्यांच्या प्रतिमा अनेक अर्थांनी येतात. त्याचे स्थूल वर्गीकरण पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| ससा | पांढरे हत्ती | हरीण |
| गाय | गुरांचा कळप | गायीचे डोळे |

| | | |
|---|---|---|
| मासा | गाय | घोडा |
| वासरे | उंदीर | मांजर |
| राजहंस | सुतारपक्षी | पक्ष्यांचा थवा |
| बगळ्यांची माळ | पक्षी | पाखरे |
| कावळे | ऊनकावळा | शोकातली पाखरे |
| चिमणी | मोर | राघू |
| मैना | पंखमोडली मैना | घार |
| घुबड | पारवा | बगळे |

## स्त्री-प्रतिमा

'स्त्री' ही प्रतिमा पु. शि. रेगेंच्या नंतर आधिक्याने आणि रेग्यांच्यापेक्षाही वैविध्यपूर्णतेने मांडणारे कवी म्हणजे ग्रेस होत. ग्रेस यांनी स्त्री-प्रतिमा सर्वार्थाने सर्व पातळीवर उपयोजिली दिसते. त्यांचे भावविश्व व्यापूनही स्त्री-प्रतिमा दशांगुळे वर उरलेली आहे. या सर्व स्त्री-प्रतिमांचे प्रतिनिधित्व ग्रेस यांची 'आई' करते असे ते आपल्या मुलाखतीत सांगतात. त्या मुलाखतीचा थोडासा अंश पुढीलप्रमाणे -

''आई एकतर सृजनांचे प्रतिक, मातृत्वाचे प्रतीक, वात्सलयाचे प्रतीक अशा सांस्कृतिक अर्थाचे अवतरण घेऊनच आतापर्यंत मराठी काव्यात अवतरली आहे. माझी आई तशी नाही. शी स्टॅन्डस् इन माय पोएट्री अँज ए सुप्रीम सिम्बॉल ऑफ एंटायर वुमनहुड जशी ती स्त्री या संकल्पनेची प्रतिनिधी आहे त्याचप्रमाणे ती 'स्त्री'तून निर्माण होणाऱ्या सर्व नात्यांचीही प्रतिनिधी आहे. म्हणून ए वुमन इज नॉट माय प्रॉब्लेम, शी इज माय डेस्टिनेशन''.[४]

ग्रेस यांच्या या वक्तव्यातूनच त्यांची 'स्त्री-प्रतिमा' उलगडण्यास मदत होते. ग्रेस यांच्या कवितातून ललित लेखनातून अगणित स्त्री-प्रतिमा भेटतात. त्यांचे सांकेतिक अर्थ ही तितकेच अगणित आणि प्रस्थापित विचारांना धक्का देणारे आढळतात.

लौकिक नात्यातील सर्व नात्यांबरोबर पुराणातील 'स्त्री-प्रतिमा' भूतप्रेत सृष्टीतील 'स्त्री-प्रतिमा' अनेक वयाच्या स्त्री-प्रतिमा भेटतात. अनेक रूपातून, अनेक रूपाच्या, भेटतात. बालिकेपासून वृद्धेपर्यंत, आईपासून प्रेयसीपर्यंत, पापिणीपासून देवीपर्यंत, आदिवासी स्त्रीपासून नर्सपर्यंत सर्वच्या सर्व स्त्री रूपे ग्रेस कवितेतून चित्रित करतात. त्यांच्या सर्व प्रतिमांच्या तुलनेने 'स्त्री-प्रतिमांची' संख्या सर्वाधिक आहे. मी तर जरा धाडसानेच असे म्हणेन की 'स्त्री' ची इतकी विविध आणि असंख्य रूपे प्रतिमासृष्टीतूनच निर्माण करून ती कवितातून चितारणारे साठोत्तर कवींपैकी ग्रेस हे एकमेव कवी आहेत.

स्त्री देहाचे संदर्भ त्यांच्या कवितेत येतात. स्त्रियांची मैत्री हे सुद्धा त्यांच्या 'स्त्री' चा शोध घेण्याचे कारण असावे. कारण डॉ. अक्षयकुमार काळेंना दिलेल्या मुलाखती ते म्हणतात, ''स्त्रियांची मैत्री हे माझ्या भावविश्वाचे अतिशय उंच ठिकाण आहे. माझ्या आईच्या व्यक्तित्वातील ज्या ज्या अस्थिशैलीचे (म्हणजे काय ?) मला ज्या ज्या स्त्रीत मला

अंशरूप दर्शन घडते, त्या त्या स्त्रीकडे मी प्रतिभेच्या पातळीवर खेचला जातो. इन ए वे दॅअ इज व्हेअर आय गॉट माय फीडबॅक''.[५]

म्हणूनच स्त्री देहाचे अखंड दर्शन, चिंतन त्यांच्या मनाच्या एका कोपऱ्यात सतत चालू असते असे वाटते. त्यांच्या अनेक कविता स्त्रीमुखातूनच अनुभव व्यक्त करणाऱ्या आहेत.

इथलीच कमळण
इथलीच टिंबे
पाण्यामध्ये -
फुटली बिंबे.

इथलीच उल्का
आषाढ बनात
मावळतीची -
राधा उन्हात.

(सं. क. 'आषाढ बन' पृष्ठ १०).

या कवितेतील लौकिक, अलौकिकाच्या पातळीवरून स्त्रीप्रतिमा आलेल्या दिसतात. लौकिकातील कमळण, परविश्वातील उल्का आणि आषाढ बनातील मावळतीच्या उन्हात उभी असलेली पुराणातील राधा अशा स्त्री-प्रतिमा भेटतात. त्यांच्या कवितातून 'सखी', 'प्रियतमा' ठायी ठायी भेटते. कधी ती उत्कट संभोगाची आठवण सांगताना म्हणते,

स्तनावर माझ्या
जांभळाची झाक
ओली आणभाक
आठवते

(सं. क. 'रंग', पृष्ठ ११)

तर कधी हळूच मऊ सशाचा उखाणा टाकताना 'उखाणा' कवितेत भेटते. (सं. क. 'रंग', पृष्ठ ११).

ग्रेसना आपली भातुकलीच्या खेळातील बालमैत्रीणही भेटते आणि ओंजळीने चांदणे भरून, पाचूचा गिलावा करून घरासाठी चंद्राची झालर लावताना ते तिला साथ देतात.

विरहव्याकुळ प्रेयसी 'राघववेळ' या कवितेत म्हणते,
उशालगतच्या गंधगार रात्रीत
गुरफटलेले क्षितीज दूर ढकललेस
आणि बुडून गेलास . . . .

(सं. क. 'राघववेळ', पृष्ठ १३).

'ओळख' या कवितेतील प्रियतमा तुटलेली ओळख विणू पहाते, आणि पदराखालील स्तनातून पाझरणारे वात्सल्य व्याकुळ होता होता तिच्या प्राणांची वाणी फुटते. या कवितेतील 'स्त्री' ही प्रियतमा आणि आई या दोन्ही रूपांनी अवतरलेली दिसते.

'हळवी' या कवितेत डोंगरझाडीतून डोक्यावरून लाकडाची मोळी घेऊन येणारी देखणी आदिवासी स्त्री कवीची प्रियतमा आहे. अंगसंगाच्या अनुभवातून गेल्यानंतर ती भावुक, हळवी, आनंदी होऊन, हलकी हलकी होऊन मृदूबंधातून धावत सुटली आहे. शृंगाराच्या अंगासंगाच्या अनुभवाचे सूचन येथे कवीने खूप देखण्या शब्दात केले आहे.

'स्त्री' ही निर्मितीचे प्रतीक असल्यामुळे तिच्याकडे ग्रेस अत्यंत आदराने, कौतुकाने, हळवेपणाने पाहताना दिसतात.

रित्या मुठीत झाकला
शुक्र प्रभेचा अनंत
स्पर्शास्पर्शात गोंदले
स्वप्न राधेचे हिवाळी

(सं. क. 'पहाट', पृष्ठ १६).

येथे 'राधा' ही आशावादाचे प्रतीक म्हणून आली आहे असे वाटते. अनंत प्रभेचा शुक्र तिच्या मुठीत झाकला आहे. तो आशावादच आहे.

'स्त्री' ला सोडून जाणे हा अनुभव 'राघववेळ' प्रमाणेच 'पाऊले' या कवितेतील स्त्री ही सांगताना दिसते. शृंगाराचा भर बहरात येत असतानाच अचानक प्रियकर भाद्रपदातील लहरी मेघाप्रमाणे निघून जातो, असे या कवितेतील विरहिणी व्याकुळतेने सांगताना दिसते. (सं. क. 'पाऊले', पृष्ठ १८).

'काच' या कवितेतील स्त्री वनवासी असून तिला घर खुणावताना दिसते,० तर 'मोहर' या कवितेतील स्त्रीचे मोहर निळे आहे. आणि चोळीत वात्सल्य तळमळत आहे. 'भगवंत' या कवितेतील स्त्री रात्रीच्या निद्रेचा जोग उधळून, अधोमुख, होऊन प्रियकराच्या भेटीसाठी वाट पहात आहे. तर कधी काळी सखीच्या सहवासातील आठवणी काढीत कवी निर्मळेचा चेहरा 'निर्मळा' या कवितेतून पाहताना दिसतो.

'डोळे' कवितेतील 'स्त्री' खूपच धीट आणि समर्पित झालेली प्रेमिका आहे असे वाटते.

एक सांज अशी

तिचा रंग जरा लाल

माझ्या कपाळाला

तिच्या धुळीचा गुलाल.

(सं. क. 'डोळे', पृष्ठ २७).

'दुपार' ही वेगळी दिवसावस्था असलेली आणखी एक कविता होय. एकटे विवर्त नभ आणि तप्त हवा अशावेळी -

'उन्हात जणु मैथिली तुजसि शोधिते राघवा . . . .'

(सं. क. 'दुपार', पृष्ठ २८).

सीतेसाठी येणारी ही प्रतिमा कवीची प्रेयसी आहे. तिच्याकडे कवी 'अमल दु:खाचा जोगवा' मागतो आहे. असे म्हणून ती प्रियकराशी देहमिलन होऊन शृंगाराच्या लाल-गुलाली रंगाची उधळण सांगते तर दुसऱ्या कडव्यात त्याही पेक्षा धीट होऊन कोण्या एका रात्री प्रियकराशी केलेल्या विपरीत संगाची आठवण सीतेचा पौराणिक संदर्भ देऊन सांगते. येथे कवी ग्रेस यांच्या मुलाखतीचा संदर्भ दिसल्यास ते अधिक स्पष्ट होईल. ते

म्हणतात, ''ओघानेच माझी पुरूषार्थाची व्याख्याही बदलते. स्त्रीला विभिन्न पातळ्यावर समजून घेणे हाच मला पुरूषार्थ वाटतो. (परमार्थाने मी स्वत:ला शाक्त म्हणून घेतो)''.[६]

'नदीच्या काठी' या कवितेत निसर्गवर्णन असूनही शेवटच्या चार ओळीत संध्याकाळचे वर्णन येताना गंधारीची प्रतिमा येते. डोळ्यावर पट्टी बांधलेली गांधारीची नेत्रकमळे नदीत गळतात -

पुढे स्वप्नांधांच्या धुळीत कसला गंध मिसळे
जशी गांधारीची नदित गळती नेत्रकमळे.

(सं. क. 'नदीच्या काळी', पृष्ठ ४०).

तर 'हळदीचे हात' या कवितेत 'कुंती' ची प्रतिमा येते.

तृष्णेच्या पहिल्या फुलास गिळतो माकंद ओठातला
कर्णाच्या घनतेत की वितळतो संभोग कुंतीतला . . . .

(सं. क. 'हळदीचे हात', पृष्ठ ४३).

कुंतीचे कुमारी मातृत्व आणि कर्णजन्म याकडे केवळ 'संभोग' म्हणूनच कवी पाहतो. कारण कर्ण हे तिचे पहिले 'अपत्य' म्हणजे 'तृष्णेचे पहिले फूल' अशा अर्थाने कर्ण तिच्या सूर्यसंभोगाचे परिणामस्वरूप फलित आहे.

राधा, गांधारी, कुंती अशा पौराणिक संदर्भामुळे ग्रेस यांची कविता 'देशी' आणि 'आपली' वाटते.

'संयोगिनी' कवितेत 'स्त्री'चा विशिष्ठ नामोल्लेख नसला तरीही स्त्री प्रतिमा भेटत रहाते. अनाथ तुटल्या नदीच्या तीरावर सूर्य मावळत असताना प्रियतमेच्या अंगसंगासाठी उत्सुक असणारा प्रियकर तिच्यामध्ये तनामनात भिनल्या नंतरही 'अर्धा चंद्र उरे . . .' असे तिला म्हणतो. ती प्रियतमा तर 'नभवाहिनी' आहे. जसे,

तुझ्यात नभवाहिनी कुठुन रक्त गंधावले
अनाथ तुटल्या तिरी विझत सूर्य की मावळे
शरीर विणले कुणी अतुट फाटली वासना
तुझ्यात भिनल्यावरी फिरून चंद्र अर्धा उरे

(सं. क. 'संयोगिनी', पृष्ठ ४२).

शेवटच्या चार ओळीतून 'आई' ची नादमय वात्सल्यपूर्ण प्रतिमा भेटते. गायीच्या भुलून हंबरण्याने ती व्यक्त झाली आहे.

तसा सहज नाचतो कधि न बांधिली पैंजणे
जशा धुळितल्या दिशा भुलुन गाय जी हंबरे
(सं. क. 'संयोगिनी', पृष्ठ ४२).

'शाप' कवितेत घनांच्या शिखरामधून तुटणारी चांदणी कवीला 'साजणीच्या मळवटभरल्या केसावरले फूल' वाटते. तर 'सायंकाळी कातरवेळी त्याने मूकपणाने उभे रहाणे' हा त्याला सतीने दिलेला शाप वाटतो.

उभ्या घनांच्या शिखरामध्ये तुटे जशी चांदणी
मळवट भरल्या केसांवरचे फूल जसे साजणी
(सं. क. 'शाप', पृष्ठ ४६).

'वाराणसी' कवितेतील 'स्त्री-प्रतिमा' सजलेली विराट आणि आर्त अशी आहे.

सजून मन भाविनी दिसशी हंसगीतापरी
विराट तननिर्मळा बघत आर्त वाराणसी . . . .
(सं. क. 'वाराणसी', पृष्ठ ४६).

'साजण' कवितेतील स्त्री सजणी असूनही तिने तिच्या साजणापुढे जाऊनये असे कवीला वाटते. कारण त्याने यात्रेत भेटल्या कोण्या पोरीला आभाळाचे बाहू दिले आहेत. आणि तो साजण आता अंधारात बिनहाताचा उभा आहे. त्या पोरीने जीव दिला तरीही, त्याने वाहत्या पाण्याचे पैंजण सजणीसाठी आणलेय. यातील दोन 'स्त्रिया' साजणाच्या जीवनात आल्या आहेत. पण त्यांच्या स्वतंत्र भूमिका स्पष्ट होत नाहीत. 'वाहत्या पाण्याच्या पैंजणामुळे' अर्थाला वेगेच वळण लागते, पण ते वळण कळत मात्र नाही.

'गांधारी' ही पौराणिक स्त्री प्रतिमा छंद या कवितेत आईच्या रूपात भेटताना दिसते.

पायात अडकले पाय
जशी की माय

गर्भ गांधारी

रोखिला कुणीं गे

छंद असा लयकारी

(सं. क. 'छंद', पृष्ठ ५२).

ग्रेस यांना अपघातातुळे इलाजासाठी हॉस्पिटलमध्ये रहावे लागले होते. पण त्या वास्तव्यातही त्यांचे कवीमन सतत प्रतिभा विश्वातच रममाण झालेले होते. त्या काळातील कवितातून त्यांच्या स्त्री-प्रतिमा तत्कालीन वातावरणाशी संबंधित असलेल्या दिसून येतात.

गीता रॉयचे गीत ऐकताना त्यांना तिचा आवाज 'चाकूचे झळझळते रेशमी पाते' वाटतो.

तर दवाखान्यातील विविध अनुभावामुळे नजरेसमोर तरळणाऱ्या चित्रप्रतिबिंबाना तोलून धरणारी 'केरळी नर्स' दिसते. या नर्सचे स्तन त्यांना मीनाक्षी मंदीरासारखे वाटतात. (सं. क. 'वॉर्ड नं. ६ ऑर्थोपिडिक', पृष्ठ ७२).

कवी ग्रेस 'स्त्री' मुखातून कविता सांगताना शृंगाराचा उत्कट अनुभव व्यक्त करताना दिसतात. देहमिलनाचे संपूर्ण लहान मोठे तपशील देखण्या शब्दकळेतून ते देताना दिसतात. ती स्त्रीच आपला प्रेमानुभव सांगत आहे असे वाटत रहाते इतक्या त्या कविता 'स्त्रीनिष्ठ' आहेत. उदा. रंग, उखाणा, राघववेळ, हळवी, पाऊले, डोळे, जन्म, संग, चांदणे (सं. क.) मातृबनातल्या सावल्या, उखाणे, चाफा, कहाणी, बहर, चंद्रमाधवीच्या तीन कविता : २, चंद्र, घात (चंद्रमाधवीचे प्रदेश) या कवितातील स्त्रिया कमालीच्या हळव्या, 'स्त्री'त्वाचे उत्तम भान असणाऱ्या, समृद्ध भावविश्व असलेल्या आणि तरल संवेदनाशील आहेत. शृंगारानुभव, वात्सल्य, प्रेम असे सर्वच अनुभव नितळपणे सांगताना दिसतात. अर्थात, कवी म्हणून याचे सर्व श्रेय ग्रेस यांचेच आहे. तरीही हे अनुभव सरळ, सुबोध नसून त्यातही व्यामिश्रता आणि आणि वासनेचे सर्वस्पर्शित्व जाणवत रहाते. एकाच कवितेत एकच अनुभव सलगपणे स्त्री सांगत नाही तर त्यात स्त्रीच्या अनेक भावनांचे मिश्रण झालेले दिसते.

'इन्ग्रिड बर्गमन' ही हॉलिवूडमधील अभिनेत्री. 'इन ऑफ दि सिक्स्थ हॅपिनेस' या बोलपटातील एका भावमुद्रेत ग्रेस यांनी पाहिली आणि त्यांना त्यांच्या

प्रतिभारूपाचा पहिला साक्षात्कार झाला. 'अ वीक इन द स्प्रिंग रेन' या चित्रपटात त्यांनी तिला शेवटचे पाहिले. तिचा मृत्यू विसरणे त्यांना अशक्य आहे. या 'स्त्री'शी प्रत्यक्षात कधी भेट झाली नाही तरीही ग्रेस यांच्या भावविश्वात ती एक महत्त्वाचे स्थान मिळवून गेली आहे. 'अ वीक इन द स्प्रिंग रेन' या चित्रपटात ''वसंतऋतूमधील पावसाळ्यात एका संताला दिलेले आलिंगन'' कवी कधीच विसरू शकत नाही. त्यातून ज्या भावोर्मी दाटून आल्या त्यातूनच ग्रेस यांनी तिच्यासाठी 'इन्ग्रिड बर्गमन' कविता लिहिली असावी. तिला सर्वात शेवटी पाहिलेल्या चित्रपटातील अलिंगन त्यांच्या आणखी एका कवितेतून वेदनामयी शब्दातून प्रकट झाले आहे.

द्यावेसे वाटते या यातनांच्या वैकुंठात
केरळी माडांना अलिंगन
कळांचा सर्वस्पर्शी ऑर्केस्ट्रा मेंदूच्या काचेवर
इन्ग्रिड बर्गमनची आसवात वाहणारी
प्रतिमा रचून जातो.

(सं. क. 'वॉर्ड नं. ६ ऑर्थोपिडिक', पृष्ठ ७२)

इन्ग्रिड बर्गमनची अभिजात आठवण कवीला ओव्हरकोट घालून स्मशानाकडे जाताना दिसते. बर्गमनचे मरण कवीला मरणयातना देऊन गेले आहे. सतत प्रतिभा-पातळीवर भास-आभासाच्या आणि वास्तवाच्या सीमाप्रदेशात वावरताना अनेक सत्य आणि काल्पनिक व्यक्ती ग्रेस यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनून राहिल्या आहेत. त्यातील इन्ग्रिड बर्गमनप्रमाणेच सर्व पौराणिक स्त्रिया आणि मर्लिन मेन्रो इ. आहेत.

इन्ग्रिड बर्गमनच्या आठवणींचा आणि 'घोडा' या प्रतिमेचा कविमनात निश्चित काहीतरी कार्यकारण संबंध आहे, म्हणूनच इन्ग्रिड बर्गमनच्या दोन्ही कवितातून 'घोडा' हा उल्लेख आलेला आहे.

कवीचे स्त्रीविषयक भावभावनांचे विश्व अनेक संवेदनांनी, जाणिवांनी गुंतागुंतीचे झाल्याचे वाटते. त्यामुळेच केवळ एकाच कवितेत अनेक संवेदनांचे प्रतिनिधित्व घेऊन 'स्त्री' अवतरताना दिसते. 'उजेडाचा पक्षी' या कवितेत भरल्या कुशीची गंभीर स्त्री, खेळात दंग झालेल्या पोरी, आंधळी अभिसारिका अशी स्त्री रूपे भेटतात, तर शेवटच्या चार ओळींमधून 'बकुळीची कथा' या शब्दातून बकुळा अप्रत्यक्षपणे भेटते. जसे,

सांग, बकुळीची कथा

अश्रु भरून जरासा

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'उजेडाचा पक्षी', पृष्ठ ८).

स्त्रीच्या उत्कट अंगसंगाचा अनुभव निसर्गाच्या पार्श्वभूमीवर सांगताना कवी 'राधा' ही प्रतिमा योजतो. ही राधा त्याची प्रियतमाच आहे. पण एवढ्यावरच हे संपत नाही तर या 'राधेचा' त्या पौराणिक कृष्णाच्या 'राधेशी' संबंध आहे. म्हणून तर कवीने शीर्षकच 'राधा पार्थसारथी' म्हणजे 'राधा-कृष्ण' असे दिले आहे. या कवितेला कवीच्या खाजगी शृंगारानुभावाचा जेवढा जवळचा संदर्भ आहे तेवढाच जवळचा संदर्भ पौराणिक कृष्ण-राधा यांच्याही शृंगाराचा आहे. अशा व्यक्तिगत आणि पौराणिक, दोन्ही पातळीवर ही कविता शृंगाराचा अत्यंत उत्कट अनुभव व्यक्त करताना दिसते.

'माई' या कवितेप्रमाणेच 'माई' हा ललितनिबंध 'चर्चबेल' मध्येही आहे (पृष्ठ ११२) 'माई' ही स्त्री कवीच्या नित्य परिचयाची असावी. 'कावळा' ही प्रतिमा माईंच्या भाव आंदोलनाच्या संबंधात आलेली आहे.

संध्याकाळचा धूसर काळ या कवितेत माईचे कातर, संभ्रमित मन सूचित करताना दिसतो. 'माई' ही स्त्री प्रतिमा प्रत्यक्षात असावी असे वाटते.

माईंच्या हातातील अस्थिकलश आणि

संधिप्रकाशात त्यांनी उभी केलेली पालखी

अजूनही उभी आहे आमच्या घरात.

(चं. प्र., 'माई', पृष्ठ २०).

'संध्यामाई' ही स्त्री प्रतिमा निसर्गरूपाने अवतरलेली दिसते. संध्याकाळ म्हणजे 'संध्यामाई'. आई कवीपासून दूर गेली असली तरीही तिच्याच वात्सल्याने संध्याकाळ कवीला जवळ घेते. 'संध्याकाळ' ही कवीला आपुलकी, मातृप्रेम देणारी आहे.

'भूपाळी' कवितेत पौराणिक नगरीचा उल्लेखही स्त्रीप्रतिमा म्हणूनच येतो. 'मथुरा' ही कृष्णकाळातली राजधानी, पण येथे ती 'उन्हाची मथुरा' म्हणून येते.

हा पिवळा शेला
आज तुला अभिसारा
घे गंध फुलांचा
जशी उन्हाची मथुरा

(चं. प्र., 'भूपाळी', पृष्ठ २२).

कृष्णाचा पिवळा शेला आज अभिसारासाठी प्रियतमेला दिला आहे. त्यावेळी फुलांचा गंध उन्हाच्या मथुरेप्रमाणे घे, असे कवी म्हणतो. उन्ह आणि मथुरा यांचा परस्परसंबंध, त्या दोन्हींचा फुलांच्या गंधाशी संबंध काय आणि कसा असा तर्कविचार येथे निरूपयोगी ठरतो. कारण हा तर्कातीत अनुभव केवळ कवीचाच असल्याने तो आकलन होत नाही.

'नर्तकी' कवितेत नर्तकीच्या नृत्याचे वर्णन येताना दिसते. पण शेवटच्या कडव्यात 'कुंती' ही पौराणिक स्त्री प्रतिमा येते.

दूरात माझी ढळे कृष्ण छाया
जसा कर्ण कुंतीत सामावला.

(चं. प्र., 'नर्तकी', पृष्ठ २४).

बाहुली मधील 'खुळी', सनई मधील 'गर्भवती मोगरी', उखाणे मधील 'निर्झरिणी', सारणीचे राणी, जाईबाई, या स्त्रीप्रतिमा तुटकतुटक अर्थसंघटना व्यक्त करताना दिसतात. (चं. प्र., पृष्ठ २६, २७, २८).

'जाऊबाई' ही ग्रेस यांची कविता 'दुर्बोध' म्हणून गाजलेली आहे. यातील चिमणीची जाऊबाई, माय मेली तरी रडे न येणे, जाऊबाई कुठेतरी जाणे, कोठार फोडणे, रांडेचे शिवार, चिमणीच्या मागे येणे, चिमणीच्या जाऊबाईचे कारटे,चिमणीच्या चोचीत जाऊबाईचीचोच, जाऊबाईचा शेजेला जाच, चिमणीच्या जाऊबाईने ओठाला पुरणे, दुष्ट चिमणी, जाऊबाईचे रडणे, चिमणी रूसणे, जाऊबाईने जाता जाता पदरात हसणे, आणि जाऊबाईने जात्यात पाचोळा दळणे. या सगळ्या क्रिया-प्रतिक्रियांचा घटितांचा सलग असा अर्थ लागत नाही 'चिमणी कशाचे प्रतीक ?' आणि तिच्या जाऊबाई आणि ती यांच्यातील मनोव्यापाराचे ताणतणाव कसे आणि का निर्माण होतात ? आणि जाऊबाई 'पाचोळा दळते' म्हणजे नेमके काय करते ? . . . यातून नेमकी कोणतीही अर्थसंघटना तयार होत नाही.

क्रियांचे, शब्दांचे अर्थ समजणे म्हणजे कविता समजणे असे नसते तर कवितातील प्रतिमांची भाषा विशिष्ट 'अर्थनिवेदक' असते. ती कळली तरच कवितेतील अर्थसंघटना उमजते. पण या कवितेतून ती जाणवत नाही. तुटक खंडित अनुभव असूनी त्यातून एकात्मता नाही.

पौराणिक स्त्री द्रौपदी ही 'आई : १' कवितेत सत्याच्या रूपाने येते.

हे रक्त वाढतानाही
मज आता गहिवर नाही
वस्त्रांत द्रौपदीच्याही
तो कृष्ण नागडा होता.

(चं. प्र., 'आई : १', पृष्ठ ३७).

अंतिम सत्य 'नागडेच असते' याचा साक्षात्कार येण्यासाठी कवीला द्रौपदी वस्त्रहरणाची आठवण येते. 'आई गेली' हे सत्य स्वीकारण्यास मन तयार नाही पण ते 'नग्नसत्य' आहे हे ही कवीला कळले आहे. म्हणून तो आता 'गहिवरत' नाही. द्रौपदीला वस्त्रे पुरविणारा कृष्ण तिच्या वस्त्रातही 'नागडाच' होता. हे अंतिम सत्य कवी सांगताना 'दृष्टीआड सगळे नागवेच असते' ह्याच उक्तीचा प्रत्यय येतो.

चंद्रमाधवीचे प्रदेश ही शीर्षक कविता, 'आई', आईच्याच रूपातली प्रियतमा, निर्मितीचा प्रदेश आणि निर्मितीनाशाचाही प्रदेश अशा व्यामिश्र अनुभवांना घेऊन येते. खरेतर इथे स्त्री नावाचा प्रदेश आहे. त्या स्त्री चे नाव 'चंद्रमाधवी' आहे.

चंद्रमाधवीच्या तीन कविता १, २, ३ या कवितातून 'श्यामला' ही मूकधरणीचे प्रतीक म्हणून येते.

'मूक ही धरा उभी अजाण दग्धश्यामला'

(चं. प्र., पृष्ठ ४१).

तर चंद्रमाधवीच्या तीन कविता : २ मध्ये भावजयांची प्रतिमा अप्रत्यक्षपणे स्पष्टत: सूचित झाली आहे.

'गळ्यात सांज थर्थरे नि दीर अंगणी उभा'

(चं. प्र., पृष्ठ ११९).

तर चंद्रमाधवीच्या तीन कविता : ३ मध्ये कवीच्या मनातील सखी भेटते. ती समीरगंध बावरी आहे. देखणी मादक आहे म्हणूनच ग्रेस म्हणतात.

केस मोकळे तरी समीरगंध बावरी
नाचते जशी जळात चंद्रकंच मोगरी

(चं. प्र., पृष्ठ १९०).

काळा घोडेस्वार कवितेत 'गोरी मुलगी' भेटते. या मुलीला नेण्यासाठी काळा घोडेस्वार येतो. या कवितेतील 'गोरी मुलगी' ही व्यामिश्र अनुभवांच्या संदर्भातून येत रहाते. उखाण्याच्या स्वरूपात ही कविता वाटते.

'संध्याराणी', 'गर्भार परी', 'जारिणी', 'कुँवारी' या स्त्री-प्रतिमा 'उडी' या कवितेत भेटताना कवी म्हणतो.

पारिजाताहुनी गूढ देठ भगव्या रंगाचा
संध्याराणीच्या ओटीत मेघ गर्भार परीचा
कोऱ्या सावलीने केले थंउ जारिणीचे अंग
जरी पावसाची सर झेले कुंवारीचा भांग

(चं. प्र., 'उडी', पृष्ठ ५८).

'पिंजरा' कवितेत शोकाच्या नगरीतुनी परतणारी देखणी बाहुली भेटते तर 'गर्व' कवितेत 'चंद्रासाठी रूसणारी पोर' दिसते तर

५९ 'पिंजरा' कवितेत 'शोकाच्या नगरीतुनी परतणारी देखणी बाई'. - पृष्ठ ५९.

६० 'गर्व' कवितेत 'चंद्रासाठी रूसणारी पोर'.

६७ 'दुरावा' कवितेत 'संध्याकाळच्या वेळी सखी'.

६९ 'दूध' कवितेत 'सांगातिणी'.

७० 'केशर' कवितेत 'आई'.

७१ 'पारवा' कवितेत 'उन्हात स्नान घालता न रडणारी देवकी'.

७८ 'पावसाच्या सरी' कवितेत 'मायलेकी, विधवेची पोर'.

७९ 'उखाणे' कवितेत 'सवतीची पोर, रांड, न्हालेली पोर'.

९० ‘फुले’ कवितेत ‘रामाची ओली मिथिला’.

९१ ‘उदयास्त’ कवितेत ‘गगनगोपी, बहरव्याकुळा श्यामला’.

९३ ‘उखाणा’ कवितेत ‘अप्सरा’.

९४ ‘शरीर माझे तुडुंब’ कवितेत ‘राधा’.

९६ ‘तू नाचत जाशी पोरी’ कवितेत ‘नाचत जाणारी पोर’.

१०१ ‘ऊन कावळा’ कवितेत ‘जानकी’.

१०२ ‘हिमसंध्या’ कवितेत ‘देवकी’.

१०७ ‘पाणी : २’ कवितेत ‘ती भूमिकन्या’.

१०९ ‘वर्षा’ कवितेत ‘निष्कासिनी’.

११७ ‘कै. ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी’ कवितेत ‘ॲना, मर्लिन मेन्रो’.

१२७ ‘प्रार्थना’ कवितेत ‘व्याभिचार करणारी जागीण आणि दारोदार हिंडणारी उष्टावलेली पोर’.

१३७ ‘दोन’ कवितेत ‘दोन मलूल वेश्या’.

१५० ‘चुडे’ कवितेत ‘जोगीण’ आणि ‘जळणारी सती’.

१५१ ‘गणगोत’ कवितेत ‘उर्मिला’.

१५४ ‘सखी’ कवितेत ‘आभाळातून जाणारी, तिमिरात उभी असलेली दुखियारी, चितेवर जळणारी सखी’.

१५८ ‘द्रौपदी’ कवितेत ‘द्रौपदी’.

१९६ ‘धर्मांतराच्या प्रार्थना’ कवितेत ‘आदिवासी स्त्री, दिवस भरलेली सखी, पायावर प्राण सोडणाऱ्या साजणी, थकलेली मानिनी, डोळ्यात काजळ भरून घेणारी गर्भवती, प्रार्थना म्हणणारी उत्तरा, चिचवनाला आग लावणारी सुमित्रा’.

अशा अनेकविध स्त्री-प्रतिमा भेटतात. प्रत्येक स्त्री केवळ एकाच भूमिकेतून न येता ती अनेक रूपातून येताना दिसते. या प्रतिमा कमालीच्या वैविध्यपूर्ण आहेत. पण व्यामिश्र आणि जटिल असे अनुभवविश्व साकार करतात.

## 'आई' प्रतिमा

ग्रेस यांची प्रतिमासृष्टी पाहता ती कमालीची विलक्षण, वैविध्यपूर्ण आणि विस्मयपूर्ण आहे. परंपरागत काव्यप्रतिमा त्यांच्या कवितेतून येत असल्यातरी त्यांची स्वतंत्र अशी एक अनवट प्रतिमासृष्टी आहे. यात 'वास्तव' आणि 'भास-आभासता' यांच्या सीमा स्पष्टपणे रेखांकित करता येत नाहीत. 'सत्य' आणि 'स्वप्न' यांच्या मर्यादाही या कवीच्या प्रतिमाविश्वात, धूसर आणि परस्परात मिसळलेल्या दिसतात. सृजनशीलता, जीवनरहस्याचा शोध, आत्मशोध आणि भयांकित मन या सर्वातून त्यांची प्रतिमासृष्टी निर्माण झाली आहे. आपल्या प्रतिमांबद्दल ग्रेस म्हणतात, ''वासनेच्या शारीर अध्यात्माचे सूचन, काव्यावतरणाचे सृजन आणि आयुष्यभोगाची करूणा या त्रिवेणीभोवतीच गरगरणारी माझी प्रतिभा सतत विश्वविघटन चक्राचे केंद्र शोधीत फिरते. तिथे मला माझी आई, माझी सखी, माझी सती, माझी गंगा, माझी सीता या स्त्री-प्रतिमा भेटतात''.[७]

ग्रेस यांच्या प्रतिमा विश्वातील 'आई' ही अशी अनंतरूपी आहे. 'आई' ही ग्रेस यांच्या संपूर्ण भावविश्वाला व्यापून गेली आहे. ज्या एका युगानुयुगाच्या परंपरागत भावनांच्या, संस्काराच्या पातळीवर आईचा विचार होतो, त्यापेक्षा वेगळ्या भावनेने आणि दृष्टीकोनाने ग्रेस 'आई' या संकल्पनेकडे पाहताना दिसतात. त्यामुळे ग्रेस यांच्या कवितातून 'आई' ही प्रतिमा अनेक प्रतिकांचे, भावनांचे प्रतिनिधित्व करताना दिसते. याबाबत ग्रेस म्हणतात, ''आई एकतर सृजनाचे प्रतीक-मातृत्वाचे प्रतीक-वात्सल्याचे प्रतीक अशा सांस्कृतिक अर्थाचे अवतरण घेऊनच मराठी काव्यात अवतरली आहे. माझी 'आई' तशी नाही. शी स्टॅन्डस् इन् माय पोएट्री ॲज अ सुप्रीम सिम्बॉल ऑफ वुमनहुड''.

फ्रॉइडने जो 'मदर फिक्सेशनचा' सिद्धांत मांडला आहे त्यातही माझ्या आईची प्रतिमा चपखलपणे बसू शकत नाही. जशी ती 'स्त्री' या संकल्पनेची प्रतिनिधी आहे त्याचप्रमाणे ती 'स्त्री'तून निर्माण होणाऱ्या सर्व नात्यांचीही प्रतिनिधी आहे. माझी कविता ही संपूर्णपणे असांकेतिक असण्याचे कारण हे आहे. माझी आई - माझी प्रेयसी, माझी आई - माझ्या सुखदु:खाचे चिन्ह. माझी आई - माझ्या वासनांचे स्मृतीरूप जागरण. माझी आई - स्त्री देहाच्या शक्तीचे अंतिम भयाण केंद्र, माझी आई - माझे क्रौर्य आणि माझी आई - माझी करूणा''.[८]

ग्रेस यांच्या या वक्तव्यातूनच त्यांच्या भावविश्वातील, प्रतिमासृष्टीतील आईचे असाधारण स्थान लक्षात येते. 'स्त्री'ची अनेक रूपे धारण करणारी आई; सर्व भल्या-बुऱ्या भावनांचे सादरीकरण करताना आपणास दिसते. ग्रेस यांची सख्खी आई सुमित्रा. तिच्याविषयी त्यांना वाटणारे अपार प्रेम, आकर्षण त्यांच्या कवितातून दिसून येते. आईचा सडसडीत, चाफेगौर देह त्यांनी पाहिला. 'चर्चबेल' मध्ये ग्रेस म्हणतात, ''माझ्या गाठीशी आईच्या आठवणी फार नाहीत. अगदी थोड्या आहेत. तिच्या वैराण मायेचे जे काही देणे मला लाभले आहे, त्यात माझी तहान मिनारावरून उतरणाऱ्या घारीसारखी कोरडी ठणठणीतच राहिली. बालपणात माझ्या आईच्या वाट्याला आलेली पाशवी क्रौर्याची उध्वस्त गुंफा तिने बिनबोभाट माझ्या अंगावर ढकलून दिली. ते आईचे देणे मी निमूटपणे स्विकारले. माझी आई अतिशय देखणी होती''.[९]

''आईवडिलांचा एकांत मी पाहिला. माझी आई वैशाख उन्हात आली ! सगळीकडे मरणाची शांतता पसरली होती. तिचा सडसडीत चाफेगौर देह संभोगातून संचिताची हुलकावणी देऊन निसटून गेलेल्या वैशाखदिप्तीच्या सूर्यफुलाची करूणा भाकू लागला !''[१०]

''कधी माझ्या आईने मला प्रेमाने जवळ घेतले नाही की अंगाईत खडीसाखर पेरली नाही. यासंबंधी माझी तक्रार नाही. केवळ अभिव्यक्तीची तऱ्हा बदलली म्हणून तेवढ्याने आदिम प्रेरणांचे पिसाट अधिष्ठान ढळत नाही''.[११]

ग्रेस यांच्या मनातील 'आई', 'वात्सल्य' यांच्या आदिम प्रेरणांचे अधिष्ठान अढळ आहे. म्हणूनच आईचे वात्सल्य त्यांना उतरत्या क्रमाने मिळाले तरीही 'आई' त्यांना प्रिय आहे. तिचा वियोग त्यांना उदास, दु:खचूर करून गेला आहे. ग्रेस यांचे वेगळेपण यातच दडले आहे.

'डोळे सताड उघडे असले की वाटेल ते दृश्य मनाच्या माहेरी येऊन जाते' या त्यांच्या चर्चबेल मधील वाक्याचा आधार घेऊन असे म्हणता येईल की कोणतेही दृश्य त्यांच्या भास-आभासाच्या भावविश्वात निर्माण होऊन ते काव्यसाकार होते म्हणून वात्सल्याने हंबरणाऱ्या गाईची कविता निर्माण होते, तर कधी

पानांच्या जाळीमधले
वाऱ्यांचे कुंडल हुलते,
ओठांची मिथिला ल्याया
पदरातून नभ व्याकुळते.

(सं. क., 'ओळख', पृष्ठ १४).

'पदरातून नभ व्याकुळते' या शब्दरूपात आईची प्रतिमा साकारते. झरझरणे, झिरपणे, सलणे, पाझरणे, व्याकुळ होणे, तळमळणे, हंबरणे या सर्व क्रिया ग्रेस यांच्या कवितातून, वात्सल्याशी, मायेशी पर्यायाने 'आई'शी सहजगत्या जुळल्या जातात. अंधार निनादत येताना गांधारच आळवते. गगनासारखे निळे माहेर असणारी 'स्त्री' म्हणजे 'आईच' असते म्हणून तर तिच्या चोळीत तिच्या तान्हुल्यासाठी दुधाचा थेंब तळमळतो. म्हणूनच 'मोहर' कवितेत ग्रेस म्हणतात -

चाफ्याच्या झाडपाशी
अंधार जसा गंधार निनादत येतो
मोहर निळे कोणाचे . . . .
चोळीत दुधाचा थेंब जसा तळमळतो.

(सं. क., 'मोहर', पृष्ठ २२).

पण निनादात येणारा 'गांधार' आणि 'तळमळणारा दुधाचा थेंब' यांची तुलना दु:खी असूनही भावणारी आहे.

ग्रेस यांचे आईविषयीचे 'भावविश्व' हे केवळ त्यांच्या वैयक्तिक पातळीवर न रहाता ते 'विश्वव्यापी' झाले आहे. विश्वातील चराचराला 'आई' हवी आहे. आईचा वियोग सोसावा लागतो आहे म्हणूनच वाऱ्याला सुद्धा आईने गायिलेली 'अंगाई' हवी आहे.

हवी असते वाऱ्यालाही इतक्यात अंगाई
म्हणून मांडतो मी ही, कमळांच्या पानावर
टिंबाचा खेळ . . . .
तुला निजवण्यासाठी सांगितलेली एक कथा.

(सं. क., 'अंगाईपण', पृष्ठ ५७).

निसर्गातील वाऱ्याला आईची अंगाई हवी असते. ही कल्पनाच रसिकांना एकदम व्यापकवृत्तीची बनवून जाते. मानवी पातळीवरील मानवी विश्वात, मानवी आई या चाकोरीतील पारंपारिक विचारांच्या क्षितीज मर्यादेपलिकडे निसर्गातील, निसर्ग विश्वातील 'नैसर्गिक आई' ही आईची भव्य, उदात्त, ब्रह्मांड व्यापणारी प्रतिमा केवळ ग्रेसच्याच कवितेत भेटते. निळ्या मोहराहून येणारी आई 'माहेर' कवितेत भेटते तर वाऱ्याला अंगाई गाणारी आईही ग्रेस यांच्याच कवितेत भेटते. कमळांच्या पानावर टिंबाचा खेळ कवी मांडतो पण आई मुलाला मायेने झोपवताना जशी बालकथा सांगते तसाच हा टिंबांचा खेळ आहे.

'मातृवियोग' हे ग्रेस यांचे महान दु:ख आहे. 'आईचा वियोग' ही त्यांच्या दु:खाची गंगोत्री, जन्मोत्री आहे. त्यांच्या कवितेतून ह्या दु:खाचा सखोल प्रवाह वाहताना दिसतो. आईची आठवण, आईची प्रतिक्षा, आईची अपेक्षा, आईची कूस, आईची मिठी, आईची मांडी या सगळ्याची आठवण, स्मृतीउदासी आणि तहान त्यांच्या कवितेतून सलताना दिसते. वाचकांना अंतर्मुख करताना हळुवार बनवते. 'सतत आईची प्रतिक्षा करणारे लहान मुलाचे डोळे' हा ग्रेस यांचा स्वानुभाव आहे. आई लहानपणी त्यांना सोडून घरातून बाहेर पडत असे. रात्रीही जात असे. म्हणूनच,

त्याला ठेऊन एकटा
अशी उठले घाईने

(चंद्रमाधवीचे प्रदेश, पृष्ठ ७).

किंवा

दार वाजेल म्हणून
त्याला टाळले शब्दात

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'प्रदेश', पृष्ठ ७).

मुलाला न सांगता रात्री बाहेर जाणाऱ्या आईची वाट कवी पाहतोय आणि अखेरीस,

आई नसलेल्या पोरासारखे हे माझे
शहाणे डोळे, हलकेच सोडून देतो
नदीच्या प्रवाहात . . . .

(सं. क., 'वाट', पृष्ठ ६२).

हे आईचे असूनही नसणे किती कारूण्यमय आहे. ही बालमनाची आईसाठीची तगमग हृद्‌य हेलावणारी आहे. पण तरीही हा मुलगा - कवी शहाणा आहे. तो आईच्या 'जाण्याविषयी' तक्रार करीत नाही. तर आपली प्रतीक्षाच नदीच्या प्रवाहात सोडून देतो. प्रतीक्षा संपत नाही पण प्रवाहित होऊन वाहू लागते.

ही जीवघेणी बालमनाची अवस्था वाचकाला अस्वस्थ करून टाकते. ही व्यथा अखेरीस कवी पुन्हा त्यांच्या आईलाच सांगतो आहे. आईच्या स्मृती उदास प्रतीक्षावेदनेच्या शृंखलात जखडलेला कवी आईलाच विनवितो आहे.

मी इथे व्यथालयात

दु:ख सांगतो तुला

घे मला कुशीत आज

पावलात शृंखला.

(सं. क., 'आसवात पापणी', पृष्ठ ६८).

आईला 'कुशीत घे' म्हणून सांगतानाही कवीच्या मनात एक गोष्ट सतत घर करून आहे ती म्हणजे त्याला हव्या त्या वेळेस त्याची आई त्याला हवी तेवढी कधीच वाट्याला आली नाही.

परतून कधीही न आल्या

वेळेवर माझ्या जाई . . . .

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'गावातल्या आठवणी', पृष्ठ ४९).

आईबद्दलची बालमनाची तक्रारही कवीने कवितेने कवितेत सुंदरपणे नोंदवली आहे.

रंगीत खेळणी माझी

ही दे ना मज खेळाया

इवल्याशा बाळमुठीतून

घे काढून अपुली काया.

बाळ रंगीत खेळण्याशी खेळताना त्याची आई त्यांच्या सोबतच असणे स्वाभाविक आहे नव्हे असतेच. रंगीत खेळण्याशी खेळताना भावनिक, बौद्धिक, मानसिक, शारीरिक पातळीवरून बालमनाचा आणि आईचा सुसंवाद प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जाणीवांच्या अदृश्य देवाण-घेवाणीतून, स्पर्शाच्या भाषा माध्यमातून सुरूच असतो. खेळण्याचा आकार, प्रकार, रंग, वैशिष्ट्य आणि बालविश्वातील त्याचे रूप-स्वरूप याबाबतही विचार-स्पंदने निनादत असतात. पोपटाचे खेळणे असेल तर आई त्याल 'मिठू-मिठू' असे बोलून दाखवेल. पोपटी रंगाचे नाव घेऊन बाळाशी बोबडे बोलेल. बाळ मग हसेल, लोभस हातवारे करेल. त्याच्या त्या निष्पाप देहवेलीने आईचे वात्सल्य अधिकच बहरेल. ती आपल्या बाळाला अधिकच प्रेमाने हृदयाशी धरेल. पण कवीच्या बाबतीत हा अनुभव आला नसावा. म्हणून तर -

आईने रंगीत खेळणी खेळायला दिली नाहीतच उलट बाळमुठीतून स्वत:ची काया सोडवून घेऊन ती निघून गेली आणि

माऊलीच्या मागे गेली

अंगाईची कथा . . . .

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'काही धारा माझ्या पोटी', पृष्ठ ९५).

आणि गेलेल्या आईची मरणापर्यंत वाट पहात ते बाळ तळ्यात गात ठेवून पारावर बसून आहे.

मरणपारावर अंगाईची वाट पहात या

बाळगीताचे तळवे झिजून गेलेत.

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'धर्मांतराच्या प्रार्थना', पृष्ठ १९५).

हृदय गलबजून टाकणारा हा कवीचा अनुभव उध्वस्त करणारा, मन ऊसवून टाकणारा उदास करणारा आहे. त्यातील कवीची व्याकुळता, सांद्रकरूण आहे, आर्तता जीवघेणी आहे. कधीतरी चुकून आई वाट्याला आलीच तर ती एखाद्या संध्याकाळसारखी येते. उदास, कातर असलेली. म्हणूनच ग्रेस म्हणतात,

सांज घराला आली
विश्वाची हलवित काया
मांडीवर मी निजलेला
वर तुझी उदासिन माया.

(सं. क., 'सांज', पृष्ठ ७१).

अंगाईत जीव तुझाही
मरताना उजळत नाही.

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'गर्व', पृष्ठ ६०).

'आई'च्या तिच्या मांडीवर हक्काने निजणे ही कवीची आवड, हट्ट आहे. पण त्यावेळीही आई मात्र उदास, दुःखी दिसते. पण आईचे केवळ 'दुःखी स्त्री' नाही तर आईची अनेक रूप कवीला दिसतात. कधी ती 'देवकी' होते. तर कधी 'देऊळ' घेऊन धावणारी आई होते. तर कधी ती 'रूसणारी पोरं' होते. तर कधी ती 'सती' होते. त्यासाठी पुढील कविता पहाता येतील.

नादतात जी उन्हात ती तुझी जोडवी
उन्हात स्नान घालता रडे न माय देवकी

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'पारवा', पृष्ठ ७१).

गंधाला पान्हा फुटला म्हणजे वाटतं
तू देऊळ घेऊन धावत आहेस . . . .
तुमच्या दुधालाच आशीर्वाद आहे
आत्मसमर्पणाचा . . . .

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'हळदफेड', पृष्ठ १४४).

या कवितेत 'देऊळ' घेऊन धावत आहेस या ऐवजी 'देऊळ' होऊन धावत आहेस अशी रचना अधिक योग्य झाली असती. अर्थाला अधिक व्यापकता आणि मांगल्य प्राप्त झाले असते असे वाटत रहाते. 'आई' बालकावर प्रेम करताना हातचे काहीच राखत नाही, तर संपूर्णच सर्वकाही बालकाला देत असते. 'दुग्धपान' करताना केवळ 'दूध पाजणे' एवढीच शारीरिक क्रिया नसते तर हृद्यातील प्रेम, पवित्र वात्सल्य आणि अलौकिक माया ती

दुधाच्या माध्यमातून पाजत असते. हे 'अमृतपान' आत्म्याचा रस बनून बालकाला परिपुष्ट करीत असते. म्हणून कवीने 'आत्मसमर्पणाचा आशीर्वाद' अशी नितांत सुंदर शब्दयोजना केली आहे. 'आईचे' इतके अलौकिक वर्णन मराठी साहित्यात क्वचितच आढळेल. इथे स्वत:च्या आईची व्याख्या कवीने केली नाही तर समग्र विश्वातील 'आई' ही संकल्पनाच व्याख्याबद्ध केली आहे. ग्रेस यांचे शब्दसामर्थ्य इथे कमालीची दाद घेऊन जाते.

कवीच्या मनातली आई कधी 'रूसणारी पोर' होते. तर कधी 'दोन घागरी घेऊन डोहाला जाणारी स्त्री' होते.

निजलेले मूल स्तनाला
रूसलीस कशाला पोरी

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'गर्व', पृष्ठ ६०).

तरूंत बाई
सळसळ होई
दोन घागरी घेऊन गेली
ज्या डोहाला आई

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'केशर', पृष्ठ ७०).

काही अनाकलनीय अशी रूपे घेऊन 'आई' ची प्रतिमा ग्रेस यांच्या कवितातून भेटताना दिसते. उदा.

आई घरी मुलांना वाटून दे उन्हाळा (चं. प्र., 'आईचे गाणे', पृष्ठ ३६).

आई निजे दुपारी उलटी करून शेज (चं. प्र., 'आईचे गाणे', पृष्ठ ३६).

तुझ्या कुशीत बाळ अन् मनात रक्त फाटले (चं. प्र., 'रक्त', पृष्ठ ११५).

निजलेले मूल स्तनाला
रूसलीस कशाला पोरी
अंगाईत जीव तुझाही
मरताना उजळत नाही

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'गर्व', पृष्ठ ६०).

असा खिन्न होतो कशाने सदा मी
तुझ्या यातनांचे मला वैभव
सतीच्या घटांतील पाणी उन्हाचे
तिचे गर्भ प्याले असे ताण्डव.

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'चंद्रमोजणी', पृष्ठ ६१).

कंच भरल्या भितीचा बाळ मागते मुकुट
अंतरंगात भिनली तुटे चांदणी निमूट
कसे लबाड कूळ भूक लागतच नाही
माझ्या वेळीही आई मुठी बांधल्याच नाही.

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'दूध', पृष्ठ ६९).

- मुलांना उन्हाळा वाटून देणारी आई.
- दुपारी उलटी शेज करून निजणारी आई.
- बाळ कुशीत असताना मनात रक्त फाटणारी आई.
- मूल स्तनपान करताना रूसणारी पोर.
- अंगाईत जीव आहे पण मरताना तो उजळत नाही अशी देहाची नवलाई असणारी आई.
- सती असणाऱ्या आईच्या घटातील पाणी उन्हाचे आहे. पण तिच्या गर्भानेही ते उन्हाचे तांडव प्याले आहे. गर्भालाही यातनांचे तांडवरूपी पाणी देणारी आई.
- बाळाच्या मुठी न बांधणारी आई.

या आईच्या विविध रूपांचा शोध कवीच्या प्रतिमा पातळीवरूनच घ्यावा लागेल. आई ही कवीच्या प्रतिमासृष्टीची निर्माती आहे. वास्तव आणि भास-आभासांच्या सीमाप्रदेशात वावरणारी कवीची प्रतिभाच या आईच्या विविध रूपांचे विश्लेषण करू शकते. ''माझी आई भयाण अंधाराची कधीही न संपणारी गुंफा आहे'' असे ग्रेस, अक्षयकुमार काळेंना दिलेल्या मुलाखतीत म्हणतात. पुढे ग्रेस म्हणतात, ''तशी ती आहेच हे उघड आहे पण तिच्या जीवशास्त्रीय संचिताने जे प्रतिभाबल मला मिळाले तिथे कोणता अंधार उभा राहू शकतो ?''.

म्हणजेच भयाण अंधाराच्या कधीही न संपणाऱ्या गुंफेत आईची अनंत रूपे यांच्या प्रतिभेला गवसतात. ती रूपे जितकी परंपरागत सांकेतिक तर्कशुद्ध असतात तितकीच ती अपरंपरागत असांकेतिक आणि तर्कातीत ही असतात. म्हणूनच ग्रेस एके ठिकाणी म्हणतात,

देहावर दु:ख पसरते

संभोगसुखाने आई

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'घर', पृष्ठ, ४८).

ही अतार्किक, असांकेतिक व सर्वसामान्यांना काहीशी विसंगत आणि दुर्बोध वाटणारी प्रतिमा ग्रेस यांच्या प्रतिभापातळीवरूनच पहावी लागते हे मात्र खरे !

आईचा विरह आणि आईन भोगलेले दु:ख दोन्ही कवीला अस्वस्थ करताना दिसते.

पक्षी अनाथ असतो आणि धुक्यात रडतो

निष्पर्ण झाड होता सोडून देश जातो.

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'पक्षी', पृष्ठ ६३).

येथे आईविना अनाथ असलेला कवी 'अनाथपक्षी' ही प्रतिमा योजताना दिसतो. एकाकीपणाची वाट चालताना दिसतो.

घरट्यातल्या पिलांची स्मृती त्या घरटेधारी तरूला आहे. पण पिलांना सोडून जाणाऱ्या पक्ष्याला म्हणजे पित्याला नाही असाही अर्थबोध या ओळीतून होतो. आईच्या वात्सल्याबरोबरच कवी पितृवात्सल्यालाही पारखा झालेला आहे हे ही इथे सूचित होते.

चोचीत वेचलेला फेकून घट्ट चारा . . . .

पक्षी पिलासहीत घरटे सोडून जातो आणि पिल्लांनी मारलेल्या हाका मात्र झडलेल्या पिसांप्रमाणे वाहून गेल्या.

एकटेपणाचे दु:ख, आर्त आक्रोश, आणि आकांताचे दु:ख येथे कवीने शब्दबद्ध केले आहे.

आई निघून गेली, मरण पावली या दोन्ही क्रियांनी जर आईच्या 'जाण्याचा' अर्थ लावला तरीही ग्रेस यांची 'आई - १' ही कविता रसिकांना हळहळायला लावते. कारूण्याचे, एकटेपणाचे विरहाचे आर्तव्याकूळ भाव या कवितेतून चित्रित झाले आहेत.

ती गेली तेव्हा रिमझिम
पाऊस निनादत होता
मेघात मिसळली किरणे
हा सूर्य सोडवित होता
ती आई होती म्हणुनी
घनव्याकुळ मीही रडलो,
त्यावेळी वारा सावध
पाचोळा उडवित होता.

अंगणात गमले मजला
संपले बालपण माझे
खिडकीवर धुरकट तेव्हा
कंदील एकटा होता.

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'आई - १', पृष्ठ ३७).

निसर्गाच्या विशाल उदास पार्श्वभूमीवर अंगणात बालपण संपलेले मूल घन व्याकुळ होऊन रडते हेच चित्र असले तरीही उसवून टाकणारे, घायाळ करणारे, मन उकलून टाकणारे आहे. मातृविरहाचे इतके नेमके चित्रण मराठी काव्यात क्वचितच आढळेल.

आईच्या विरहाचे दु:ख अजर-अमर आहे. चिरंतन आहे. त्या दु:खाने चूर झालेला कवी आईची स्मृती कधी विसरतच नाही. आता त्या स्मृतीचे दु:ख 'ईश्वरी' बनले आहे.

इथे, बुबुळांच्या अंत:पुरात वितळतो आहे
ईश्वरी दु:खाचा गंधवाही अभिषेक;

विस्मृतीच्या स्वप्नांध वळणावर, एखाद्या प्राचीन
शिवालयातील प्रचंड अंधार कोरीत तुझ्याच
पदरातून निनादत यावे, विदग्ध चंद्राचे
अनंत स्तनांकित आकाश.

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'आई - २', पृष्ठ ३८).

आईचे दु:ख ईश्वरी बनून कवीमनात दु:खाचा गंधवाही अभिषेक करीत आहे. पण असे असले तरीही आईचे दु:ख विस्मृतीत जाण्याची कवीमनाची इच्छा मात्र आगळी-वेगळी लोकविलक्षण आहे. हे दु:ख विस्मृतीतही स्वप्नांध न होता गगनरूपी व्हावे असे कवीला वाटते. आईच्या पदराखालील स्तनांतून वात्सल्यरसाचे किरण प्राचीन शिवालयातील अंधार कोरीत यावेत आणि आईच्या स्मृतीला विदग्ध चंद्राच्या अनंत आकाशाचे रूप यावे असे कवीला वाटते. आईला आभाळव्यापी करणारे हे कवीचे मातृप्रेम, मातृआकर्षण आणि तिच्या अस्तित्वाचा अट्टाहास इतका ईश्वरी आणि गगनव्यापी झाला आहे की त्यामुळे कवीच्या उत्तुंग, भव्य, विशाल आणि लोकविलक्षण, प्रतिभाशक्तीने मन थक्क होते.

आईचा विरह, ती दूर अज्ञाताच्या प्रदेशात गेली आहे याची जाणीव असूनही अनंत प्रतीक्षा करणारा कवी दु:खचूर आहे. विरह दु:खाने सैरभैर झाला आहे. पण या अवस्थेतही आईने जे दु:ख सोसले त्याचे त्याला अपार कौतुक वाटते, कदर वाटते. त्याची जाण सतत कवीला आहे. म्हणून आईने भोगलेल्या दु:खाला तो 'यातनांचे वैभव' म्हणतो. आईच्या घरातील पाणी 'उन्हाचे' आहे म्हणजे 'सोसलेले दु:ख' आहे, हा विचार कवीमनात सतत आहे.

## स्तन प्रतिमा

ग्रेस यांच्या कवितातून विविध 'स्त्री' प्रतिमा येतात. त्यातील अनेक प्रतिमा स्पष्ट नामोल्लेख करतात. उदा. राधा, मिथिला, सीता, कुंती, संध्या, गांधारी, संयोगिनी, माधवी, इन्ग्रिड बर्गमन, मर्लिन मेन्रो, देवकी, जानकी तर कधी आई, जाऊबाई, मायलेक, माई अशा या नात्यांच्या संबंधाने येणारे तर कधी अप्सरा, व्याकुळा, नर्तकी, गोरी मुलगी, गर्भार परी गौळण, जोगीण, उष्टावलेली पोर, जळणारी सती, वेश्या, हडळ, गगनगोपी, सवतीची पोर, रांड, न्हालेली पोर, सांगातिणी, सखी, रूसणारी पोर अशाही स्त्रिया येतात. पण याशिवाय ग्रेस यांच्या काही कवितातून कोणताही नामोल्लेख, नातेसंबंध, अथवा, कोणतेही प्रतिनिधित्व न करताही स्त्री ही भेटतच रहाते, तर काही कविता या स्त्रीमुखातूनच आलेल्या. अशा कवितातून स्त्री विविध रूपातून येते आणि दिसते. त्याचे कारण म्हणजे तिच्या अवयवांचे आणि स्त्री देहाचे संदर्भ उदा. नग्न स्त्री देह, तिचे स्तन, ओठ, तिचे आलिंगन, मिटलेली पापणी, अशा संदर्भामुळे कवितेत 'स्त्री'रूप स्पष्ट दिसते. कवीमनात स्त्री देहाचे सतत चिंतन चालू असावे असे वाटते. स्त्रीच्या अंगसंगातील प्रत्येक क्षण आणि प्रत्येक तपशील कवी कवीतातून सांगताना दिसतो. संभोगाच्या आठवणी, त्या अनुभूतीतील मनाची, देहाची स्थिती, कवितातून शब्दबद्ध झालेली आहे.

कवी ग्रेस आपल्या मुलाखतीत म्हणतात,

''अंगसंगाला'' मी लघुमरण म्हणतो. माझी त्रिवेणी आहे -

निर्मिती > मृत्यू > संभोग

संभोग > मृत्यू > निर्मिती''

(ग्रेस : मुलाखत 'ग्रंथमाला' खंड एक अशंय एक, पृष्ठ १३०).

''कवितेतील अनुभूतीचे स्वरूप कळते ते असे -

निर्मिती - मृत्यू - संभोग यांच्या एकजीव संघात'' बट रिमेंबर वन थिंग सर, अबाउट इंटरकोर्स लँग्वेज. द सेक्स इज नोन अॅज डर्टी लँग्वेज बट व्हेन ? व्हेन यू आर आउट ऑफ द ट्रान्स ऑफ सेक्स. फिजिकल इंटरकोर्स मीन्स अ सुप्रिम जॉय, एक्सट्रीम पेन अॅण्ड सिव्हिअर नॉशिया''. (ग्रेस मुलाखत, 'ग्रंथमाला', खंड १, अंश १, पृष्ठ १२९).

यावरून ग्रेस यांचे संभोगाविषयीचे काव्यांतर्गत विचार कळतात. पण याशिवाय स्त्री देहाच्या संदर्भात ग्रेस म्हणतात,

"स्त्री देहाच्या संदर्भात फक्त स्तन, चुंबन व अलिंगन एवढ्या तीनच अवस्थांचे उल्लेख येतात. स्त्रीदेहाच्या इतर तपशीलांचे उल्लेख येत नाहीत. स्त्रीचे सगळ्यात वैभवी आणि दैवी इंद्रिय म्हणजे तिचे स्तन. नंतर तिचे ओठ (माझ्यासाठी वाणीचे प्रतीक) आणि तिचे आलिंगन म्हणजे तिच्या देहाचे वासनिक व करूणासंपन्न पांघरूण".[१२]

ग्रेस यांचे स्त्रीदेहाविषयीचे विचार कळले की त्यांच्या कवितातील स्तन, चुंबन, अलिंगन, यातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष येणाऱ्या स्त्रीदेहाचे संदर्भ उकलत जातात. 'स्तन' हा ग्रेस यांना आवडणारा, पुन्हा पुन्हा येणारा स्त्रीदेंहाचा संदर्भ आहे. ते इंद्रिय त्यांना वैभवी आणि दैवी वाटते. प्रेम आणि वात्सल्य, शृंगार आणि ममत्व अशा भावनांना अभिव्यक्त करताना स्तनांचा उल्लेख येतो.

रंग ही कविता स्त्रीमुखातून आलेला स्त्रीचा अनुभव सांगते आहे. भूतकाळात सख्याशी झालेल्या उत्कट लैंगिक संभोगाची मधाळ आठवण या कवितेतील स्त्री सांगताना म्हणते,

स्तनांवर माझ्या
जांभळाची झाक
ओली आणभाक
आठवते

(सं. क., 'रंग', पृष्ठ ११).

श्रावणाच्या आर्द्र उन्हाच्या दुपारी, एकांतात स्वतःचे जांभळी झाक असलेले स्तन पाहताच, या कवितेतील स्त्रीला तिच्या साजणाची आठवण येते. प्रेमाच्या घेतलेल्या ओल्या आणाभाका आठवत आहेत पूर्वस्मृती चाळवत आहेत.

श्रावण या कवितेत 'निसर्गाचे वर्णन' आले असले तरीही कवीमनात स्त्रीदेहाचे चिंतन सुरूच आहे.

हा श्रावण वाजवि धून
निळे अस्मान

स्तनावर गळले
मन सगुण फुलांच्या
मंद क्षितीजी जडले . . . .

(सं. क., 'श्रावण', पृष्ठ २७).

स्त्रीचे स्तन दैवी आणि वैभवी आहेत त्यामुळे इथे स्तनांवर 'निळे अस्मान' गळले आहे आणि श्रावण धून वाजवित आहे. आणि कवीचे मन सगुण अशा प्रीतीवर जडले आहे. हे सगुण रूप मात्र मंद क्षितीजाप्रमाणे आहे. इथे कवीची सगुण प्रीती दैवी होऊन ती सगुण भक्ती झाल्याचे दिसते.

हे स्तन कवीला कधी चांदण्यातून सरकणारी शिल्पे वाटतात म्हणून कवी म्हणतो,

आणि या विलक्षण नादाचा एक प्रारंभ
एक युग, जशी चांदण्यात सरकणारी
स्तनांच्या कोटीतील शिल्पे . . . .

बर्फाच्या कविता १ आणि ३ मध्ये कवी कामक्रीडेचे वर्णन करतो. पण त्यात दु:खाचा निराशेचा सूर अधिक आहे. इथे कवीने स्तनांना एक दर्जा दिला आहे. कार्य म्हणजे 'उच्चकोटी' अशा अर्थाने जर कवी 'कोटी' हा शब्द उपयोजित असेल तर 'स्तन' हे येथे दर्जा ठरविणारे परिमाणही होऊ शकते. (अर्थातच चांगल्या अर्थाने) फुले मावळतात, हा त्यांचा मृत्यूच होय. सूर्य मावळणे हा ही सूर्याचा रोजचा मृत्यूच. या मृत्यूचा गंध वाहतो आणि सतारीच्या सूरांची मंदीरे त्या मरणगंधाच्या प्रवाहातून वाहताना एक विलक्षण नादाचा प्रारंभ होतो. आणि युग सरकत जाते. हे सरकणारे युग म्हणजे 'चांदण्यात सरकणारी शिल्पे' होत. पण ही शिल्पे कशी आहेत ? . . . . तर 'स्तनांच्या कोटीतील' म्हणजे दैवी आणि वैभवी सौंदर्य असलेली अशी . . . . म्हणूनच इथे शिल्पांचे सौंदर्य वर्णन करताना कवी स्तनांची उपमा त्यांना देत आहे.

'वॉर्ड नं. ६ ऑर्थोपिडिक्स' कवितेमध्ये स्तनांचा संदर्भ येतो. कवीला दवाखान्यातील वास्तव्यात आलेल्या अनुभूतीचे वर्णन या कवितेत आहे. केरळमधील समुद्राचे, माडांच्या बागांचे वर्णन आणि हॉस्पिटलमधील शारीरिक वेदनांचे वर्णन करतानाच

कवीचे जीवन चिंतन आणि स्त्रीदेहाचे चिंतन थांबलेले नाही. या कवितेत कवीला केरळी नर्सचे स्तन 'मीनाक्षी मंदीर' वाटतात. स्तनांचे 'दैवी'पण कवी यातून व्यक्त करतो आहे.

उर्मिलेच्या कविता - २ मध्ये प्रीतीचा उत्कट अनुभव, संभोगसुखाचे सूचन करताना कवीने स्तनांचा उल्लेख काव्यमय कल्पनांनी केला आहे.

साजणाच्या हातानेच सजणीने स्तन गोंदून घेऊन मंदिरी दिवा लागणे. पण त्याचवेळी स्तनांची मायाही तिने सोडणे अशी संमिश्र भावांदोलने कवी व्यक्त करताना दिसतो. शृंगार, पावित्र्य, प्रकाश, आणि वात्सल्य अशा अनेकविध भावना कवीने स्तनाच्या प्रतिभेतून अभिव्यक्त केल्या आहेत.

तुझ्या कुशीतील अक्षम्य स्तनांवरून वाहणारे
चंद्रवाऱ्यांतील बर्फाचे पराग . . . .

(सं. क., 'बर्फाच्या कविता - १', पृष्ठ ७६).

जसे माझे दु:ख सचित्र झालेले . . . .
या कोसळत्या दीपमाळेला टेकून तू तसेच उभे
असावेस, निदान चंद्रमासातील स्तनांची
फुले होईस्तो . . . .

(सं. क., 'बर्फाच्या कविता - २', पृष्ठ ७८).

स्तनांना सुंदर शिल्प समजणे किंवा स्तनांची उपमा सुंदर शिल्पांना देणे कवीला आवडत असावे. म्हणून 'फुलांचे दिवे' कवितेत कवी म्हणतो,

कुठे वाहणारे स्तनांतून पाणी
कुठे रक्तशिल्पातली आसवे
दिले अंग स्पर्शातल्या चांदण्यांनी
तुझ्या अंबराला फुलांचे दिवे.

(चं. प्र., 'फुलांचे दिवे', पृष्ठ ६).

'अश्रू' आणि 'स्तन्य' यांना एकत्र आणून कवीने करूणा आणि वात्सल यांचा 'भावुक मेळ' साधला आहे. पण एवढ्यावरच कवी थांबत नाही तर 'अश्रू' आणि 'स्तन्य' या दोन नद्यांना कामप्रेरणेची एक सरस्वतीही येऊन मिळते आणि इथे यांचा 'त्रिवेणीसंगम' होतो.

'राखण' या कवितेत कवीने स्तनांबद्दल वेगळीच कल्पना मांडली आहे. 'आईचे स्तन' ही कल्पना सांकेतिक, वास्तव आणि रूढार्थाने सर्वमान्य आहेच पण इथे कवी म्हणतो -

दूध पान्ह्यात वाहत्या तुझ्या बाळांच्या स्तनांना
दृष्ट काढत्या वेळेचा मग घालीन उखाणा.

(चं. प्र., 'राखण', पृष्ठ ११).

या ओळीत 'आईचे स्तन' असा संकेत न येता 'बाळाचे स्तन' असा संकेत स्पष्टपणे येतो. 'आईचे स्तन' हे खऱ्या अर्थाने 'बाळाचेच स्तन' असतात. आईचे 'वात्सल्य आणि स्तन्य' यावर सर्वच्या सर्व प्रथम आणि अंतिम अधिकार तिच्या बाळाचाच आहे असेच कवी सांगत आहे. 'बाळाचा अधिकार' किती निर्व्याज आणि निरागस आहे, तितकीच कवीची प्रतिभाही निर्व्याज आणि निरागस आहे.

मातृहृदयातील 'वात्सल्य' सांगणाऱ्या स्तनांचा संदर्भ आई : २ या कवितेतून येताना दिसतो.

विस्मृतीच्या स्वप्नांध वळणावर, एखाद्या प्राचीन
शिवालयातील प्रचंड अंधार कोरीत, तुझ्याच
पदरातून निनादत यावे विदग्ध चंद्राचे
अनंत स्तनांकित आकाश.

(चं. प्र., 'आई', पृष्ठ ३८).

या कवितेचे विवेचन अन्यत्र केले आहेच.

शृंगारसूचन करणाऱ्या कवितातून स्त्रीदेहाचे संदर्भ 'स्तन', 'वक्ष' या स्त्री अवयवातून येतात.

उत्कट शृंगारभावना उखाणेसदृश्य कवितातून मांडताना कमालीची आकर्षक होते. त्याचेच उदाहरण म्हणून 'राधा पार्थसारथी' कविता घेता येईल. शरीरमिलनातील उत्कटता आणि एकरूपतेची भावना या कवितेत मांडली आहे. राधेचे वर्णन कमालीचे उन्मादक करताना कवी म्हणतो,

नागवी तुझी काचोळी

नागव्या स्तनांना राधे.

(चं. प्र., 'राधा पार्थसारथी', पृष्ठ १२).

तर 'बहर' ही कविता स्त्रीमुखातून आपला शृंगारानुभव सांगते.

मन गगन सघन लहरींचे

हलकासा फूलपिसारा

स्तन झाकुन समईपाशी

मी गोंदण मिटली तारा

(चं. प्र., 'बहर', पृष्ठ ८८).

अंगसंगाची तृप्ती, मना-मनाचे फुलारलेले हळुवार हलकेपण सांगणारी स्त्री शृंगारानुभवातून पावित्र्याची भावनाही जपताना दिसते आहे.

'नभ' या कवितेत निसर्गाच्या पार्श्वभूमीवर कवी मनातील भावना व्यक्त झाल्या आहेत. संध्याकाळच्या वेळी, समुद्राचा आवाज आणि पसरत जाणारा अंधार, थरथरणारे वृक्ष आणि हलती शहरे दिसत असतानाच कवीला प्रियसखीचे 'सुगंधित वक्ष' आठवित आहेत. 'सुगंधित वक्ष' ही कल्पना कमालीची आगळी वेगळी आहे. कवीच्या इंद्रिय जाणीवा या सर्वसामान्य तर नाहीतच पण त्या लोकविलक्षण आहेत. सुगंधित हे विशेषण वक्षांना योजणे यातूनच हे कळते. वक्षांना शाहिरी कवितेने गेंद म्हटले आहे. वक्षांना फुलांची उपमा कवीने दिली, फळांची दिली पण 'सुगंधी वक्ष' ही कवीकल्पना मोहक आणि अभिनव वाटते.

'उखाणा' कवितेत स्तनांचे असेच आगळेवेगळे वर्णन कवीने केले आहे. कवी म्हणतो,

नदी कधी वाहते का ?

शहाण्यांना विचार

अप्सरांच्या स्तनांनाही

चांदण्याची धार

(चं. प्र., 'उखाणा', पृष्ठ ९३).

या कवितेत कवीने सुंदर उखाणे घातले आहेत. त्यामुळे कोड्यात टाकणारी दुर्बोधता इथे येते. ''नदी कधी वाहते का ?'' असा प्रश्न असेल तर त्याला उत्तरच नाही कारण वाहणे हा नदीचा धर्मच आहे.

त्याप्रमाणेच स्तनांबाबतही असाच प्रश्न पडणार आहे. 'स्तन' हे इंद्रिय कवीच्या दृष्टीने वैभवी, दैवी आहे. पण 'स्तनांना चांदण्याची धार' ही कवी कल्पना 'आकर्षक' बनून गेली आहे. अप्सरांचे स्वर्गीय सौंदर्य, त्यांचे स्तन चांदण्याची धार असलेले हा सर्व कविकल्पनेचा खेळच मनमोहक आणि काहीतरी नवे सांगणारा आहे.

'तू नाचत जाशी पोरी' या कवितेतील मुलगी अगदी अल्लड किशोरी आहे. नुकत्याच उमलू लागलेल्या फुलासारखी चित्ताकर्षक सौंदर्य तिच्याकडे आहे. मुक्त बहरलेल्या यौवन देहावर तिचे स्तन सत्ता गाजवित आहेत, असे कवीला वाटते.

तनुवेल बहरली मुक्ता

तंद्रीत स्तनांची सत्ता.

(चं. प्र., 'तू नाचत जाशी पोरी', पृष्ठ ९६).

स्त्री देहाकडे पाहण्याचे कवीचे दृष्टीकोन कमालीचे वैविध्यपूर्ण आहेत. त्यापैकीच हा एक आहे. स्त्री देहाच्या सौंदर्याला परिपूर्णता देणारा अवयव म्हणजे 'स्तन' म्हणूनच कवीने त्यांना 'सत्ताधारी' बनविले आहे. कवीच्या सौंदर्यातील विचार इथे प्रकट होताना दिसतो.

स्तनांना सत्ताधीश म्हणणाऱ्या कवीला स्तनात चांदण्यांचे उदयास्तही दिसतात म्हणून कवी म्हणतो,

उडे इथून पारवा भर तमात ये आर्द्रता
स्तनात उदयास्त की मधुर चांदण्यांचे निळे
जळे सभय संभ्रमी पवन दीपमालेतला
तशात हलके धुके अन् धुक्यात मी एकला
उडे इथुन पारवा भर तमात ये आर्द्रता
स्तनात उदयास्त की मधुर चांदण्यांचे निळे.

(चं. प्र., 'उदयास्त', पृष्ठ ९९).

प्रियतमेचे स्तन म्हणजे मधुर अशा निळ्या तारकांचे/चांदण्यांचे उदयास्त होणारे सुंदरतम स्थान आहे असे कवीला वाटते आहे. स्तनांचे वैभव कवीने दैवी तारकांची/चांदण्यांची उपमा देऊन वर्णन केले आहे.

स्त्रीच्या कोरीव स्तनात कवीला कधी 'धुंद मोगराही' दिसतो. ऊन: २ कवितेत कवी म्हणतो,

कोरिली तुझी स्तने स्तनांत धुंद मोगरा
द्वारका जशी दिसे तशी उन्हातली धरा.

(चं. प्र., ऊन: २, पृष्ठ ११२).

तर कधी कवी स्तनाला रत्नाची उपमा देताना म्हणतो,

स्तनास अंग लागले नि सूर्य आंधळा गळे
रत्न कंचुकीतले जसे पुरात वाहिले.

(चं. प्र., 'चंद्रमाधवीच्या ३ कविता : २', पृष्ठ ११२).

तर कधी कवीला स्तनांतून जरतारी चंद्र फिरताना दिसतो. उदा.

श्रावणरात्री तिच्या स्तनांतून
चंद्र फिरे जरतारी.

(चं. प्र., 'सखी', पृष्ठ १५४).

तर कवी कधी वेळेला स्तनांचे विशेषण लावताना दिसतो. उदा.

कोसळणाऱ्या वाऱ्यातुनहि
सन्तुर लहरी येती . . . .
रक्त उमलत्या स्तनवेळेवर
सागर उलटुनी जाती . . . .

(चं. प्र., 'छाया', पृष्ठ १७४).

शृंगारानुभवातील तप्त सौंदर्यानुभूतीचे वर्णन करताना कवी म्हणतो,

आणि तिच्या स्तनांवर ठेवून द्या निखारा
रत्नासमान मागुन चमकेल देह सारा

(चं. प्र., 'कावळा', पृष्ठ १७६).

स्त्रीदेहातील सौंदर्याचे सर्वोच्च स्थान आणि आनंद निर्मितीचेही सर्वोच्च निर्मितीस्थान म्हणून कवी स्तनांच्या प्रतिमांकडे पाहतो. कामभावनेसाठी जसे घोडा ही प्रतिमा येते तद्वतच शृंगारानुभवातील सौंदर्य, तृप्ती-अतृप्ती, सुखातील दुःख आणि दुःखातील सुख, तप्तता या सर्व भावच्छटासाठी कवी स्तनांचा उल्लेख विविधतेने करताना दिसतो. स्त्रीच्या स्तनांना विशिष्ट गंध असतो असे कवीला वाटते, म्हणून कवी लिहितो,

राणीच्या स्तनगंधाचा
ये वास इथे घोड्याला.

(चं. प्र., 'घोडा', पृष्ठ १८४).

या स्तनांचे कवितेतील उल्लेख व संदर्भ अनेकदा दुर्बोध आणि औचित्यहीन वाटतात, असे स्तनांचे दुर्बोध संदर्भ येणाऱ्या काही कविता पुढीलप्रमाणे -

यात काय कराचे असते आत्मसात ?
माझ्या धैर्याचा पुरवा ? फकिरांचा ऊरूस ?
वसंताच्या पूर्वार्धातील पाऊस ? हात सोडवून
घेतानाची बातमी ? स्तनांवरचा तीळ ? संन्याशाची आत्मपीडा ?
तिथे तुम्हाला सत्य सापडेल तिथून मला निरोप धाडा.

(चं. प्र., 'सत्य', पृष्ठ ४७).

चंद्रास्तातील सगळ्या उध्वस्त शिल्पांची नगरे
तिने स्तनयुग्मातील भयाण तमागारात झाकून ठेवलीत;
कपाळावर पसरलेली आकाशाची धूळ तिने
पुसून टाकली, थोडेसे थांबून हलक्या हाताने तिने
खुडून घेतलेत आपले डोळे . . . .

(चं. प्र., 'पाणी : २', पृष्ठ १०८).

स्तनांच्या ओंजळीत गच्च मिटून घे
दु:खाला बिलगलेल्या मायेचा अभिसार
अशावेळी एखादा पक्षी अलगद
उडून जातो शांतीला तडे देत . . . .

(चं. प्र., 'चित्र', पृष्ठ १३९).

माझे इथून जाणे : वैशाखात उधळणारे मृगांचे
कळप आणि स्तनांवर उगवलेले पिवळेगार गवत;
दर्शनात वितळलेल्या दु:खासारखे उदासीन असू दे.

(चं. प्र., 'चित्रबंदिनी', पृष्ठ १४०).

स्तन कापून दुधाचे
थेंब जाळावे मातीत

(चं. प्र., 'चंद्र', पृष्ठ १४९).

ओंजळीत चंद्र ये तिला दिसे न चांदणी
खुळी स्तनात झाकला पुन्हा पुन्हा बघे मणी

(चं. प्र., 'चुडे', पृष्ठ १५०).

नभापरी अपंग हात की स्तनास पूर ये
जळात पाय वाजवी मराल चांदणे सये.

(चं. प्र., 'जलवंती', पृष्ठ १७२).

कधीपासून तेही आठवत नाही आता
पेशी पारदर्शी झाल्या होत्या का ? तीरावरच्या
हाका धर्मशाळेमध्ये पोचल्या होत्या का ?
कारणाशिवाय रडू येते त्या कमळांचे तरी
तळे आटले होते काय ? एक स्तन वेगाने
वाढतो म्हणून पहिल्याच्या नावाने जीव देणाऱ्या
सटवीचे दिवस भरले होते का ?

(चं. प्र., 'धर्मांतराच्या प्रार्थना', पृष्ठ १९५).

कवीचे कवितेतील स्त्रीदेहाचे संदर्भ कमालीचे खाजगीही असू शकतात. म्हणूनच त्याबाबतची कविकल्पना, अनुभूती कमालीची व्यक्तिगत असल्याने उपयोजिलेली स्तनासंदर्भातील उपमा, प्रतिमा ही कविलाच ज्ञात असणार आहे. त्यामुळे अशा दुर्बोध संदर्भाची सुसंगती लावून अर्थ लावणे कवीच्या स्पष्टीकरणाशिवाय अशक्य आहे.

## 'घोडा' प्रतिमा

ग्रेस यांच्या कवितातून 'घोडा ही प्रतिमा नेहमी भेटते. घोडा हे प्रचंड ऊर्जेचे, शक्तीचे, उमदेपणाचे प्रतीक मानले जाते. किंबहुना, घोडा हे शक्तीचे प्रतीक असल्यामुळेच ऊर्जेचे परिमाण 'अश्वशक्ती' असे आहे.

घोडा कामवासना, कामप्रेरणा, कामशक्तीचेही प्रतीक मानले जाते. Symbol of Sex म्हणूनही घोडा हा प्राणी ओळखला जातो. प्रचंड वेग, आवेग, सामर्थ्य म्हणजे घोडा अशा अर्थानेही घोडा हा प्राणी प्रतिकात्मक रूपाने येतो.

मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून मनाच्या अबोध अवस्थेत 'घोडा' हा अर्निबंध, अधीर, वेगवान कल्पनांचे प्रतीक मानले जाते. ग्रेस यांच्या मनात अनेक भावनांचे जे कल्लोळ उसळत असतात, त्यात प्रामुख्याने शृंगारभावना, रतीभावना, कामशक्ती आधिक्याने असावी. कारण, अंगसंग, संभोग, शृंगार हा विषय त्यांच्या चिंतनाचा केंद्रबिंदू असल्याचे जाणवते.

स्वत:मध्ये असलेली अमर्याद कामऊर्जा त्यांच्या सुरत भावनांची आविष्कारकर्ती झाली आहे. या सर्वांचे प्रतीक म्हणून 'घोडा' ही प्रतिमा भेटत रहाते.

धावती किती वेगाने
हे घोडे माझे वैरी
घोड्यांच्या डोळ्यांमधुनी
रडणारे कोणी नाही . . . .
तू सजुन धरावी हृद्ये
घोड्यांचे कौतुक करता
की जळे पिपासा अवघी
ही घागर भरता भरता

वादळी अनावर राने
धावले जिथुन हे घोडे
तो प्रदेश टापांखाली
पसरून वितळली हाडे

धावती किती वेगाने
देहाची रचना प्याया
रचनेच्या खोल तळाशी
यांच्याच उतरल्या छाया

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'घोडे', पृष्ठ २५).

धावती घोडे उताविळ वाकली झाडे पुढे
कैफ वेचावा कशाने नाद ये हृद्‌याकडे

(चंद्रमाधवीचे प्रदेश, 'रक्तगंधाचे दिवे', पृष्ठ ५).

यातून शृंगाराचा अनावर आवेग दिसून येतो. शरीरातून धावणारी कामवासना इतकी वेगात आहे की कवीलाही आवरत नाही. म्हणून तो 'वैरी' म्हणतो तर सगळी 'पिपासा' ही त्या घोड्यांचे कौतुक करताना जळून जावीशी वाटते. पण तसे होत नाही, कारण तृप्ती घागर भरता भरता अधुरीच राहते. हा आवेग वादळी अनावर आहे. स्त्री देहाची रचना पितानाच कवीच्या लक्षात येते की, त्या रचनेच्या उत्पत्तीस्थानाशी, खोल तळाशी घोड्यांच्याच सावल्या आहेत. तुफान शृंगारानुभवानंतरचा अनुभव येथे शब्दबद्ध केल्याचे दिसते.

पण 'घोडा' केवळ एवढीच प्रतीके घेऊन नाही तर कवीच्या मोकाट विचारांचे प्रतीक म्हणूनही कवितेत भेटतो.

अन् पाणवठ्याच्या पाशी
खचलेला एकटा वाडा
मोकाट कुणाचा तेथे
कधी हिंडत असतो घोडा

(सं. क., 'गाव', पृष्ठ ५६).

स्त्रीसौंदर्याचा अविष्कार दिपत्या डोळ्यांनी पाहणारा घोडा शिशिराच्या निर्विघ्न कुरणात आपल्याला पहावयास मिळतो. उदा.

हजारो फुले तशी हजारों घरे या अनामिकांच्या प्रदेशात
तुझा घोडा तू मोकळा सोडलातस

शिशिराच्या निर्विघ्न कुरणात . . . .
तो मधेच दिपून पाहतो एका नसलेल्या ध्रुवाच्या
दिशेंत झिजणाऱ्या तुझ्या देहास
(सं. क., 'इन्ग्रिड बर्गमन', पृष्ठ ५८).

घोडा या प्रतिमेविषयी डॉ. नंदकुमार मुलमुले म्हणतात, 'घोडा' हा असाच ग्रेसने नेहमी वापरलेला सिंबॉल, घोडा हा अनिर्बंध, उतावीळ वेगवान कल्पनांचे अंतर्मनातील प्रतीक असावे.

अन् पाणवठ्यांच्या पाशी
खचलेला एकटा वाडा
मोकाट कुणाचा तेथे
कधी हिंडत असतो घोडा

या कवितेत खचलेल्या, भग्न मनात मोकाट स्वैर फिरणाऱ्या विचारांचे प्रतीक म्हणून घोडा आला आहे. हे प्रतीक पुढील ओळीतून अधिक स्पष्ट होते.

"धावती किती वेगाने
हे घोडे, माझे वैरी
. . . .
रचनेच्या खोल तळाशी
यांच्याच उतरल्या छाया".[१३]

मरणाशी समांतर आकाश की पुरात
बुडालेले कॉनव्हेंट
घोडे येतात तेंव्हा आवाज नाही
जाता तेंव्हा साज नाही

प्रतिमांचे अलंकरण कवी कशा पद्धतीने करतो याबद्दल डॉ. अक्षयकुमार काळेंना दिलेल्या मुलाखतीत ग्रेस म्हणतात, "प्रतीकशक्तीला सतत कौल लावून त्यांच्याकडून प्रतिमांचे अलंकरण सतत घेत असतो" म्हणूनच कोणती प्रतिमा कोणत्या अर्थासाठी आणि प्रतीकासाठी उपयोजिली आहे हे फक्त कवीच जाणतो. म्हणून ग्रेस यांच्या

कवितेतील 'घोडा' ही प्रतिमा शृंगारभावनेप्रमाणेच जशी मुक्त मोकाट विचारांचे प्रतिक म्हणून येते तशीच 'गोऱ्या मुलींसाठी आला काळा घोडेस्वार' अशीही भेटते. 'घोड्याला अंधारातही ओळखते', 'घोड्याचया डोळ्यावर काळोखाची बुंधी' असे या प्रतिमेचे अलंकरण कर्ताना कवी दिसतो. उदा.

गोऱ्या मुलीसाठी आला
काळा घोडेस्वार
अंधारात घोड्यालाही
ओळखिले कोणी
घोड्याच्याही डोळ्यावर
काळोखाची बुंथी

(चं. प्र., 'काळा घोडेस्वार', पृष्ठ ५१-५२).

पण घोडा ही प्रतिमा आणखीही वेगळ्या तऱ्हेने आलेली दिसते. तिचा संबंध कवीच्या रचना निर्मितीशी असावा असे वाटते उदा.

"घोडा कशाने खळाळून हसला ? नि
संपृक्त अंधार झाला मऊ"

(चं. प्र., 'दुरावा', पृष्ठ ६७).

मनाच्या अनंत अबोध अशा खोल तळाशी असलेल्या अबोध, संपृक्त अंध:कारात घोडा खळाळून हसतो आणि कवीच्या मनातील अंधार मऊ होतो, उजळतो.

काही ठिकाणी घोडा चंद्रमाधवीच्या प्रदेशात समाधीस्थ झालेला दिसतो, कसा ते पहा -

तू जाते आहेस चंद्रमाधवीच्या प्रदेशातून
तुझी सारी निमित्ते आणि फुलांचे शेजार
या प्रदेशाच्या काठाशी असलेल्या माझ्या
घोड्याच्या समाधीपाशी अंतर्धान पावलेत.

(चं. प्र., पृष्ठ ४०).

चंद्रमाधवीचे प्रदेश हाच कवीच्या मनातील प्रतिमानिर्मितीचा प्रदेश असावा असे वाटत रहाते कारण,

गाणे धरून माझे घोडा घरून गेला
ज्या डोंगरात निजतो जोगी कुणी भुकेला

(चं. प्र., 'दुसरा घोडा', पृष्ठ ६८).

शृंगाराच्या वेळी आणि अनुभूतीत रममाण होतानाही कवीच्या मनात 'घोडा' ही प्रतिमा वास करताना दिसते. उदा.

तिच्या देहाची वस्त्रचूर शरम
माझ्या देहात आली तेव्हा;
माझ्या घोड्यांना मी अंघोळ घातली.

पण याच अनुभवाच्या पुनरावृत्तीच्या वेळी मात्र कवीची शृंगाराची विचारधारा, कामऊर्जा बेलगाम झालेली असावी असेही वाटत रहाते. उदा.

ती पुन्हा आली तेंव्हा मी नव्हतोच
फक्त उभे होते पाषाणाचे सात घोडे बेलगाम.

(चं. प्र., 'पाषाणाचे घोडे', पृष्ठ ८७).

कारण घोडा रंगीत आहे तसाच पुरातनही आहे. कवीच्याच काय पण प्रत्येकाच्या मनात असणारी कामभावना ही रंगित तर आहेच पण प्राचीन पुरातनही आहे. म्हणूनच ही प्रतिमा 'घोडा' या कवितेत अत्यंत सुंदरपणे अभिव्यक्त झाली आहे. मनातील सुरत भावनेचे सूचन ती नेमकेपणाने करताना दिसते.

हा तसा पुरातन होता
पण होता रंगित घोडा
मोराच्या युद्धतिथीला
घायाळुन झाला वेडा
केशरी दिव्यांची तंद्रा
प्रासाद उभा कललेला

राणीच्या स्तनगंधाचा
ये वास इथे घोड्याला.
(चं. प्र., 'घोडा', पृष्ठ १८४).

याशिवाय 'घोडा' प्रतिमा कवी ग्रेस अनेक प्रतिकांसाठी वापरतात. त्यांची अर्थसंघटना सहजासहजी आकलन होत नाही. उदा.

धुळींच्या लोटामागे दडुन बसले काय घोडे
कळीला येतो काटा रडुन सुजले झाड वेडे
(चं. प्र., 'विनाश', पृष्ठ १७५).

किंवा

हिवाळी दैवनाट्याने गोंधळलेला एकुलता एक
घोडा तिळातिळाने सजवित गेला आपले
कठिणतम शोक.
(चं. प्र., 'धर्मांतराच्या प्रार्थना', पृष्ठ १९५).

असे असूनही कविमनात घोडे उधळीत असताना त्यांचे येण्याजाण्याचे साज-आवाज होत नाहीत हे विशेष आहे. म्हणूनच -

मरणाशी समांतर आकाश की पुरांत
बुडलेले कॉनव्हेंट
घोडे येतात तेंव्हा आवाज नाही,
जातात तेंव्हा साज नाही.

मध्यरात्रीचा अंधार,
मधे एखादी आठवण, तसा वारा
इन्ग्रिड बर्गमनचा पुतळा सर्व पाहतो आहे
माझे उरलेले आयुष्य . . . .
घोडे येतात तेंव्हा आवाज नाही
जातात तेंव्हा साज नाही.

प्रतिमांची अनोखी अनवट रचनाशैली आणि अलंकरणच ग्रेस यांच्या कवितेला वेगळेपण देऊन जाते. कविता समजते की नाही हा मुद्दा बाजूला ठेऊन वाचक त्यातील प्रतिमासृष्टीत हरवून जातो आणि लयबद्ध नादरूपाने कवितेला फितूर होतो. तिच्यात हरवून जातो. प्रतिमांची अर्थसंघटना तयार न होणे याकडे तो दुर्लक्ष करतो आणि ग्रेसना मनमोकळी दाद देऊन जातो.

## 'कावळा' प्रतिमा

भारतीय संस्कृतीच्या रूढी परंपरातून 'कावळा' हा पक्षी मानवी जीवनाच्या नित्य व्यवहारात स्थान मिळवून बसलेला दिसतो. घरी कुणी पाहुणा येणार असेल तर दारातल्या झाडावर कुंपणावर बसून कावळा काव-काव करतो. तो शुभशकुन असून घरी पाहुणा, आवडते माणूस घरी येणार असल्याची खूण मानतात. कावळा अंगणात काव-काव करीत असल्यास 'प्रियकर' घरी येणार याची पूर्वसूचना मानतात. ज्ञानेश्वरांनी सुद्धा,

पैल तो गे काऊ कोकताहे
शकुन गे माये सांगताहे
उड उड रे काऊ तुझे
सोन्याने मढविन पाऊ
पाहुणे पंढरीराऊ घराकै येती ॥

म्हणून, ''विठू घरी येईल का गे ?'' असा प्रश्न कावळ्यालाच केला.

अंगणात कावळा ओरडतानाचे ऐकून शाहिरी काव्यातील स्त्री म्हणते,

बोले कावळा लवतो डोळा फुरफुरती बाही
गेले प्रवासा घरी कधी येतील आमचे शिपाई ॥

असा हा कावळा जसा शुभशकुन सांगतो तसाच तो अपशकुनीही मानला जातो. 'कावळा शिवणे' ही घटना अशुभ मानतात तर तसे घडले तर खोटी खोटीच कुणाच्या तरी मृत्यूची बातमी नातेवाईकांना सांगावा धाडून कळवितात आणि मग अंघोळ करतात. तसेच मृत्यूनंतरच्या पिंडदान तर्पणादी क्रियांमध्ये 'पिंडाला कावळा शिवणे' या गोष्टीला कमालीचे महत्व अजूनही आहे. जर कावळा शिवला नाही तर मरणाऱ्याची कोणती तरी इच्छा अपूर्ण राहिली आहे असे समजतात म्हणजेच ऐहिक जगातच मृत व्यक्तीचा आत्मा कावळ्याच्या रूपाने पिंडाला स्पर्श करतो अशा भावनेने पिंडाला कावळा शिवला की त्या व्यक्तीच्या इच्छा जीवनेच्छेसहित पूर्ण झाल्या आहेत, त्याचा जीव कशातही गुंतून राहिलेला नाही असेही समजतात.

असा हा शुभशकुन सांगणारा कावळा ग्रेस यांच्या कवितेत अनेकदा भेटतो पण त्याची रूपेही वेगवेगळी असलेली दिसतात. इतकेच काय पण 'सांध्यपर्वातील वैष्णवी' या काव्यसंग्रहावरील मुखपृष्ठावर ग्रेस यांच्या मांडीवर आणि हाताशी असे दोन कावळे

बसलेले आहेत, असे चित्र रेखाटले आहे तर मलपृष्ठावर दगडावर एक कावळा काव-काव करतानाचे चित्र आहे. 'सांध्यपर्वातील वैष्णवी' हा काव्यसंग्रह तर कवी ग्रेस यांनी कावळ्यालाच अर्पण केला आहे. याचा अर्थ ग्रेस यांच्या काव्यप्रतिमासृष्टीत, भावविश्वात प्रतिभापातळीवर 'कावळा' पक्ष्याला वेगळे स्थान आहे.

कावळा ही प्रतिमा 'एकटेपणाची जाणीव' म्हणून येताना दिसते. ज्यावेळी कवीला मृत्यूची जाणीव प्रकर्षाने होताना दिसते तेव्हा कावळा ही प्रतिमा येते उदा.

कुणी आपुले म्हणेना
कुणी बिलगेना गळा
कंठ दाटताना झाला
रंग कावळ्याचा काळा.

(सं. क., 'कावळ्याचा रंग', पृष्ठ ३६).

दु:खाने कंठ दाटल्यावर कावळ्याचा रंग काळा होणे म्हणजे त्यापूर्वी कवीच्या प्रतिमासृष्टीतील कावळा हा काळ्या रंगाचा नसावा. तो दुसऱ्या कोणत्यातरी रंगाचा असावा. दु:खाने कंठ दाटल्यावर मात्र कावळ्याचा रंग काळा होतो.

ग्रेस यांची चित्र रेखाटणारी सुंदर भाषाशैली 'गाव' या कवितेत दिसते. चित्रातून,

झाडातुन दाट वडाच्या
कावळा कधीतरि उडतो.

(सं. क., 'गाव', पृष्ठ ५६).

असे वर्णन येते. नित्य जीवनाच्या व्यवहारातून वडाच्या दाट झाडातून उडताना कवीने पाहिला आहे आणि निसर्गचित्रात तो न विसरता आला आहे. दृश्याचा एखादा छोटासा तपशील सुद्धा ग्रेस चित्र चितारताना विसरत नाहीत.

असाच एक वेगळ्या रंगाचा, प्रकारचा कावळा आपल्याला चंद्रमाधवीच्या प्रदेशात भेटतो,

उन्हात चालली गुरे नि गाव दूर राहिला
सूर्यगीत वाहतो अबोल एक कावळा

एकनेत्र तो सुजाण ऊन घे ऊरावरी

जांभळ्या निळ्या किती सरीवरी धरे सरी.

(चं. प्र., 'ऊन कावळा', पृष्ठ १०१).

या कवितेतील हा एकमेव कावळा अबोल असूनही सूर्यगीत वाहक आहे. तो सुजाणही आहे आणि ऊरावर ऊन घेऊन निळ्या जांभळ्या सरीवर सरी धरतो आहे. पण ही प्रतिमा नेमक्या कोणत्या आशय संघटना व्यक्त करते हे कळत नाही. कवीच्या भासमय सृष्टीतील ही आगळीवेगळी कावळ्याची प्रतिमा दुर्बोध वाटते. ग्रेस यांच्या काव्यातील 'कावळा प्रतिमा' आदिम, पौराणिक काळाशी निगडित आहे. कालप्रवाहात ती प्रतिमा वेगवेगळे अर्थ घेऊन अवतरताना दिसते. कधी एकटेपणाची जाणीव होताच कंठ दाटून येताच काळा होणारा कावळा, तर कधी सूर्यगीत वाहतानाही अबोल राहणारा कावळा कवीला भयाकुलही करून जाताना दिसतो. दाट जंगलाच्या झाडीतून जाताना कवी म्हणतो,

पण ही झाडी नक्कीच माझ्या परिचयाची आहे; म्हणून म्हणतो शक्य
असेल तर एखादा माणूस नाही तर वाट चुकलेला समुद्रपक्षी या
झाडीत मरून पडला असेल काल परवा . . . .
कृष्णयुगाचा वैरी, हा कावळा, याच्या चोचीला
का म्हणून हे रक्त . . . .

(चं. प्र., 'भीती', पृष्ठ १०४).

हाच भयप्रद कावळा कवीच्या भावविश्वात मायेने येतो तेव्हा कवी म्हणतो,

माझ्याच देहाच्या उकिरड्यावर खुशाल उभे माझेच
प्रेत, आणि कोवळ्या बुबुळांना चोचीने फोडण्यास सर्व
कावळे धावत आले मायेने कै. ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी.

(चं. प्र., 'कै. ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी', पृष्ठ ११७).

स्वत:च्याच प्रेताच्या कोवळ्या बुबुळांना चोचीने फोडण्यास सर्व कावळे धावत आले. ही प्रतिमा येथे दुर्बोध होते. प्रतिभा पातळीवरून अबोध सुप्त मनाच्या प्रतिमासृष्टीत कवीला हे जे स्वत:च्या मरणाचे चित्र दिसले त्यात बुबुळे फोडणारे कावळे

नेमके कोणते अर्थसूचन करतात किंवा नेमकी कोणती अर्थसंघटना तयार करतात, याचे आकलन होत नाही.

दु:खाने काजळलेली संध्याकाळ आणि नंतरची रात्र कधी संपणार याचा नक्की कालावधी कवीला सांगता येत नाही.

उठा कावळ्यांनो करा वाटचाल
कधी उजाडेल देव जाणे।

(चं. प्र., 'त्रिवेणी', पृष्ठ १२५).

भल्या पहाटे कावळे काव काव करतात म्हणजेच उजाडते; असे असूनही कवी म्हणतो की कावळ्यांनो तुम्ही वाटचालीस प्रारंभ करा कारण पहाट होऊन कधी उजाडेल हेच सांगता येत नाही. पहाटेचा संदेश घेऊन येणारे कांबळे या कवितेत भेटतात पण पुढच्याच दुसऱ्या एका कवितेत हाकेकडे धावणारे कावळे भेटतात.

शिरे डोंगरी राऊळी धर्मशाळा
धुक्यांची निळी नागमोडी दरी
जिथे हाक जाते तिथे कावळ्यांनी
उभा राजवाडा धरावा उरी.

(चं. प्र., 'द्रौपदी', पृष्ठ १५८).

जिथून हाक येते तिथे कावळ्यांनी जावे आणि उभा राजवाडा उरी धरावा असे कवी कावळ्यांना सुचवितो.

एकतर 'कावळ्यांना हाक मारणे' ही संकल्पनाच नवीन आहे आणि पुन्हा त्यांनी त्याला प्रतिसाद देऊनयावे आणि राजवाडा उरी धरावा हे तर त्याहूनही 'अनोखे' आहे. म्हणूनच कावळ्याच्या अशा अनोख्या प्रतिमा ग्रेस यांच्या कवितांतून आढळतात कारण कवीच्या प्रतिमासृष्टीतला कावळा हा कविच्या इतक्या परिचयाचा आहे की तो पडवीत सांजवेळी मुद्दाम येतो असे ते 'कावळा' कवितेत म्हणतात,

खांद्यावरून माझ्या काढू नकोस झोळी
पडवीत कावळा ये मुद्दाम सांजवेळी.

(चं. प्र., 'कावळा', पृष्ठ १७६).

पण याच कवितेत ग्रेस यांच्या कवितेतील कावळा मात्र रूढार्थाने परंपरागत अर्थाने येतो. मृत व्यक्तीच्या पिंडदानाच्या वेळी काकबली ठेवतात आणि पिंडाला कावळा शिवावा म्हणून वाट बघतात, याच अर्थाने कवी कावळ्याला म्हणतो -

ये कावळ्या इथे ये आहेस तू उपाशी
माझी खुडुन खा ना प्राणातली उदासी
बघणार ना तुला रे कोणी इथून राजा
चोचीच पिंड घे तू सावत्र बाप माझा

(चं. प्र., 'कावळा', १७६).

या कवितेत कावळ्याच्या रूपाने आत्मा पिंडाला शिवतो पण हा आत्मा कवीचा 'सावत्र बाप' आहे असे कवीचे सूचन वाचताना वाचक दचकतो त्याच्या प्रस्थापित भावनांना, विचारांना धक्का बसतो शिवाय, 'काकबली' म्हणून कवीने 'स्वत:च्या प्राणातली उदासी' उपाशी कावळ्याला खाण्यासाठी ठेवली आहे.

'कावळे उडाले स्वामी' या कवितेत ही कावळ्याची प्रतिमा दुर्बोध होत जाते. कावळे उडाल्यावर भगवे अंथरणे, राहुटीवरचे आकाश थोडे ढकलुनी देणे, देहाची संगत तुटणे, अंग न उमलणे या सर्वांपासूनच सलग अर्थानुभव प्रत्ययास येत नाही. ही सगळी कविताच कावळा प्रतिमेभोवती फिरताना दिसते.

मी लहान होतो तेंव्हा
मज एक कावळा दिसला
तो पुन्हा आणुनि द्या ना
मी मेघ एक थांबविला

(चं. प्र., 'कावळे उडाले आकाशी', पृष्ठ १७७).

लहानपणी एक कावळा 'दुर्मिळ' असल्याप्रमाणे पाहणे आणि मोठे झाल्यावर तोच कावळा आणुन द्या म्हणणे आणि कावळ्यासाठी एक मेघ थांबविणे यातूनही अर्थाच्या तुटक तुटक संगती लागतात. त्यामधील 'रिकामी जागा' भरण्यासाठी कवीकडेच धाव घ्यावी लागेल. कारण पुढच्या कडव्यातही

तळहात गोंदणी झाली
कावळे उडाले स्वामी
हा घास पोचता करता
त्या रक्तशहाण्या धामी.

(चं. प्र., 'कावळे उडाले स्वामी', पृष्ठ १७७).

अशाच तुटक अर्थसंघटना हाती लागतात. रक्तशहाण्या धामावर घास पोचता करताच तळहातांची गोंदणी होऊन कावळे उडाले असे स्वामींना सांगणारा कवीच या कवितेची अर्थसंघटनाही सांगू शकेल.

कावळ्यांचा आणि रक्ताचा, अन्नाचा, भिक्षेचा, घासाचा जसा संबंध ग्रेसच्या कवितेतून आलेला दिसतो तसाच तो कणकेच्या दिव्याशीही आलेला दिसतो उदा.

आता कणकेचा दिवा माझ्या हातात आहे
घरात शिरलो तर उंदराचे भय;
अंगणात उभा राहिलो तर
कावळ्यांची भीती.

(चं. प्र., 'धर्मांतराच्या प्रार्थना', पृष्ठ २००).

कणकेचा दिवा देवासमोर विशेषत: मारूतीच्या देऊळात, शनीच्या देऊळात लावण्याची पद्धत आहे. शिवाय काही ठिकाणी बाळाच्या पाचवी पुजण्याच्या दिवशीही कणकेचा दिवा लावतात. पण त्या दिव्याला घरात उंदराचे भय आणि घराबाहेर कावळ्याची भीती कवीला का वाटावी ? याचे कारण आणि या सर्वांचा परस्परांशी असणारा अर्थसंबंध आणि कार्यकारणसंबंध यावर कवीच्या प्रतिमासृष्टीतच त्याच्या प्रतिभापातळीवरून जायला हवे. असे असले तरीही कावळा ही प्रतिमा प्राक्तन, दु:ख, मृत्यूची जाणीव यासाठी आली असल्याचे दिसते. कवीला भयगंडाने ग्रासलेले आहेच. हे भय निर्मितीनाशाचे आहे. मृत्यूचे भय अंधाराचे, एकाकीपणाचे भय आहे. विशाल अशा चराचर सृष्टीच्या अनाकलनीय, रहस्याचे आकर्षण असूनही मृत्यूचे भय म्हणजे विनाश कवीला कावळ्याच्या प्रतिमेतून व्यक्त करावयाचे आहे. हे भय कधी संपत नाही कारण घरात आणि घराबाहेर दोन्हीकडेही भय आहेच. म्हणून तर कवी 'भय इथले संपत नाही' असे 'निष्पर्ण तरूंची राई' या कवितेत म्हणताना दिसतो. कावळा ही प्रतिमा जीवनाची नश्वरता, मृत्यूचे चिंतन आणि जाणीव, शुभशकुन, अपशकुन, अशुभ या सगळ्याचे प्रतीक म्हणून येताना दिसते.

## 'प्राणी-पक्षी' प्रतिमासृष्टी

ग्रेस यांची प्रतिमासृष्टी समृद्ध आहे त्यामुळे अगणित प्रतिमा त्यांच्या कवितांतून येत रहातात. संध्याकाळ आणि निसर्ग हा त्यांच्या कवितेचा जसा अविभाज्य घटक आहे. तद्वतच सृष्टीतील प्राणी-पक्षी, वृक्ष-वेली, राने-वने, उद्याने यांचेही कवीच्या भावविश्वात महत्त्वाचे स्थान आहे. या सगळ्या प्रतिमा विविध अर्थांनी येतात. कधी एकटा पक्षी, प्राणी तर कधी पक्ष्यांचे थवे, प्राण्यांचे कळप, कधी शोकातली पाखरे तर कधी पंखमोडली मैना, कधी एकटा वृक्ष तर कधी आषाढ बने कवितांतून आढळतात. ही सर्व चराचर सृष्टी केवळ निसर्ग म्हणून त्यांच्या कवितातून येत नाही तर कवीच्या भावाभिव्यक्तीचे माध्यम म्हणून येते. एकांतापासून शृंगारापर्यंत, सर्वच्या सर्व भावावस्था प्रकट करणारी ही प्राणी आणि पक्ष्यांची सृष्टी कवीच्या भावानुभावाशी स्वाभाविकतेने एकरूप झालेली आहे. या सृष्टीतील 'घोडा' आणि 'कावळा' या प्रतिमांचा स्वतंत्रपणे विचार केलेला आहे. याशिवायही आणखी काही प्राणी व पक्षी ग्रेस यांच्या कवितेतून अनेकविध अर्थच्छटा घेऊन येतात.

'गाय' ही प्रतिमा कवीची अत्यंत प्रिय प्रतिमा आहे. गायीचे करूण डोळे, गायीचे हंबरणे यामुळे कवीही भावव्याकूळ होताना दिसतो.

गाय जशी हंबरते
तसेच व्याकूळ व्हावे -

(सं. क., पृष्ठ ९).

गाय म्हणजे ममता, वात्सल्य, कारूण्य, व्याकुळता अशा भावरूपांनी ती येत रहाते. गाय म्हणजे आईची आठवण, वासराची ओढ, आईची लेकराकडील ओढ अशा भावक्रिया 'गाय' व्यक्त करताना दिसते.

डोळ्यातुनि रंगित साज
परतली आज
भटकल्या गायी
व्याकूळ अनावर
धूळ पसरली बाई

(सं. क., 'काच', पृष्ठ २१).

येथे 'भटकल्या गायी' म्हणजे आई पण आई दिवसभर मुलाला सोडून संध्याकाळी परतते तेव्हा तिच्या डोळ्यांत 'रंगीत साज' आहे. वाट पहाणारे मूल व्याकूळ झाले आहे. त्याच्या मनावर धूळ पसरली आहे. मला वाटते की या कवितेत 'अनावर' या शब्दाऐवजी 'मनावर' हा शब्द असता तर अधिक नेमकेपणा आला असता.

'वैरी' कवितेत 'गायीचे करूण डोळे सांज निळाईतले' आहेत. आईचे हृद्य गहिवरले आहेत. इथे गाय ही प्रतिमा आईसाठीच आलेली आहे. आईच्या मनात मुलाविषयी माया आहेच. मायेचा गहिवर आहेच. पण 'वक्षात तिथीचा चांद' आहे. या परस्परविरोधी भावना आईच्या ओढाळ मनात आहेत. म्हणूनच आई प्रतिमेला छेद देणारी भावना 'वैरी' या शब्दातून व्यक्त झाली आहे.

'कलश' कवितेत वात्सल्य रसाला आणि करूण रसाला आवाहन आहे. भोगलेल्या दु:खाच्या आठवणींच्या आवर्तात कवी सापडला आहे. पण हे आवर्त जेव्हा दु:खाचे बन उधळून लावते तेव्हा कवीच्या घरात अधरविणेच्या मधुधारा ओघळू लागतात. येथे कवी सुखाचा अनुभवही दु:खाच्या मापाने मोजतो. त्याचप्रमाणे,

प्राक्तन ओढुन निजल्या गायी
प्राण तुझे मग हंबरले
इथे दिठीवर उमले पाणी
कलश दुधाचे कुणी भरले ?

(सं. क., 'कलश', पृष्ठ ३४).

जशा धुळितल्या दिशा भुलून गाय जी हंबरे . . . .

(सं. क., 'संयोगिनी', पृष्ठ ४२).

सांज हंबरे पिशी . . . .
. . . . तमात वासर उभी

(सं. क., 'गाणे', पृष्ठ ४५).

हंबरत्या वासराला
कुठेतरी ठेवा
काळ्या टपोर डोळ्यांच्या
गायीला वाचवा.

(चं. प्र., 'पावसाच्या सरी', पृष्ठ ७७).

जलभर हंबरली सांजधेनू गळ्याशी

(चं. प्र., 'भिंती', पृष्ठ १७०).

या कवितातील 'गाय' ही प्रतिमा आईसाठीच आलेली दिसते. 'पावसाच्या सरी' मधील हंबरणारे वासरू आणि 'गाणे' मधील 'तमात वासरे उभी . . . .' या वासराच्या प्रतिमाही आईविना मूल, आईची वाट पाहणारे मूल या अर्थानेच आलेल्या आहेत.

'ससा' ही प्रतिमा 'उखाणा' कवितेत सजणीच्या शृंगारानुभवासाठी आलेली दिसते. तर 'पांढरे हत्ती' या कवितेतून 'पांढरे हत्ती' भेटतात. ग्रेस यांच्या अनेक 'दुर्बोध' प्रतिमांपैकी 'पांढरे हत्ती' ही प्रतिमा आहे असे वाटते. पण 'पांढरे हत्ती' ही कविता पूर्णत: चिंतनातून निर्माण झाल्याचेही लक्षात येते. याच कवितेत सायंकाळी भयभीत होऊन उधळलेली हरिणे दिसतात ते कवीच्या 'भयग्रस्त' मनाचे रूप आहे.

तर हरिणी ही कधी गर्भवती आईच्या रूपातूनही कवितेतून येते.

हरिणी जळात बुडती जैसे उन्हात पाणी
स्वप्नात चालताना आई भिजे फुलांनी
गर्भात हात हलतो भरली दुपार पोटी
आई उभ्याउभ्याने रचते अभंग कोटी

(चं. प्र., 'आईचे गाणे', पृष्ठ ३६).

आईचे अत्यंत पवित्र आणि समृद्ध वर्णन कवीने येथे केले आहे पण हीच हरिणी कधी कवीला दृष्टांतही देताना दिसते जसे.

किर्र दाटला भग्न मोकळा प्रलयपूर्व एकांत
तमागारि कोरिली अरण्ये हरिणींचे दृष्टांत

(चं. प्र., 'डोंगरदेऊळ', पृष्ठ १७८).

या कवितेतील 'हरिणीचे दृष्टांत' हे कवीच्या आयुष्यातील भग्न मोकळ्या प्रलयपूर्व एकांताचेच वर्णन करताना दिसतात.

ग्रेस यांना काही गोष्टींचे सतत भय वाटत असते त्यापैकी एक 'सर्पभय' आहे. त्यांच्या भावनिक आंदोलनातून थरारणारे भय 'साप' या प्रतिमेद्वारे कवितेतून व्यक्त होताना दिसते. 'शाप' कवितेत ग्रेस म्हणतात,

संध्याकाळी उभा मी मला सतीचा शाप
कुठे पाहतो ? अस्थींवरती सरसर चढतो साप . . . .

(सं. क., 'शाप', पृष्ठ ४६).

संध्याकाळी 'भयग्रस्त' झालेला कवी या ओळीतून दिसतो. तर कधीकधी रानझऱ्याच्या जवळ कवीला कात टाकलेला साप पाचोळ्याच्या खाली दिसतो. 'कात टाकलेला साप' कमालीचा सळसळता, चपळ, चैतन्यमयी असतो. कवीला तो रानझऱ्याच्या जवळ दिसतो. कवीमनात सतत शृंगाराची भावना सळसळती, चैतन्यमयी असते. त्याचे ते प्रतीक असावेसे वाटते.

'मांजर' ही प्रतिमा 'दुरावा' कवितेत येते पण ती प्रतिमा एकांताशी संबंधित आहे.

एकांत ये मांजराच्या भितीने
गळ्याला नखांच्या जशा तारका . . . .

(चं. प्र., 'दुरावा', पृष्ठ ६७).

तर 'मांजर' या कवितेतील मांजर थेट 'कृष्णकुळातील मांजर' आहे.

ढग काळा हळुच उतरला
की घट्ट विणीची लोकर
छातीवर माझ्या निजले
ते होते माझे मांजर

रूसले की हसले बाई
सखि, कृष्णकुळातील मांजर
लग्नात तिच्या मी देईन
अंधारभयाचे अंबर

(चं. प्र., 'मांजर', पृष्ठ १६५).

या कवितेतील 'मांजर' काळ्या लोकरीसारखे काळ्या ढगासारखे मऊ आहे, आणि ते कवीला प्रिय असावे ते कवीच्या छातीवर निजले आहे. घरात 'बिशूचे दूध' वाटीत आहे. ते कुलपात बंद करून ठेवलेय पण सखी मात्र त्या दुधासाठी हृद्याचे भुकेले कवच उकरत आहे. या दोन्ही कवितातून येणारी मांजरीची प्रतिमा 'दुर्बोध' वाटते, कारण 'दूध' कवितेत 'एकांतच' मांजराच्या भयाने येताना दिसतो, तर 'मांजर' कवितेतील मांजर 'अंधार भयाचे' प्रतीक म्हणून येते. मांजर कवितेत कवीच्या व्यक्तिगत जीवनातील व्यक्तीचे संदर्भ येतात. यातील 'बिशू', 'चंद्रमाधवीच्या प्रदेशात' (पृष्ठ ८३). 'राघव' ला 'बिशू' म्हणून बोलवित असावेत. म्हणून 'बिशूला मी राघव म्हणत नाही आत्ताशा' असा बिशूचा संदर्भ आला आहे. इथे 'मुलाचे दूध' मांजर पिऊन जाईल म्हणून कुलपात बंद करून ठेवले आहे. आणि 'सखी' हृद्याचे भूकेले कवच 'म्हणजे पान्हा' मांजरासारख्या तीक्ष्ण नखांनी उकरत आहे. मूलाचे दूध, आईतील सखी असे हे प्रतिमांचे संदर्भ येताना दिसतात. 'कावळा' कवितेतील मांजर ही आईचेच पण वेगळे हिंस्त्र रूप घेऊन येते.

दु:खास माझिया का दृष्टांत सोसवेना
खाऊन वेत पाहिले या मांजरीस तृष्णा

(चं. प्र., 'कावळा', पृष्ठ १७६).

'गावातल्या आठवणी' सांगताना कवीला भूतकाळातील घटना आठवलेली आहे. नदीच्या पात्रात उतरलेली तरूणी आणि तिला पडलेली भूल सांगताना कवीला जलातील मासा झाल्यासारखे वाटते.

एकटी उतरली होती
पात्रात नदीच्या खोल
ओटीत लपविला मासा
मग तिलाच पडली भूल

(चं. प्र., 'गावातल्या आठवणी', पृष्ठ ४९).

तर कधी त्यांच्या कवितेत बोटीच माशांच्या झालेल्या दिसतात. अशावेळी ते म्हणतात,

समुद्र गच्च भरला म्हणजे माशांच्या बोटीतून

एका विवस्त्र वाद्याचे सूर येतात.

(चं. प्र., 'काळोख', पृष्ठ ७६).

कधी कधी कवीच्या मर्यादांची सरहद्द, काळोख आखीत असतो आणि रेतीतून कवीच्या छातीवरती कोवळे मासे चढतात.

सरहद्द आखता माझी

काळोख पुलावर भासे

रेतीतून छातीवरती

चढतात कोवळे मासे

(चं. प्र., 'सूर्य', पृष्ठ १६३).

मासे पाण्याबाहेर जगू शकत नाहीत पण ग्रेस यांच्या प्रतिमासृष्टीतील मासे पाण्याबाहेरही जगू शकतात. ही कवीची स्वनिर्मित सृष्टी आहे. म्हणूनच 'मासे पाण्याबाहेर जगू शकत नाहीत' असे शास्त्रीय विधान दाखवल्यासाठी घेऊन त्यांच्या कवितेतील प्रतिमांचा अर्थ लावू जाता अर्थबोध तर होतच नाही उलट ती अधिक दुर्बोध होते.

'डोंगरदेऊळ' या कवितेत 'खारीचा' उल्लेखही असाच येताना दिसतो. 'घर' ही कल्पना कवीची 'हळवी बाब' आहे. त्यांच्या कवितेतून अनेक रूपात ती आली आहे. डोंगरदेऊळमध्ये घर पडके आहे. कवी म्हणतो -

छप्पर झडले भिंती गळल्या फक्त राहिले घर

त्यात घराचा अडसर रोखुनी बसली आहे खार

(चं. प्र., 'डोंगरदेऊळ', पृष्ठ १७८).

भग्न घराचे चित्र विदीर्ण झालेल्या मनात तरळत असताना तिथे भटकणारी 'खार' कवीला 'अस्तित्वाची' खूण पटवून देत आहे.

ग्रेस यांच्या नजरेच्या सूक्ष्म निरीक्षणापासून माशीपासून घारीपर्यंत, माशापासून खारीपर्यंत, सशापासून हत्तीपर्यंत आणि मुंगीपासून सापापर्यंत कुणीही चुकूनही निसटले नाही. आत्ममग्न अवस्थेत मुक्तपणे भटकंती करताना त्यांच्या नजरेने सर्व सजीव-

निर्जीव सृष्टी सूक्ष्मपणे न्याहाळल्याचे जाणवत रहाते. त्या सृष्टीतील प्रत्येक सजीव त्यांच्या कवितेतून आणि ललित निबंधातून भेटतो.

ग्रेस यांना पक्ष्यांच्या निरीक्षणाची आवड असावी असे त्यांची वैविध्यपूर्ण 'पक्षीसृष्टी' वाचताना लक्षात येते. 'संध्याकाळच्या कविता आणि चंद्रमाधवीची प्रदेश' या दोन्ही कवितासंग्रहातून तसेच त्यांच्या ललित निबंधातून अनेकविध पक्षी 'अनेकविध' भावजाणिवांचे प्रतिपादन करताना दिसतात. त्यांचे थोडक्यात विवेचन करता येईल.

संध्याकाळच्या कवितामध्ये येणाऱ्या पक्ष्याचे संदर्भ -

तरीही जातात कधी कधी
माझ्याच मनाच्या काठांकाठाने
स्मरणाच्या मुक्तीच्या उद्द जाळीत
अबोल रानाला साद घालणाऱ्या
सुतारपक्ष्याचे पडसाद

('पाऊले', पृष्ठ १८).

येथे 'सुतारपक्ष्यांचे पडसाद', 'आठवणी', 'स्मृती' या रूपाने येताना दिसतात. तर 'आईचे गाणे' या कवितेतील सुतारपक्ष्याची प्रतिमा स्पष्ट होते.

मेघापल्याड गेले सुतारपक्षी
कंदीत कापराचा आई धरून वक्षी.

(चं. प्र., 'आईचे गाणे', पृष्ठ ३६).

माझ्या वक्षी
निजता पक्षी
अतुल सुखाची ही धारा
देह अनावर
निज मातीवर
हिम वर्षावत ये वारा

('वर्षाव', पृष्ठ २९).

या कवितेत उत्कट शृंगारासारखे वर्णन आणि अनुभव सांगताना कवी 'पक्षी' हे माध्यम वापरताना दिसतो.

पाखरे, पक्ष्यांचे थवे, शोकातली पाखरे, अनिकेत पाखरे अनुक्रमे नाद, गाणे, चांदणे बर्फाच्या कविता - ३, या कवितातून येणारी पाखरे ही कवीचा एकांत, एकाकीपण, आठवणींमुळे येणारी उदासीनता आणि आठवणी यांचे प्रतीक म्हणून येताना दिसतात.

नाद - पृष्ठ ४४.

गाणे - पृष्ठ ४५.

चांदणे - पृष्ठ ५५.

बर्फाच्या कविता : ३ - पृष्ठ ७७.

'प्रिस्टस्' 'पृष्ठ ७४' कवितेतील पाखरू घरटे चुकलेले दिसते, तर 'चिमणी' कवितेतील चिमणी (पृष्ठ ६४) काळाचा दाट शाईचा सागर धक्क्याने कलंडून जाताना आणि कवीला उदास करून जाताना दिसते.

'चंद्रमाधवीचे प्रदेश' या काव्यसंग्रहात कवी ग्रेस यांची प्रतिमासृष्टी अधिक समृद्ध झाल्याचे लक्षात येते. इतकेच नव्हे तर ग्रेस आपल्या स्वनिर्मित प्रतिमासृष्टीत स्वप्रतिभेनेच काही पक्षी निर्माण करून त्यांना वेगळेपण बहाल करतात. ही पक्ष्यांची सृष्टीही बहुरंगी आहे. ती अनेक भावछटा सांगत रहाते.

पारवा हा पक्षी तसा प्रेमविश्वातला लाडकापक्षी इथे ही तो अनेक रूपे घेऊन अवतरतो.

गावाकडच्या डोहाला
कधी घालू नये कडी
सांजपारव्यासारखे
अंग उजेडाची घडी

(चं. प्र., 'उजेडाची घडी', पृष्ठ ८).

एका गौरकाय तरूणीचे रूप घेऊन इथे 'पारवा' भेटतो. पण हा पारवाही नित्य परिचित नसून कवीच्या प्रतिभासृष्टीतला 'सांजपारवा' आहे.

'नर्तकी' कवितेतला पारवा रडतो आहे. सुखदु:खाचे नाते सांगताना कवीने सुंदर शब्दयोजना केली आहे.

विराटात भक्ती तमाचा दिलासा
गळे मृत्यू दु:खातुनी सारखा
तुझा नृत्यगांधार वेचावयाला
रडे मंद धारेत की पारवा . . . .

(चं. प्र., 'नर्तकी', पृष्ठ २४).

भक्तीच्या विराट विश्वात तमाचा दिलासा कवीला वाटतो आहे. पण नित्य जीवनातील दु:ख म्हणजे मृत्यूचे रोजचे झिरपणेच आहे, असेही त्याला वाटते. अशा विराट विश्वाच्या भक्तीत, नर्तकी नाचत असताना तिचा नृत्यगांधार वेचण्यासाठी, परवा मंद धारेत रडत आहे. नर्तकीचा 'नृत्यगांधार' हे जीवन आहे, विराटातील भक्ती आहे. आणि मंद धारेत रडणारा 'पारवा' म्हणजे दु:खातून गळणारी मृत्यूची सतत जाणीव आहे.

'सनई' ही कविता सौंदर्यवादी कविता आहे. कारण त्यात अतर्क्य अज्ञाताचे आकर्षण आहे. निसर्गाच्या सौंदर्यालाही कधी तरलता आहे. तर प्रेमाची स्पर्शलाजरी हवा आहे. रानाला उजळणारी वीज आहे. तर ओथंबलेले वैरी म्हणजे शब्दांनी तटतटलेले कवीमन आहे. निसर्गाशी तादात्म्य पावलेला कवी ऐतथडीला उभा आहे. पण त्याला पैलथडीची सनई ऐकू येते आहे. जीवनाचा शोध, अज्ञाताची ओढ, कुणीतरी काळोखातून वळून पहात असल्याची गूढ जाणीव आणि व्यक्तिगत पातळीवरील प्रेम, साजण या सर्व सौंदर्यवादाच्या ठळक खुणा या कवितेतून दिसतात.

कापित काळिज मंद पसरली
स्पर्शलाजरी हवा
की वृक्षाच्या खांद्यावरती
निजे कुणी परवा

(चं. प्र., 'सनई', पृष्ठ २७).

संध्याकाळच्या वेळी अस्ताचलाला एक चांदणी दीपकळीप्रमाणे उमलते आहे. एकांतात साजण सखीला न्यायला आला आहे. स्पर्शलाजरी हवा काळीज मंदपणे कापत पसरली आहे. आणि अशाच कातर संध्याकाळी सजल तटतटलेले मेघही दाटून आले

आहेत आणि लख्ख गोरी वीजरानाला उजळून टाकून पळून गेली आहे. अशाच हळव्या नाजुक क्षणी वृक्षाच्या पानजाळीत एक पारवा निजलेला आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर 'पारवा' रसिकांच्या मनात घुमत रहातो.

'चंद्रमोजणी' कवितेत आईचे विरहदु:ख, आईने सोसलेल्या यातना यांचे वर्णन येते. पण शेवटच्या कडव्यात मात्र कवीचे या लोकीचे परकेपण या जीवनातील एकाकीपण 'पारवा' चित्रीत करताना दिसतो.

कुठे देश माझा कुठे रात्र माझी
कुठे जीव जातो सख्या राघवा
मी घातले चाळ पायात ज्याच्या
मला भेटवी तो मुका पारवा

(चं. प्र., 'चंद्रमोजणी', पृष्ठ ६१).

या कवितेतील 'पारवा मुका' आहे. कवीचे ते 'हरपलेले श्रेय' ही असू शकते. त्याच पारव्याला कवीला भेटायचे आहे की ज्या पारव्याच्या पायात त्याने चाळ घातले होते. हा अट्टाहास कवी ग्रेस खूप चांगल्या तऱ्हेने, लडिवाळपणे, बालिश हट्टाच्या रूपात करताना दिसतात.

'पारवा' ही कविता तर ग्रेस यांनी पारव्याला उद्देशून केली आहे असे वाटते. पण शेवटच्या दोन ओळीमुळे ती कोण्या स्त्रीला उद्देशून केली असावी असे वाटते.

निसर्गाच्या दुपारच्याही एका वेगळ्याच सौंदर्याचे चित्र ग्रेस यांनी रेखाटले आहे. दूरवर पसरलेले ऊन, एकच झाड आणि त्याची सावली, एकच वाहणारा झरा, निर्मनुष्य गाव आणि दुपारच्या शांत उन्हात एकाकी मुकी घार हिंडतेय जणू ती निर्मनुष्य गाव राखत आहे. या विस्तीर्ण रानाची भूल पाडणारे मृगजळ आहे आणि अशावेळी जणुकाही निर्जीव झालेल्या थकलेल्या कुडीत नवा प्राण यावा तसा नदीवरून थेट उडत पारवा येतो आहे आणि इथून कविता एकदन तुटक होऊन पुढील दोन ओळी अलग पडतात. अशावेळी पायातील जोडव्यांचा नाद येतो. आणि कवी आणखी एका तुटक अनुभूतीत शिरतो.

नादतात जी उन्हात ती तुझी न जोडवी
उन्हात स्नान घालता रडे न माय देवकी

(चं. प्र., 'पारवा', पृष्ठ ७१).

'उदयास्त' कवितेतील पारवा मागील 'पारवा' कवितेप्रमाणे उन्हातून थेट येत नाही तर भर तमातून उडून येतो. या कवितेतही एक नगर आहे. विराट शिवमंदीरातून धूप जळत आहे. लहरबंदिनी मृदुल मालतीची फुले आहेत. दीपमाळ उजळली असूनही कवीच्या मनात सभय संभ्रमाचा पवन वाहतो आहे. हलके धुके पसरले आहे. या धुक्यात कवी 'एकला' आहे. अशावेळी वातावरणातील भर तमातून 'पारवा' उडत येतो. हे चित्र कवीची संगमोत्सुक शरीरभावना दाखवते. मधुर निळ्या चांदण्याचे उदयास्त दाखवणारे सजणीचे स्तन त्याला आठवत आहेत. हे सांगताना कवी म्हणतो,

जळे सभय संभ्रमी पवन दीपमाळेतला
तशात हलके धुके अन् धुक्यात मी एकला
उडे इथून पारवा भर तमात ये आर्द्रता
स्तनात उदयास्त की मधुर चांदण्यांचे निळे

(चं. प्र., 'उदयास्त', पृष्ठ ९९).

'ऊन : २' या कवितेतील 'पारवा' भर दुपारच्या उजाड ऊनात भेटतो. हा पारवा 'उदास' आहे. निळी भयाणता जळते आहे. दूरवर पावसाळी मेघ दृष्टीस पडताहेत. त्या आर्द्रता असणाऱ्या मेघांना कवी अभंग म्हणतो आहे. याही कवितेच्या शेवटी कवी निसर्गाच्या पार्श्वभूमीवर सखीच्या धुंद मोगरी स्तनांची स्मृती जागवतो आहे. अंगसंगाला उत्सुक आहे. संपूर्ण धरणी उन्हात द्वारकानगरीप्रमाणे सोनेरी दिसते आहे, आणि शरीरसुखाच्या ओंजळी कवी रित्या करीत आहे. अत्यंत खाजगी व उत्कट शृंगारभाव येथे प्रकट झाले आहेत. शृंगाराची ओढ आणि पारवा यांचे परस्पर अनुबंध कवीच्या मनात गुंफले गेले असावेत असे वाटते.

कवीचे संमिश्र भावानुभव व्यक्त करणारी 'खेळ' ही एक कविता आहे. सात कडव्यांची ही कविता प्रत्येक कडव्यात वेगळी अनुभूती सांगते. परमेश्वराने हे विश्व अंगण म्हणून खेळायला दिले आहे. आणि अशावेळी कवीने एक खेळ मांडला आहे पण त्याचवेळी त्याच्या खांद्यावर एक 'पारवा' आहे.

माझ्या खांद्यावर एक
फुली फुलला पारवा

(चं. प्र., 'खेळ', पृष्ठ १५९).

हा पारवा म्हणजे कवीकडे असलेली प्रतिभा होय. तो पारवा फुलून आला आहे. पण ४ थ्या कडव्यामध्ये हाच 'पारवा' भुलला आहे. या भुललेल्या पारव्याला कवी पाण्यात बुडवण्यास गेला आहे. पण नदीच्या पाण्यात त्याला 'विनाशाच्या' रूपाने 'मेलेली मासोळी' दिसते. निर्मिती आणि 'निर्मितीनाश' या दोन टोकाच्या तणावामध्ये कवी वावरताना दिसतो. यातील, निर्मितीच्या रूपात, 'पारवा' आहे तर 'विनाशाच्या' रूपात 'मेलेली मासोळी' आहे. पण 'संत' या कवितेत मात्र कवीची 'संभ्रमावस्था' पारव्याच्या रूपाने दिसते.

दोरीवरील बगळा की पारवा कळेना

त्याच्याकडून खुडते ही सांजभोर वेणा

(चं. प्र., 'संत', पृष्ठ, १६२).

पारव्याप्रमाणेच पक्षी, पाखरू, पक्ष्यांचे थवे, पाखरे कवीच्या भाव अभिव्यक्तीचे माध्यम बनली आहेत.

'डोंगर' कवितेत अनेक पक्षी आहेत. आणि त्यांना पिंपळ पाणी पाजतो आहे असे म्हटले आहे. या कवितेत कवी प्रियतमेला अत्यंत लडिवाळपणे जवळ बोलावतो व म्हणतो,

मज नीज अशी येते गं

तू माझ्या जवळ ये ना

वैकुंठ तमाचा डोळी

ओठांनी चुंबन घे ना

(चं. प्र., 'डोंगर', पृष्ठ १८).

पण इतर कडव्यातील घटितांचा सलग संदर्भ लागत नाही. प्रत्येक कडवे वेगळा अनुभव सांगते म्हणूनच,

बुरूजावर धरूनी पिंपळ

पक्ष्यांना पाजे पाणी

यात 'पक्ष्यांना पिंपळाने पाणी पाजणे' म्हणजे काय ? आणि पहाडांना बुरूजावर धरून पिंपळ पक्ष्यांना पाणी पाजतो म्हणजे काय ? या दोन्ही बाबींचा अर्थबोध होत नाही.

'उखाणे' या कवितेत कवी म्हणतो,

खांद्यावर बसे
त्याचे रंग किती ओले
पाखरांच्या सारखाच
वारियाने डोले

(चं. प्र., 'उखाणे', पृष्ठ २९).

हा तर उखाणाच आहे त्याचे उत्तर प्रेमाचा पक्षी असू शकते. पक्ष्यासारखाच 'वारियाने डोलणारा' ओलसर रंग असणारा, खांद्यावर बसणारा हा पक्षी कवीची प्रतिभासुद्धा असू शकते. 'प्रेयसी' सुद्धा असू शकते.

'चंद्र' या कवितेमध्ये सौंदर्यवादाच्या ठळक खुणा दिसतात, अज्ञाताची ओढ, निसर्गातील सौंदर्याचे गुणगान या कवितेत आहे.

लागली दरीला ओढ। कुणाची गाढ।
पाखरे जाती।
आभाळ चिंब। चोचींत बिंब।
पाऊस जसा तुजभवती ॥

(चं. प्र., 'चंद्र', पृष्ठ ३१).

चिंब पावसाळी आभाळात चोचीत बिंब धरलेली पाखरे दरीकडे चालली आहेत. पण त्यातही थोडे विलक्षण असे घडतेय की जाणाऱ्या पक्ष्याऐवजी प्रत्यक्ष दरीलाच कुणाची तरी गाढ ओढ लागली आहे. आणि पाखरे दरीकडे चालली आहे.

इथे पाखरांचे वर्तन, वृत्ती आणि चित्र ग्रेस यांनी वेगळेपणाने वर्णन केले आहे. नित्य जीवनात पाखरे घरट्याच्या ओढीने जातात, गगनात भरारी घेण्याची वृत्ती जोपासतात आणि गगनात विहरताना दिसतात. पण इथे पाखरांनी ओढ नाही तर दरीला आहे. ही दरी अज्ञाताची आहे. 'पाखरे' म्हणजे कवीमन आहे. गूढ अज्ञाताची ओढ कवीमनाला मनाला आहे.

आई : २ या कवितेत 'निद्रिस्त पक्षी' भेटतात. हे आगळेवेगळे पक्षी जांभळ्या पंखांचे आहेत उदा.

तूच उजळावेत, या तमागारातील निद्रिस्त पक्ष्यांचे
जांभळे पंख, आपुल्या मायावी हातांनी
रक्तसमर्पणासारखे

(चं. प्र., 'आई - २', पृष्ठ ३८).

आई ही कवीची निर्मितीशक्ती आहे. त्यामुळे त्याच्या मनाच्या मेंदूच्या, प्रतिभेच्या अंधाऱ्या गाभाऱ्यात निर्मितीरूपी पक्षी निद्रिस्त झाले आहेत. जांभळ्या पंखाच्या या पक्ष्यांचे पंख आईने तिच्या मायावी हातांनी उजळून लख्ख करावेत असे कवी आपल्या आईला सांगतो आहे. कवीची आई त्याच्या प्रतिभाशक्तीच्या उगमाचा केंद्रबिंदू आहे.

चंद्रमाधवीच्या तीन कविता : १ मध्ये कवी आत्मस्थिती सांगताना म्हणतो,

असंख्य पाखरे वरी निनादशून्य मी असा
स्पप्नमंदिरातला जसा विरक्त आरसा

(चं. प्र., 'चंद्रमाधवीच्या तीन कविता - १', पृष्ठ ४१).

रणरणत्या दुपारच्या शांतसमयी दग्ध श्यामल धरणी मूकपणे उभी आहे. दिगंतात सर्व दूर असंख्य पाखरे विहरत आहेत पण कवी मात्र 'निनादशून्य' आहे. तो ही शांत दुपारी मूकधरणी प्रमाणे, विहरणाऱ्या पाखराप्रमाणे मूक आहे. पण या मूकपणातून कवीची 'विरक्ती' बोलते आहे. ही विरक्ती आरशासारखी नितळ, प्रतिबिंबित करणारी आहे. पण आरसा मात्र स्वप्नमंदिरातला आहे. कवी 'स्पप्नातल्या विश्वातच' रहात असल्याने मूकपण, विरक्ती, स्वप्नमंदिरातील, पण जळणारी दुपार मात्र वास्तवातील निसर्गातील 'वास्तवचित्र' आणि त्या पार्श्वभूमीवर स्वप्नमंदिरातील चमकता आरसा असा विरोध येथे दिसून येतो. 'निनादशून्य' अशी कवीची मनस्थिती त्याच शब्दाने नेमकी व्यक्त झाली आहे.

पक्षी (चं. प्र., 'पक्षी', पृष्ठ ६३) या कवितेत कवी 'अनाथपणाची' जाणीव व्यक्त करतो. जेथे कुटुंबसंस्थेचा आधार घेऊन पक्षी ही प्रतिमा अनेक रूपाने येते. म्हणजे पक्षी हा पिलांना सोडून जाणारा पिता या रूपाने येतो. तसेच घरट्यात असणारी पिले ही पण पक्ष्याचीच रूपे आहेत. ही पिले म्हणजे पित्याची मुले आहेत. आपल्या चोचीत वेचलेला

चारा पितापक्षी फेकून देतो. वृक्ष निष्पर्ण झाल्याने तो पक्षी स्वत:ला अनाथ समजतो आणि धुक्यातच रडत रहातो. वृक्षाला मात्र घरटातल्या पिलांची स्मृती आहे. म्हणजे मुलांना घर आहे. पण घरात, पितृछत्र नाही. सायंकाळच्या वेळी पाण्यात लाल सूर्य कोसळतो आणि त्याच संधीकालात पिलांच्या पंखात भरारी येते. जणू त्या पिलांना मोक्षकाळ सापडतो. संध्याकाळ हाच कवीला मोक्षकाळ वाटतो आहे.

येथे पक्षी हा त्यांच्या कुटुंबासह येताना दिसतो आणि कवितेचा पूर्वार्ध जणू एक 'रूपककथा' बनते.

'उद्द' कवितेत तीन पक्षी-प्रतिमा दिसतात एक झाडातून उडणाऱ्या पक्ष्याची, दुसरी 'फुलांच्या राण्यांची', आणि तिसरी 'नाचणाऱ्या करूणाघन मोराची'.

ज्या झाडातुन पक्षी उडती त्या झाडांचे गाणे
शिशिरामधल्या हिमवृक्षाला नको कोवळी पाने

या कवितेच्या ओळी वाचल्यावर पु. शि. रेगे यांच्या कवितेची आठवण येते -

पक्षी जे झाडावर गाणे गातो
आहे झाडच दुसरे पुन्हा त्या गाण्यात
पक्षी जे झाडावर गातो

यात दु:खाची, कारूण्याची, आर्त वात्सल्याची तीव्र जाणीव आहेच पण शृंगारही आहे.

दु:खाची भावना 'रावे' या प्रतिमातून व्यक्त होते उदा.

शिखरावरूनी संथ उतरती जीर्ण फुलांचे रावे
डोळ्यामध्ये जमता पाणी सांग कुणा बिलगावे ?

(चं. प्र., 'उद्द', पृष्ठ ६६).

कवीचा न संपणारा एकांत आणि मातृकरूणा यासाठी 'मोर' या पक्ष्याची प्रतिमा येते.

एकांतातिल निद्रेमधले गीत न येई ओठी
करूणाघन का मोर नाचतो वृद्ध हिवाळ्यासाठी ?

(चं. प्र., 'उद्द', पृष्ठ ६६).

दु:खाची शीह जरतारी मेघासारखी पसरते आणि 'करूणाघन' मोर वृद्ध हिवाळ्यासाठी नाचतो. दु:खाचे, जीवनाचे चिंतन येथे जाणवते.

'काळोख' कवितेतील 'कोट्यावधी पक्षी' संधीप्रकाशासारखे एका प्रदेशात उतरताना दिसतात. या कवितेचे अधिक विश्लेषण अन्य ठिकाणी केले आहेच.

'वल्कले' कवितेत 'पाखरू' हे एकाकीपणाचे प्रतीक म्हणून येताना दिसते. हीच प्रतिमा याच अर्थाने 'चंद्रमाधवीच्या तीन कविता : २', या कवितेतही येते (पृष्ठ, ११९).

तिथे पर्वतांच्या कपारीत जाया

घराला निघे पाखरू एकटे

(चं. प्र., 'वल्कले', पृष्ठ ९१).

'निळाई' कवितेत सर्व निळ्या निळ्या निसर्गाच्या पार्श्वभूमीवर निळे दु:ख चोचीत धरून निळी पाखरे भेटतात.

निळे दु:ख चोचीत घेऊन आली

निळ्या पाखरांची निळी पाऊले

(चं. प्र., 'निळाई', पृष्ठ ९८).

या कवितेत निळ्या रंगाला मध्यवर्ती स्थान आहे. निळ्या रंगाच्या पाखरांची पाऊले ही निळीच आहेत. हे वैशिष्ट्य येथे लक्षणीय आहे.

'भीती' या कवितेत वाट चुकलेला समुद्रपक्षी ही प्रतिमा येते.

शक्य असेल तर एखादा माणूस नाहीतर
वाट चुकलेला समुद्रपक्षी या झाडीत
मरून पडला असेल, कालपरवा . . . .

(चं. प्र., 'भीती', पृष्ठ १०३).

कवी ग्रेस यांच्या मनात भयाची भावना सतत त्यांचे काळीज कुरतडत असते. त्या भयाचा परिणाम स्वरूप म्हणून, वाट चुकून मरून पडलेला समुद्रपक्षी कवितेत तर 'कावळा' हा 'भयभावना' हिंस्त्रपणा याच्या रूपाने येतो.

'मर्‍लित मेन्रो' या व्यक्तिविषयक कवितेत ग्रेस मेन्रोच्या घायाळ करणाऱ्या सौंदर्याचे वर्णन करण्यासाठी 'पक्षी' ही प्रतिमा वापरताना दिसतात. त्यांना मेन्रोचे केस म्हणजे, 'आवर्तांच्या नृत्यभूमीत भटकणारा एक पक्षी' वाटतो. ते म्हणतात -

पक्षी मला आवडतात त्यांच्या
रक्तबंबाळ तऱ्हांमुळे, मैलोगणिक ते उडत
जातात, त्यावेळी वरच्यावर अलगद उचलून
धरतात सूर्यप्रकाश; मग सर्व
संधिप्रकाशाचा प्रदेश : The Region of Twilight

मेन्रोचे केस रक्तबंबाळ करणारे पक्षी आहेत आणि सूर्यप्रकाश वरच्यावर अलगद उचलून धरतात. ते पाहताच कवीच्या मनात सर्वत्र 'संध्याकाळचा काजळणारा संधिप्रकाशाचा प्रदेश' निर्माण होतो. (चं. प्र., 'मर्लिन मेन्रो', पृष्ठ १३०).

'लेकसिटीतील हॉस्पिटल' (चं. प्र., पृष्ठ १३५) या कवितेत 'सोनेरी पक्षी' ही प्रतिमा भेटते.

झाडांना ऋतुची साध नाही, देखावा असा अतुट
उतरणीच्या कित्येक आरशांत सोनेरी पक्ष्यांची लूट

मोहक निसर्गाच्या चित्रावर उतरणीवर उडत जाणारे 'सोनेरे पक्षी' म्हणजे कवीची 'सोनेरी प्रतिभा' असावी असे वाटते. कारण त्या कवितेत 'हृद्यातून सांडत जाणारी कमळे' ही प्रतिमाही 'शब्द' अथवा 'काव्य' यासाठी आली असावी. तद्वतच 'सोनेरी पक्ष्यांची लूट' ही प्रतिमा आली असावी. या दोन्ही प्रतिमांचे 'बोध' स्पष्टपणे होत नाहीत.

'दु:ख' कवितेत 'ढळलेला पक्षी थेट पडला' असे कवी म्हणतो.

प्रेषित हा स्वप्नलिपी वाचणारा आहे. त्यांच्या खांद्यावरचा ढळलेला पक्षी थेट काळोखात पडला. कवी स्वप्नभासाच्या जगतात असताना त्याला पडणाऱ्या स्वप्नांचे सूचकार्थ हा प्रेषित वाचतो. मनाच्या अंधाऱ्या गूढ गुहेत काळोख आहे. पण त्या काळोखात ही प्रेषितांच्या खांद्यावरचा पक्षी प्रेषिताने वाचलेला स्वप्नलिपीचा अर्थ घेऊन कवीच्या अंधाऱ्या अंतर्मनात येऊन पडतो.

स्वप्नलिपी वाचणाऱ्या प्रेषितांच्या खांद्यावरून

ढळलेला पक्षी थेट पडला

तो काळोखातच

(चं. प्र., 'दुःख - २', पृष्ठ १४५).

याशिवाय पक्ष्याच्या पुढील प्रतिमाही विखुरलेल्या दिसतात.

समुद्रात तुझ्या धीरगंभीर पाण्यात

कोट्यावधी पाखरांचा गळा

(चं. प्र., 'समुद्र', पृष्ठ १४९).

वणवण फिरणारा मांड दारात वारा

सरळ झडप घेतो पक्षि सोडून वारा

(चं. प्र., 'डहाळी', पृष्ठ १६६).

विरक्त रंग गर्दले नि दूर धावते हवा

इथून पाखरास ने जसा लयीत गारवा

(चं. प्र., 'जलवंती', पृष्ठ १७२).

उध्वस्त मंदिरे येतिल

नजरेत तुझ्या दिप्तीने

खंडातर करते पक्षी

दिसतील तुला तृप्तीने

(चं. प्र., 'निरोप', पृष्ठ १७३).

येताना कौतुक वाटे

भयभीत मिठीचे तुजला

या चंद्रकुळातील पक्षी

फांदीवर लटकून मेला

(चं. प्र., 'दुसरा पाऊस', पृष्ठ १८०).

पाऊस पाखरे जेव्हा
देशांतर करूनी येतिल
मग असे सुखाचे सजणे
मेंदूहुन रंगीत खोल

(चं. प्र., 'दुःख', पृष्ठ १८५).

संध्याकाळ, फुलपाखरे गवताचे अस्वस्थ
अविर्भाव एकत्र जमून आलेल्या लहरींचे
सूक्ष्मरूप पितळी खांबात दडलेल्या
रांगोळीच्या वेळी नि:संदिग्ध अक्षरांचे
खाली वाकून पाहणे; सगळ्या गवताचीच
फुलपाखरे होऊन जाणे . . . .

(चं. प्र., 'फुलपाखरे', पृष्ठ १८८).

तृप्तीने खंडांतर करणारे पक्षी, चंद्रकुळातील पक्षी, देशांतर करून येणारी पाऊस पाखरे, फुलपाखरे, गवताची फुलपाखरे अशा विविध प्रतिमा घेऊन पक्षी येतात.

येताना कौतुक वाटे
भयभीत मिठीचे तुजला
चंद्रकुळातील पक्षी
फांदीवर लटकून मेला.

या ओळी दुर्बोध वाटतात. तरीही मिठीचे भय वाटणे म्हणजे शृंगाराचे सूचन वाटते. मिठीचे भय, मृत्यूचे भय, संभोग म्हणजे लघुमरण असे ग्रेस म्हणतात. म्हणून चंद्रकुळातील पक्षी फांदीवर लटकून मरणे म्हणजे संभोग होय. कवीच्या मिठीचे वर्णन दोन्ही नजरेतून केले आहे. खुद्द कवीला त्याची मिठी म्हणजे भयभीत वाटते. मृत्यूचे भय, लघुमरणाचे म्हणजेच संभोगाचे भय आणि प्रियतमेला त्या मिठीचे कौतुक वाटते आहे. तिच्या दृष्टीने अंगसंग ही आनंदाची, कौतुकाची घटना आहे.

'निरोप' कवितेतील पक्षी 'निरोप घेणारे कवीमन' आहे. हा कवी प्रियतमेला सांगतो आहे. तुझ्या नजरेच्या दिप्तीने उध्वस्त मंदिरेही तुझ्या नजरेत येतील. अर्थात मी निरोप घेतला तरी स्मृतींच्या रूपाने तुझ्या नजरेत राहीन. मी निघून जातोय, खंडातर करतोय पण मी तृप्त आहे, पक्षी तृप्त आहेत. तुझ्या प्रेमाने तृप्त होऊन मी जात आहे.

## 'बगळा' प्रतिमा

'बगळा' हा पक्षी कवीच्या भावुक मनाचे चित्रण करणारा दिसतो. हळवे मन, आतुरमन दाखवताना ग्रेस बगळ्याची प्रतिमा वापरतात.

जुळतात मनाच्या तारा
बगळ्यांना होते घाई
बागेतिल फूल कधीही
तुडवून कुणी ना जाई

(चं. प्र., 'बाग', पृष्ठ ५७).

किती बगळ्यांच्या माळा रंगनदिला देत हाका
हसे रक्तामध्ये वलयफिरती दीपकलिका.

(चं. प्र., 'किमया', पृष्ठ १०५).

बाग आणि किमया कवितेत अनेक संमिश्र अनुभूतींचे चित्रण आहे पण निसर्गाच्या सौंदर्यवर्णनामध्ये 'बगळे' कवीमनाचे प्रतीक म्हणून येतात.

'प्रेमभावनेत' मनाच्या तारा जुळणे खूप महत्त्वाचे असते. इथे कवीच्या जुळलेल्या दिसतात. त्याचीच उत्सुकता अधीरता 'बगळ्यांना होते घाई' या शब्दांनी व्यक्त होते. 'किमया' कवितेतील 'बगळ्यांच्या माळा' रंगनदीला हाका देताना दिसतात. बगळ्याच्या हाका ऐकून कवीच्या रक्तामध्ये वलयफिरती दीपकलिका हसते, असे कवी म्हणतो. ग्रेस यांच्या प्रतिमासृष्टीतील नदी रंगीत आहे. आणि बगळे बोलणारे आहेत. आपल्या प्रतिमेच्या सृष्टीतील प्रत्येकाला स्वतःच्या इच्छेप्रमाणे कर्तन करायला लावणे हा कवीच्या स्वैर, आत्ममग्न, पण मुक्त मनाचा आग्रह दिसतो.

'संत' कवितेतील बगळा मात्र कवीमनाची संदिग्धता घेऊन येतो.

दोरीवरील बगळा की पारवा कळेना
त्याच्याकडून खुडते ही सांजभोर वेणा

(चं. प्र., 'संत', पृष्ठ १६२).

'आई' हा या कवितेचा विषय आहे. आई विषयक अनेक भाव कवीमनात जागे होतात. अशाच भासाच्या ग्लानीत कवीचे मन आहे. त्यामुळे नेमका कोणताच स्पष्ट

आशय सांगणारी मनाची संदिग्ध अवस्था म्हणजे या कवितेतील 'बगळा' किंवा 'पारवा' होय. त्यांच्याकडून आई 'सांजभोरवेणा' खुडून घेते असे कवी म्हणतो.

संध्याकाळी नित्यच बगळ्यांची माळ आकाशात दिसते. हे दृश्य खिडकीतून कवी पाहताना त्याला बगळ्यांची माळ निमुळत्या पूलासारखी दिसते.

खिडकीतून दूर बघावा
बगळ्यांचा पूल निमुळता

(चं. प्र., 'मांजर', पृष्ठ १६५).

कवीमनातील चंद्रमाधवीचे प्रदेश, सृष्टीतील संध्याकाळ यांना जोडणारा हा 'बगळ्यांचा निमूळता पूल आहे' असे वाटते.

कवीच्या मनाची करूण अवस्था ही हा बगळा चितारताना दिसतो.

आटल्या नदीच्या पात्री
हा उभा एकटा बगळा
घन करूणाघन होताना
वाळूचा भांग कपाळा

(चं. प्र., 'दु:ख', पृष्ठ १८५).

कवीचे आर्त एकाकीपणा, रूक्ष जीवघेणा एकांत म्हणजे ही बगळा प्रतिमा होय. 'धर्मांतराच्या प्रार्थना' ही कवीच्या अनेक दुर्बोध कवितांपैकी एक कविता. अनेक भावनांचे कल्लोळ या कवितेत उठताना दिसतात. वात्सल्य, ख्रिस्तकरूणा, आर्त प्रार्थना, आईची आठवण, मृत्यूची जाणीव, आत्मशोध, काव्यजाणीव, भक्ती, भय असे सर्व गुंतागुंतीचे भावविश्व या कवितेतून आले आहे. कवितेच्या शेवटी 'बगळे' गर्भाशयातील जीवाच्या रूपाने येतात असे वाटते. कारण -

प्रार्थनांच्या
वेषांतरात तिने जळालेल्या गर्भाशयाची
हृदयद्रावक कविता दडवून ठेवली होती
चिंचबनात बगळ्यांनी वसाहती केल्याची
वार्ता कळताच सुमित्रेने चिंचबनाला
आग लावून दिली.

(चं. प्र., 'धर्मांतराच्या कविता', पृष्ठ १९९, २००).

## मोर प्रतिमा

ही प्रतिमा विविधरूपात ग्रेस यांच्या कवितेत भेटते. हे मोर खूपच शहाणे वाटतात. कारण त्यांना वेळ कळते. आणि ते खरेही असावे. म्हणून तर सजल मेघ दाटले की मोर पिसारा फुलवून व्याकुळ होतो. मेघवृष्टीप्रमाणेच प्रियतमेची वाट पाहताना तो असा व्याकुळ होतो. 'लाज' या कवितेत 'वेळ समजणे' या मोराच्या वैशिष्ट्याचा उल्लेख कवीने केला आहे.

तर 'काळोख' या कवितेत कवीने काळोखाला मोरपिसाची उपमा दिली आहे.

त्यातील एखाद्याच्या रत्नसंतप्त डोळ्यांत
मोरपिसासारखा सुज्ञ जांभळा काळोख
असला तर . . . .

(चं. प्र., 'काळोख', पृष्ठ ७५).

'पावसाच्या सरी' मधे मोर रानाच्या भीतीने अंगणात येताना दिसतो. 'या ओंजळीत घोडा' या कवितेतील मोर चक्क छंदात फाटलेला आणि कुबडा आहे. तर 'वर्षा' कवितेतील 'मोर' 'मनआर्त' आहे. आणि 'डहाळी' कवितेतील मोर 'विजनवासी' आहे. पण तरीही त्याचा पिसारा उंच फुललेला आहे. कवी एकाकी असला तरीही कवीची प्रतिमा उंच उभारलेल्या मयूरपंखासारखी मनोरम आहे. असे तर कवीला सुचवायचे नसेल ना ?

'ऊन' कविता कवीच्या निर्मितीचे वर्णन करणारी असली तरी ही शेवटच्या कडव्यात कवीच्या दु:खाचे वर्णन करणारा 'मोर' येतो.

मोर माझ्या पाठीत वाकलेला
जसा मेंदीचा रंग वाळलेला

(चं. प्र., 'ऊन', पृष्ठ १७९).

'घोडा' कविता कवीच्या विविध भावनांचे चित्रण करणारी आहे. ही प्रतिमा मात्र 'दुर्बोध'च रहाते.

हा तसा पुरातन होता
पण होता रंगित घोडा

मोरांच्या युद्धतिर्थाला

घायाळुन झाला वेडा

(चं. प्र., 'घोडा', पृष्ठ १८४).

'मोरांची युद्धतिथी' कोणती ? त्याचा पुरातनरंगीत घोड्याशी काय संबंध असावा? 'मोराची युद्धतिथी' नेमकी कोणती आशयसंघटना घेऊन येते ? पुरातन घोडा घायाळुन वेडा झाला तो मोरांच्या युद्धतिथीला ? या सगळ्या प्रतिमांचे 'दुर्बोध' पण केवळ ग्रेसच उकलू शकतात.

'मोर' हेच शीर्षक असलेली कविता मोराच्या विविध अवस्था सांगणारी आहे. चार कडव्यातून मोराचे वर्णन असले तरी ते वर्णन कवीच्या भावावस्थेचे आहे.

घनकंप

मयूरा

तुला इशारा

खोल पिसारा

प्राण आडवापडे

तू वळशिल माझ्याकडे ?

(चं. प्र., 'मोर', पृष्ठ १८६).

मोराचा पिसारा उंच उभारलेला असतो पण इथे घनकंप झालेल्या मोराला पिसारा खोलण्यासाठी कवी इशारा करीत आहे. माझा प्राण आडवा पडला आहे. तू माझ्याकडे वळशील का ? कविता करणे म्हणजे प्राणाशी खेळच आहे असे कवीला वाटते आहे. म्हणूनच शब्दांचा मयूरपंखी पिसारा खुलणे म्हणजे कवीची काव्यनिर्मिती आहे आणि त्यासाठी त्याचा प्राण आडवा पडणार आहे. कवीला कविता म्हणेज मरणच वाटते म्हणून मोराचा पिसारा खुलणे, कवीला काव्य स्फुरणे, आणि प्राण आडवा पडणे म्हणजे 'मरण' कवितानिर्मिती म्हणजे 'लघुमरण' इंचाइंचाने होणारे.[१४]

घनसंघ मयूर - दु:खी गीतासाठी, घननीळ मयूर भीषण दु:ख जाणीवेसाठी, घनदंग मयूर - प्रणयभावनेसाठी येताना दिसतो. जिच्या बिंदीमध्ये चंद्र थरथरत आहेत अशी

कामोत्सुक स्त्री तिचे वस्त्र पालविते आहे. त्या स्त्रीचे रूप शहारा आणणारे आहे. कवीच्या मनातील शृंगार येथे घनदंग मयूर व्यक्त करतो.

पक्षी, मोर पारवा, बगळा या पक्षी-प्रतिमा जशा कवीच्या विविध भावावस्था सांगण्यासाठी कवितेतून येतात. त्याचप्रमाणे अन्य पक्षीप्रतिमाही त्यांच्या कवितेतून भेटत रहातात. उदा. झोका, निरोप, कावळे उडाले स्वामी या कवितातून 'कोकीळ' ही प्रतिमा येते.

कोकिळेच्या स्वप्नात वीज आली

आज माझ्या दु:खास मीच वाली.

(चं. प्र., 'झोका', पृष्ठ ५५).

कवी स्वत:च्या दु:खाचे अत्यंत सुंदर शब्दात वर्णन करताना दिसतो. वृद्ध पानांच्या जाळीत जसा उष्ण वारा, चंदनातल्या सरणातला जसा निखारा तसे माझे दु:ख आहे. कोकीळेसारख्या वसंतगायिकेच्या स्वप्नात जाळून टाकणारी वीज यावी तद्‌वतच हळव्या कवीच्या जीवनातील दु:ख त्याला जाळणारे आहे. पण या दु:खासाठी कवीने कोणालाही जबाबदार धरले नाही तर त्याने त्याची सगळी जबाबदारी स्वत:वरच घेतली आहे. म्हणून तर 'माझ्या दु:खाला मीच वाली' असे कवी म्हणतो (जीवनदृष्टी).

'निरोप' कवितेत 'कोकीळ' याच्या मूळ रूपातच म्हणजे 'गायक पक्षी' म्हणूनच येतो. कवी निरोप घेऊन दूर जाताना प्रियतमेला सांगतो आहे.

शेतावर ढग अडलेला

घे त्याला मागून पाणी

झाडावर कोकीळ येता

घे मागुन एक विराणी

(चं. प्र., 'निरोप', पृष्ठ १७३).

विरहाच्या दु:खामुळे व्याकुळ झालेल्या प्रेमीमनांचे दु:ख येथे व्यक्त झाले आहे. 'कावळे उडाले स्वामी' ही ग्रेस यांची जटिल अनुभवविश्व सांगणारी 'दुर्बोध' कविता आहे.

संन्यासिनी मेल्या सगळ्या

औदुंबरि कोकिळ आले

(चं. प्र., 'कावळे उडाले स्वामी', पृष्ठ १७७).

'कावळे' हे मृत्यूनंतर मानवी आत्म्याचे प्रतीक मानले जाते. त्यानुसारच संन्यासिनी मेल्या आणि त्यांचे आत्म कावळ्याच्या रूपाने औदुंबरावर येवून बसले असे वर्णन असते तर त्याचा थोडाफार संदर्भ लावता आला असता पण इथे संन्यासिनी मेल्यावर 'औदुंबरि' 'कोकीळ' आले याचा नीट उलगडा होत नाही. ही सगळीच कविता व्यामिश्र आणि दुर्बोध वाटते.

कोकिळेप्रमाणेच 'चिमणी' ही पक्षीप्रतिमाही ग्रेस यांच्या भाव-अभिव्यक्तीसाठी योजलेली दिसते. 'जाऊब्राई' या कवितेत 'चिमणी'च नायिका आहे. ही कविता अनोखे आणि गुंतागुंतीचे अनुभव व्यक्त करते. कवीच्या सृजनसृष्टीतील काल्पनिक घटनांवर आधारित आहे प्रतिभापातळीवरच भावव्यवहार या कवितेतून चित्रित झालेले आहेत. चिमणीच्या जाऊब्राई, रांडेचे शिवार, जाऊब्राईचे कारटे, चिमणीच्या शेजेलाही जाऊब्राईचा जाच, दुष्ट चिमणा, जाऊब्राईने काळोखात रडणे, चिमणी रूसणे, जाऊब्राईने पाचोळा दळणे हे शारीरिक भावनिक व्यवहार, कवीच्या प्रतिभापातळीवरील जीवनात घडणारे आहेत. वास्तव आणि भास-आभास, सत्य आणि स्वप्न यांच्या धूसर सीमाप्रदेशातील संधीकालातील हे भाव-व्यवहार केवळ कवीच जाणू शकतो. म्हणून तर ही 'जाऊब्राई' दुर्बोधतेची बेसरबिंदी घालून बसली आहे.

ही चिमणीची प्रतिमा 'द्वारका' कवितेतही 'दुर्बोध' होऊनच येताना दिसते.

गव्हाएवढे चांदणे चाची चिमणीच्या आले

टिंबलागणीने जसा जीव कैलाराचा गळे

(चं. प्र., 'द्वारका', पृष्ठ १६९).

'चर्चबेल' मधील 'चिमण्या' या ललितनिबंधातून चिमण्या,त्यांचे घरटे लेखकाचे, बाळूवैद्य यांचे क्रूर वर्तन, बाळूवैद्यने चिमण्या मारणे आणि लेखकाने चिमण्यांचे घर जाळणे यांचे हृद्‌य अस्वस्थ करणारे परिणाम 'सं. क.' आणि 'चं. प्र.' या कविता संग्रहातूनही दिसतात.

ग्रेस यांच्या कवितातून येणाऱ्या पक्षी-प्रतिमा पुढीलप्रमाणे दाखविता येतील-

ओळखीच्या वाऱ्या
तुझे घर कुठे सांग ?
गरूडाच्या पंखामध्ये
डोंगरांची रांग

(चं. प्र., 'उखाणे', पृष्ठ २९).

या उखाण्यात गरूडाच्या पंखामध्ये वाऱ्याला उडविणाऱ्या डोंगराच्या रांगा म्हणजे सामर्थ्य आहे असे कविला सांगायचे आहे.

झाड मधे आले
होई वाट नागमोडी
उडे पोपटाचे रान
पिंजऱ्याला कडी

(चं. प्र., 'उखाणे', पृष्ठ २९).

हिरव्या निसर्गसृष्टीतील उडणाऱ्या हिरव्या पोपटाचे रान इथे कवी वर्णन करतो आहे. हा ही उखाणाच आहे. पिंजऱ्याला कडी असूनही पोपटांचे रान कसे उडाले ? हा उखाणा आहे.

उन्हांच्या झळांनी जळे आंबराई
उडाले कुठे पोपटांचे थवे
तुझ्या पाजलेल्या दुधाचा भराला
जसे आतडे वाळलेले हवे

(चं. प्र., 'देवचाफा', पृष्ठ १८३).

या कवितेत दुःख, सुख वात्सल्य या भावना व्यक्त होताना दिसतात. दुःखाच्या झळांनी कवीचे मनच अवघे जळते आहे. आणि सुखदायी पोपटांचे थवे उडाले आहेत. आईच्या वात्सल्याच्या दुधाच्या पान्ह्याचा भर पिण्यासाठी, आईच्या मायारूपी ओलाव्याविना वाळून गेलेले बालकांचे मनच हवे आहे.

इथे कवीच्या पोरकेपणाच्या दु:खाला आईच दूर करणार आहे.

'लपंडाव' या कवितेत 'पक्षी', 'वटवाघूळ' आणि 'बगळे' इ. पक्षी-प्रतिमा येतात. 'लपंडाव' ही कविताही दुर्बोधतेच्या बंधनात बद्ध आहे. निसर्गाचे वर्णन, पक्षी, सन्यासी, लपंडाव, वटवाघुळ, जलकंपन नादाच्या प्रतिमा, सुवर्णमृग, पौराणिक राम-मैथिली, बगळ्यांची फडफड, आणि ज्यांच्या मिठीत फुलुनी येशील त्याच मिठीचा साजण माग अशी स्त्रीला केलेली सूचना अशा विविध प्रतिमांनी आणि अलग-अलग संदर्भांनी एकाही आशयसंघटना प्रतीत होत नाही.

धुके नसून लपंडाव हा
या वृत्तीचे काय गडे
वटवाघुळही घुमटामध्ये
लपुनि बसाया जसे रडे . . . .

(चं. प्र., 'लपंडाव', पृष्ठ ५४).

'झोका' कवितेतील 'घार' ही पक्षी प्रतिमासुद्धा अशीच दुर्बोध वाटते

सूज पायावर येताच गळे पान्हा
झाड रूजले उपटून काढताना
घार डोहावर पोचली दुपारी
कोण आला वेळूत या मुरारी ?

(चं. प्र., 'झोका', पृष्ठ ५५).

सूज पायावर येताच पान्हा गळणे आणि उपटून काढताना झाड रूजणे किंवा रूजलेले झाड उपटून काढणे या क्रियाही गोंधळ उडवितात. शिवाय 'घार' माणसाप्रमाणे निश्चित वेळेवर निघून दुपारी डोहावर पोचली पण या वेळूत मुरारी नामक कोण आला ? या सगळ्यांचा अर्थ आकलन होत नाही तीच स्थिती 'पारवा' या कवितेतील घारीसंबंधी होते.

निर्मनुष्य गाव हा कसे कुणा विचारणे
घार हिंडते मुकी तिला उन्हात राखणे

(चं. प्र., 'पारवा', पृष्ठ ७१).

भर दुपारी आकाशात उंच हिंडणारी घार आणि संपूर्ण गाव निर्मनुष्य आहे म्हणून घारीला उन्हात गाव राखायचे आहे अशी कवीकल्पना आहे पण एवढ्याने अर्थ उकलण्यास मदत होत नाही.

'शब्द' कवितेतही 'घार' कोणताही अर्थानुभव सांगत नाही.

जशा उडती घारी गगन तितुके उंच जाई
तुझ्या हंबरणाऱ्या परत फिरवी सर्व गाई

(चं. प्र., 'पारवा', पृष्ठ १८२).

'दुसरा घोडा' या कवितेत 'गिधाडे' ही दुर्मिळ पक्षी-प्रतिमा येते.

एकत्र बांग देतो यावीत सर्व झाडे
त्यांच्याच मालकीची दैवी निळी गिधाडे
दिक्काल वासनांचा चोचीत शुभ्र पारा
माझ्या मिठीत घुमतो तो आसमंत गोरा

(चं. प्र., 'दुसरा घोडा', पृष्ठ ६८).

कवीने मुस्लीम प्रार्थनेसाठी आवाहन करणारी बांग देताच सगळी झाडे यावीत. त्या ईश्वराच्याच मालकीची सगळी गिधाडे निळ्या रंगाची आहेत, शिवाय ती दैवी आहेत. त्यांच्या चोचीत दिक्काल वासनांचा शुभ्र चारा आहे. अशी गिधाडे ही मृत्यूचे चिंतन वाटतात. दैवी अस्तित्व, प्रार्थनांचे सामर्थ्य यावरचा कवीचा विश्वासही दिसतो. मानवी मनात असणाऱ्या प्रचंड, न संपणाऱ्या वासनांचा 'शुभ्र चारा' त्यांच्या चोचीत आहे. पण या चाऱ्याचे उगमस्थान मात्र कवीच्या गोऱ्या आसमंत स्वरूप मिठीत आहे. वासनेला इथे उणेपण, दुय्यम स्थान न देता कवीने वासनांच अटळ अस्तित्वच सांगितले आहे.

'घर' या कवितेत एक वेगळीच पक्षी-प्रतिमा आली आहे.

शब्दांच्या अर्थांची ही
मज कधी न आली करूणा
ये डाळीसाठी तरिही
कुणी पंखमोडली मैना

(चं. प्र., 'घर', पृष्ठ ४८).

कवीची शब्दजाणीव येथे प्रकट होते आहे. प्रचलित भाषा कवीच्या अनुभूतीविश्वाला सार्थपणे अभिव्यक्त करण्यास अपूर्ण आहे. पण तरीही ही दुबळी भाषा कवीकडे येत रहाते. 'पंख मोडली मैना' ही अपुऱ्या दुबळ्या भाषेचे प्रतीक म्हणून येते.

'पाऊस' या कवितेत 'घुबड' हा पक्षी येतो. तो 'उपमान' म्हणून येतो. घुबडाची उपमा रक्तासाठी आली आहे. सजणाला झिडकारून जाणाऱ्या सजणीला अडविताना कवी म्हणतो-

कुठे निघालीस बाई जीव घेऊन मुठीत
तुला गाठेल पाऊस पूल तुटल्या घाटात
सुख दु:खाचे सांगाती रक्त होईल पारखे
आणि रडेल मागुनी तेच घुबडासारखे . . . .

(चं. प्र., 'पाऊस', पृष्ठ १७१).

सजणाला ठोकरून गेलेल्या 'स्त्री'ला तिचेच रक्त जे तिच्या सुखदु:खाचे सांगाती आहे. तेच पारखे होईल आणि तेच रक्त नंतर घुबडासारखे रडेल. 'घुबडाचे अशुभ ओरडणे' वाचकाला परिचित असते पण 'घुबडासारखे रडणे' ही कविकल्पना वाचकाला विचार करायला लावते.

अशा तऱ्हेने आपण येथे ग्रेस यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टीचे स्थूल वर्गीकरण करून त्या प्रतिमांचे अर्थाकलन करून घेतले आणि त्यांच्या प्रतिमासृष्टीचे व्यापक स्वरूप अभ्यासले. आता आपण ग्रेस यांच्या कवितेतील दु:ख जाणीवेचे स्वरूप जाणून घेणार आहोत.

## ग्रेस यांच्या कवितेतील दु:खजाणीव

काट्यावाचून गुलाब नाही, दु:खावाचून मानव नाही. या सुविचाराप्रमाणे प्रत्येक मानवास दु:ख असतेच. पण त्या दु:खाच्या तऱ्हा, पैलू, विषय वेगवेगळे असणार. भावनिक दु:ख, सामाजिक दु:ख, लौकिक-पारलौकिक दु:ख अशी दु:खाची विषयसंदर्भानुसार प्रत-प्रकार ठरू शकते. तरीही मृत्यूचे दु:ख, शरीरवेदनेचे दु:ख, मुक्तीचा, मोक्षाचा आनंद अशा प्रकारच्या सुख-दु:खाच्या जाणीवा वैश्विक पातळीवर साधारणत: सारख्याच स्वरूपाच्या असतात. त्याविषयी तीव्र मतभेद असण्याचे कारण नाही. तरीही एखाद्या व्यक्तीबाबत ही सुख-दु:खाची जाणीव अथवा व्याख्या वेगळी असेल तर ठेचकाळल्यासारखे होते. ग्रेस यांच्या कविता वाचताना हेच घडते. त्यांच्या काव्यातून दिसणारे सुख आणि दु:ख 'वेगळे' आहे. त्याचे स्वरूप परस्परांच्या जागा घेताना दिसते. म्हणजे सुख दु:खाचे रूप घेऊन येते तर दु:ख सुखाचे रूप घेऊन येते.

ग्रेस यांच्या कवितेतील दु:ख

- मातृवियोगाचे दु:ख (आई जवळ नसणे, हवी तेव्हा न मिळणे).
- आईच्या मृत्यूचे दु:ख.
- निर्मितीनाशाचे दु:ख.
- अतृप्तीचे दु:ख लैंगिक देहवासनेच्या अतृप्तीचे दु:ख.
- अनुवंशहीन असल्याचे दु:ख, पोरकेपणाचे दु:ख.

अशा स्वरूपाचे आहे.

आईच्या वियोगाचे दु:ख कवीच्या संपूर्ण जीवनावर, मनावर उदास धुक्याप्रमाणे आच्छादून राहिले आहे. ही दु:ख जाणीव कवीला कधीच स्मृतीआड करता येत नाही. आईविषयक दु:ख दोन प्रकारचे आहे. पहिला प्रकार म्हणजे आई हवी तेव्हा उभी न मिळणे. आई घरात नसणे, आई जवळ नसणे याचे दु:ख आणि दुसरा प्रकार म्हणजे आईचा मृत्यू ही दु:खद घटना.

आई घरात नसणे, आईने घराबाहेर खूप काळ राहणे, आई मन भरून वाट्याला न येणे, हवी असेल तेंव्हा आई न मिळणे यामुळे कवी दु:खी होतो. अशा प्रकारचे दु:ख कवीला पोरके, बापुडवाणे बनविते.

आईच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली पोकळी कधीच भरून आली नाही. आईच्या मृत्यूचे दु:ख ग्रेस यांच्या सर्व संवेदनातून पूर्ण भरून गेले आहे. मातृप्रेमाची आस, आईच्या अस्तित्वाचा आग्रह, आईचा विरह अशा तिहेरी तणावात कवी व्याकुळ आणि दु:खमग्न झाला आहे. या दु:खाचा जन्म घरी आलेला आहे. म्हणजे कवी = दु:ख, कवीचा जन्म = घरी दु:खाचा जन्म असे कवीला वाटते. म्हणून कवी म्हणतो,

दु:खाचा जन्म घरा ये
आभाळ सोडता घुंगुर बनतो तारा . . . .

(सं. क., 'माहेर', पृष्ठ २२).

या कवितेत आईला माहेर नसणे ही आईच्या पोरकेपणाची अनाथपणाची जाणीव कवीला आहे. वैरी या कवितेतही कवीला आईच्या डोळ्यातील कारूण्य आठवते. आईचे दु:ख वाऱ्याने हलणाऱ्या सुनसान रानाप्रमाणे आहे.

वाऱ्याने हले रान
दिसे सुनसान
हृदय गहिवरले
गायीचे डोळे करूण उभे की,
सांज निळाईतले

(सं. क., 'वैरी', पृष्ठ ४८).

असे आईने सोसलेले दु:ख आणखी काही कवितातून येते. त्या कविता पुढीलप्रमाणे -

मी जेव्हा अंतिम वासनांच्या प्रार्थना म्हणू लागतो,
आत्मलीन पाचोळ्याच्या साक्षीने;
तेव्हा तुझ्या लोचनातील अतर्क्य दु:खातून,
चंद्रकालीन शिवालयाची बर्फाच्छादित शिखरे
प्रार्थनांच्या अंधारात शिरत असतात.

(सं. क., 'प्रार्थना', पृष्ठ ४८).

मी अशांत सावलीने चालणारा
भावसंमोहन जळत आहे माझे
मावळतीच्या निवान्त क्षितिजावर . . . .
दु:खाचे अभिजात शिल्प उभारशील का ?
पारदर्शक मरणात.

(सं. क., 'अंगाईपण', पृष्ठ ५७).

'प्रार्थना' कवितेतील आईने सोसलेल्या दु:खाला कवीने एक पावित्र्य आणि उंची दिली आहे. चंद्रकालीन शिवालयाच्या शिखराप्रमाणे आईच्या डोळ्यातील दु:ख कवीला दिसते. तर 'अंगाईपण' या कवितेत कवी आईलाच रात्री झोप यावी म्हणून कथा सांगणारा मुलगा झाला आहे. कारण त्याची पोरकी आईच त्याला व्याकुळ, आर्त आणि संध्याकाळच्या उदास दु:खासारखी दिसते आहे. आपल्या आईच्या दु:खाची प्रत, पावित्र्य आणि अभिजातपण कवीला नेमके माहिती आहे. म्हणून तो 'दु:खाचे अभिजात शिल्प' असे त्याचे वर्णन करतो.

आईने सोसलेले दु:ख कवीला वैभवी वाटते. कवी म्हणतो,

असा खिन्न होतो कशाने सदा मी
तुझ्या यातनांचे मला वैभव

आई हे दु:ख भोगताना कवी मात्र खिन्न होतो.

आईचा विरह, आईचा मृत्यू ही कवीला सतत दु:खी करणारी बाब आहे. या दु:खाला विस्मृतीचे वरदान नाही. म्हणूनच आईचा मृत्यू कवी क्षणभरासाठीही विसरू शकत नाही म्हणून कवी म्हणतो.

स्तोत्रात इंद्रिये अवघी, गुणगुणती दु:ख कुणाचे
हे सरता संपत नाही चांदणे तुझ्या स्मरणाचे

(चं. प्र., 'निष्पर्ण तरूंची राई', पृष्ठ ११४).

आईविना पोरके वाटणारे कवी मन म्हणते,

नाहीच कुणी अपुले रे
प्राणांवर नभ धरणारे

दिक्काल धुक्याच्या वेळी

हृद्याला स्पंदविणारे . . . .

(सं. क., 'दु:ख घराला आले', पृष्ठ ३५).

आईच्या मृत्यूमुळे कवी बालपण हरवून बसला आहे. तो म्हणतो,

- ती गेली तेंव्हा रिमझिम

पाऊस निनादत होता

- ती आई होती म्हणुनी

घनव्याकुळ मी ही रडलो

- अंगणात गमले मजला

संपले बालपण माझे

(चं. प्र., 'आई : १', पृष्ठ ३७).

आईचा मृत्यू ही एक अटळ घटना आहे पण आईचे घरात नसणे आणि त्या नसण्याचे कारण ज्ञात-अज्ञात असणे यावरही कवी चिंतन करून कविता लिहितो आहे. याबद्दल कवी लिहितो,

छायांनी नभ शून्य शून्य दिसते निष्कासिनी तू कुठे ?

आता दु:ख भरास ये, फुलत ये, या नष्टनीडातले

(चं. प्र., 'वर्षा', पृष्ठ १०९).

घरटे सोडूनी गेलेली 'निष्कासिनी' इथे कवितेत आली आहे आणि तिच्या जाण्याने घरट्यात दु:ख भरात येते. फुलत येते. घर सोडून आईने कुठे तरी (?) निघून जाणे हेच बाळाचे दु:ख आहे.

गावातल्या आठवणी या कवितेत 'आई चोरून देऊळात गेली' असे कवी वर्णन करतो तो म्हणतो,

चोरून अमेच्या रात्री

देऊळात आई गेली

अन् बालपणावर माझ्या

चंद्राची राख पसरली

(चं. प्र., 'गावातल्या आठवणी', पृष्ठ ४९).

आईला अमावस्येला रात्री चोरून देवळात जाण्याचे काय कारण 'देऊळ' हे इथे कशाचे प्रतीक म्हणून आले आहे ? जर आई देऊळात गेली असेल तर मग 'चोरून' का गेली ? ''आणि कवीच्या बालपणावर चंद्राची राख पसरली''. या शब्दातून आईच्या चोरून जाण्यामागील हेतू थोडासा उमगू लागतो.

अशा कवितातून कवीला आईच्या विरहाचे दु:ख आर्तव्याकुळ करताना दिसते. संपूर्ण संध्याकालीन चंद्रमाधवीचा प्रदेश कवीच्या आईवेगळ्या पोरकेपणाने कातर झाला आहे. आईवेगळ्या जीवाचा हा आकांत वाचकांना अस्वस्थ करून सोडतो.

ग्रेस यांच्या कवितेतून दु:खाच्या अनेक तऱ्हा दिसून येतात. त्यामध्ये दु:खाची अटळता, दु:खाचा स्वीकार, दु:खाचेच आकर्षण, दु:खावरच प्रेम करणे अशी कवीची भूमिका दिसते. दु:खाच्या या तऱ्हा पुढीलप्रमाणे,

तुझ्या कृपेच्या दु:खामागे
येईन मी अनवाणी

(सं. क., 'लाटांचे देऊळ', पृष्ठ २३).

विदग्ध प्रतिमेपरी सगुण ऊन झेलू नको
तुझे अमल दु:ख दे मजसि तेवढा जोगवा

(सं. क., 'दुपार', पृष्ठ ३९).

माझ्या संमतीशिवाय कोण टाकून जातो झोळीत
त्यांना दिलासा देणारे दु:ख

(सं. क., 'घोडे', पृष्ठ ६१).

दु:खाची भर्जरी तिरीप डोळ्यावर चालून
आली की मी ही एखादा
उखाणा घालतो

(चं. प्र., 'आत्मनिवेदन').

दु:ख आकर्षक होते जगून दाखविले की

(चं. प्र., 'दु:ख', पृष्ठ १४५).

वरील कवितांच्या ओळींवरून असे लक्षात येते की, कवीला दु:खाबद्दल एक प्रकारचे आकर्षण आहे. त्याची दु:खाची संकल्पनाही सर्वसामान्यांपेक्षा वेगळी आणि थोडीशी गोंधळात टाकणारी आहे. कारण कवी कृपेलाच दु:ख म्हणतो. दु:खाला 'अमल' हे विशेषण लावतो. असे शुभ्र दु:ख 'जोगवा' म्हणून मागतो. कवीचे हे असे 'दु:ख मागून घेणे' महाभारतातील कुंतीची आठवण करून देते. कुंती कृष्णाला सतत दु:खच मागते. त्याचे कारणही ती सांगते, ''दु:खातच मानवाला सतत ईश्वराची आठवण होते. मला सतत दु:ख दे म्हणजे मी सतत ईश्वराची (कृष्णाची-ईश्वराची) आठवण करेन''. कुंतीच्या दु:ख मागण्याच्या इच्छेमागे ईश्वरभक्ती होती. पण ग्रेस दु:खाचा जोगवा का मागतात ? याचे स्पष्टीकरण कवितेत कुठेच येत नाही.

ग्रेस यांना दु:ख क्लेशकारक वाटत नसावे असे वाटते. म्हणून तर 'दु:खाची भर्जरी तिरीप' असे दु:खाचे सौंदर्य ते वर्णन करतात. ही दु:खाची भर्जरी तिरीप त्यांना मिष्किल करते आणि चटकन ते एखादा 'उखाणा' घालतात. ग्रेस यांना दु:ख विरूप, कष्टप्रद वाटत नाही. दु:ख जगणेच त्यांना आकर्षक वाटते. त्यांची ही आगळी वेगळी दु:ख जाणीव व्यक्त करणाऱ्या काही कविता पुढीलप्रमाणे -

नाही दु:खाचा आडोसा नको सुखाची चाहूल
झाड वाढता वाढता त्याने होऊ नये फूल

(चं. प्र., 'राखण', पृष्ठ ११).

दु:ख दिले त्याने तोच
दान मागणार

(चं. प्र., 'काळा घोडेस्वार', पृष्ठ ५२).

कोकिळेच्या स्वप्नात वीज आली
आज माझ्या दु:खास मीच वाली

(चं. प्र., 'झोका', पृष्ठ ५५).

हे दु:ख कुण्या जन्माचे
क्षितिजाला बिलगुन आले
स्वप्नात पुन्हा सापडले
मेघांचे भगवे शेले

(चं. प्र., 'बहर', पृष्ठ ८८).

गळ्यात शब्द गोठले

अशांतता दिसे घनी

दु:ख बांधुनी असे

क्षितीज झाकिले कुणी ?

(चं. प्र., 'मंदीरे सुनी सुनी', पृष्ठ १५२).

ग्रेस यांना दु:खाला डावलायचे नाही. त्यासाठी कुणाला तळतळाट द्यायचा नाही. कुणाला जबाबदारही धरायचे नाही. दु:ख हे अटळ प्राक्तन म्हणून स्वत:च दु:खाला ते वाली होतात. हे दु:ख क्षितीजाप्रमाणे सर्वव्यापी आहे. त्याने कवीचे जीवनही व्यापले आहे. पण तरीही ग्रेस यांची ही दु:खजाणीव मात्र क्षितीजाप्रमाणे विश्वपातळीवर वैश्विक न बनता ती कवीच्या व्यक्तिगत भावविश्वाच्या पातळीवरच राहते ही या दु:खाची मर्यादा आहे.

ग्रेस यांच्या दु:खजाणीवेचे स्वरूप जाणून घेतल्यानंतर आता आपण ग्रेस यांचे निर्मितीविषयक म्हणजेच काव्यनिर्मिती बद्दलचे विचार जाणून घेणार आहोत.

## काव्यनिर्मितीविषयी ग्रेस यांचे विचार

'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या काव्यसंग्रहातील काही कवितातून ग्रेस यांचे निर्मितीविषयक विचार व्यक्त झालेले आहेत. तसेच स्वत:ची निर्मितीशीलता, निर्मितीकेंद्र, निर्मितीप्रेरणा आणि निर्मितीचे अंतर्बाह्य स्वरूप निश्चित करणाऱ्या बाबींचे विवेचनही ग्रेस यांनी आपल्या मुलाखतीतून केले आहे. त्यांच्या ललित निबंधातूनही त्यांच्या काव्यनिर्मितीविषयी संदर्भ येतात.

ग्रेस यांच्या पहिल्या कवितासंग्रहापासून म्हणजे 'संध्याकाळच्या कविता' या'शिर्षकापासूनच या संध्याकाळचा नि वाचकांचा परिचय होत जातो. मग ही संध्याकाळ 'दुपार' या कवितेतही येते. संध्यासमय म्हणजे दिवसाचा शेवट आणि रात्रीचा प्रारंभ. ही कातर संधीप्रकाशाची वेळच कवीला अस्वस्थ करते. त्यांचे अर्थकाहूर मन अलगद भरून येऊन सांजप्रवाहात डुबून जाते. अशी ही संध्याकाळ कवी ग्रेस यांच्या निर्मितीशीलतेचा घटक आहे. याबाबत ग्रेस म्हणतात, ''संध्याकाळ म्हणजे अर्धा आंधळा समय. हा समय आभासाच्या थव्यांनी भरून येणारा, अबोध उदासीची छाया असलेला, एकटेपणाची खोल मुद्रा उमटविणारा आहे. दिवस आणि रात्रीच्या संधीकालाचे निसर्गतत्व माझ्या कवितेसाठी निर्मितिशील घटक बनले आहे. अनंत संध्यावेळा एकवटून एकच एक दीर्घ 'सांध्यपर्व' बनावं अशी माझी कविता आहे. जीवनसत्ता, निसर्गसत्त, सौंदर्यसत्ता या तीन सत्ता मी मानतो. त्यांच्या अस्तित्वाच्या सारणीतून निसर्गाचा जो घटक माझ्या वाट्याला आला आहे तो आहे संधीकाल ! हा संधीकाल माझ्या अंतर्थामाच्या हृद्याचा ठोका आहे''.[१५]

सायंकाळचा कातर समय सामान्य माणसाला सुद्धा अस्वस्थ बनवतो. ग्रेस तर संवेदनाशील प्रतिभावंत कवी आहे. संध्याकाळचे उदास गहिरेपण कवीला अस्वस्थ करते. मन चिरत जाणारे एकाकी दु:ख व्याकुळ मन आकांत मांडते.

असे असूनही त्यांच्या काही कविता उदा. 'दुपार', दुपारचे ऊनअशा कवितातूनही संध्याकाळ भेटते. याचे कारण सांगताना ग्रेस म्हणतात, ''याचा अर्थ मी इतर काळांना स्पर्श केला नाही असे नाही. दुपारच्या कवितेत दुपारचे वर्णन आहे. पण त्यावर, त्या संपूर्ण वृत्तीवर, संध्याकाळच्या उदासीन वृत्तीचा प्रभाव, वर्चस्व आहे. माझ्या दुपारच्या सावल्यांवर संध्याकाळ पसरलेली आहे. My poetry is sad evening rainbow माझ्या सांध्यपर्वाचे अनुषंग उदास आहेत. पण त्यात निराशा नाही.[१६]

"क्षणिक तोल आणि संध्यामग्न अनुभव यातच माझ्या बऱ्यावाईट निर्मितीचे बीज आहे".[१७]

या संध्याकाळचे महत्व त्यांच्या निर्मितीप्रक्रियेत किती मौल्यवान आणि अविभाज्य आहे हे यावरून कळते.

कलावंताला काव्यनिर्मितीसाठी एकांताची नितांत गरज असते असे त्यांचे आग्रही मत आहे. एकांत आणि निर्मिती यांचे नाते असते हे स्पष्ट करताना ग्रेस म्हणतात, "कलावंताला ज्या एकांताची आवश्यकता असते तो एकांत आणि निर्मिती यांचे अविभाज्य नाते आहे. तात्कालिक आत्मतत्वातील निर्मितीतत्वाची ओळख म्हणजे माझी कविता आहे. निर्मितीची अवस्था म्हणजे Creativity. Creativity is my life and its conviction is the character of my creativity".[१८]

ग्रेस यांना काव्यनिर्मितीसाठी एकांत अत्यावश्यक वाटतो. आत्मचिंतन आणि आत्मशोध एकांतात घेता येतो हे खरे असले तरी ग्रेस स्वतःच्या निर्मितीला अध्यात्मिक बैठकही देतात. म्हणूनच ते स्वतःच्या निर्मितीला 'तात्कालिक आत्मतत्वातील निर्मितीतत्वाची ओळख म्हणजे माझी कविता' असे म्हणतात.

ग्रेस त्यांच्या अंतरंगात उसळणाऱ्या भावकल्लोळाला आणि संभ्रमित मनःस्थितीला अर्जुनाच्या भांबावलेल्या स्थितीची उपमा देतात पण त्यांच्या अंतर्यामात जे भासचक्र आहे ते भासचक्र त्यांना गीतेमधील चक्रामध्ये जाणवते. म्हणून ते म्हणतात, "माझ्या अंतरंगातील भासचक्र व गीतेच्या ११ व्या अध्यायातले तेजोचक्र एकच आहे असे जाणवते".[१९]

ग्रेस यांची कविता अध्यात्मिक अनुभव एकसंधपणे व्यक्त करणारी नसली तरी त्यांच्या कवितांतून आत्मा, आत्मचिंतन, आत्मतत्व यांचे उल्लेख येतात.

त्यांच्या काव्यनिर्मितीचे स्वरूप वर्णन करणाऱ्या त्यांच्या कवितांच्या ओळी पुढीलप्रमाणे-

कधी क्षितीजावरून
मीच पसराव्या हाका
आणि उलट्या दिशेने
माझा शब्द व्हावा मुका

थेट ओसरीला येते
वेडे सागराचे पाणी
एका अंधारवेलीला
माझी लागतात गाणी.

(चं. प्र., 'वेळ', पृष्ठ १३).

एका क्षणापोटी, तुझा माझा जीव
नाही दुजाभाव
वाहणारे पाणी, तुझी गुणगुण
माझी रामधून

(चं. प्र., 'रामधून', पृष्ठ १२७).

येथे समाधी अवस्थेची झलक दिसते. तर रामूधन कवितेत 'नादब्रह्माचा साक्षात्कार' दिसून येतो. आत्मा परमात्मा यांच्या दुजाभाव नसतो. हा दुजाभाव नष्ट झाला की नादब्रह्माची धून ऐकू येते. असा अद्वैताचा अध्यात्मानुभव कवी येथे सांगतात.

निर्मिती संबंधी 'निर्मिती' या कवितेत ग्रेस निर्मितीच्या वेदना वर्णन करतात.

अशा लाघवी क्षणांना
माझ्या अहंतेचे टोक
शब्द फुटण्याच्या आधी
ऊर दुभंगते हाक.

(सं. क., 'निर्मिती', पृष्ठ १७).

ग्रेस यांचे निर्मिती संबंधीचे वेगळेच विचार 'पार्श्वभूमी' या कवितेत व्यक्त होताना दिसतात. कार्तिक महिन्यातील धुक्याच्या भुरभुरत्या संधीकालच्या संधीप्रकाशात कवीला जे निसर्गचित्र दिसले ते पाहून कवीच्या प्रतिभेला एक नवेच चित्र दिसून आले. कवीने त्याच निसर्गाच्या पार्श्वभूमीवर स्वत:च्या प्रतिभारूपी कुंचल्याने नवे चित्र रेखाटले. मूळच्या निसर्गाच्या वास्तव दृश्यातील आसमंत ढवळून काढून, डोंगर शिखरे मोडून काढून, झाडे सरकवावीत आणि तुटलेला पूल जोडून त्या चित्रात सुरूची झाडेही रेखाटावीत आणि सगळ्या चित्रालाच प्राचीन शिल्पाची पार्श्वभूमी द्यावी असे कवीला वाटते. ही निर्मितीची प्रक्रिया कवीमनात घडते.

एक हलकासा तरंग घेऊन मीही
ढवळून काढावा असमंत . . . .
ही शिखरे मोडावीत . . . .
ही झाडे सारावीत . . . .
हा पूल जोडावा . . . .
आणि नसलेल्या सुरूंच्या झाडांना
द्यावी एखाद्या प्राचीन शिल्पाची
पार्श्वभूमी.

(सं. क., 'पार्श्वभूमी', पृष्ठ १९).

ग्रेस यांची काव्यनिर्मिती ही अशीच आहे. तिला प्राचीन शिल्पांचे, पौराणिक कथा-दंतकथांचे संदर्भ आहेत. निसर्गाची वास्तव पार्श्वभूमी असून त्यांच्या कवितेत कवीची स्वप्ननिर्मित काल्पनिकता अद्‌भूतता आहे. वास्तव आणि स्वप्न या दोन नगरींना जोडणारा पूल म्हणजे ग्रेस यांची कविता आहे.

निर्मिती विषयी ग्रेस म्हणतात, ''मला आकाशातील वीज पाहिजे. श्रेष्ठ कलाकृतीच्या अर्थाचा आत्मसाक्षात्कार आपल्याला कधी होईल त्याची वाट पहायची असते. तो होतो एवढे सत्य मला माहित आहे''.[२०]

कलावंताची निर्मिती कोठून, कशातून निर्माण झाली आहे याबद्दल जी. ए. कुलकर्णी ग्रेस यांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात, ''ज्याला सबकॉन्शसनेस म्हणतो, दैनंदिन व्यावहारिक जीवनातील जागृतावस्था त्यातून ही कविता निर्माण झाली नाही. त्याचा उगम सबकॉन्शस्‌मध्ये स्वप्नात अगर स्वप्न व पूर्ण जाग यामधील संधीप्रकाशाची अशी जी एक 'कासया वेळ' असते, तिच्यात झालेल्या स्फोटात, झक्ककन चमकलेल्या प्रकाशरेषेत असते. मग तो प्राणक्षण सांभाळत कॉन्शसनेसच्या पायरीवर त्याभोवती शब्द उभे राहतात''.[२१]

स्वत:च्या निर्मितीबद्दल ग्रेस अधिकाधिक सांगताना दिसतात. स्वत:च्या निर्मितीचे बीज सांगताना ते म्हणतात, ''माझ्या अनेक कविता माझ्या अंगात येतात. अशा लिरिकल फिटस्. But there is a difference between lyrical fits and attacks . .

. Lyrical fits मध्ये देहजाणीव सखी असते तर Lyrical attacks मध्ये तीच सवत असते. There is no violence in lyrical fits''.[२२]

''प्रत्येक श्रेष्ठ निर्मितीच्या मुळाशी अंगसंगाच्या लघुमरणांची मालिका असते''.[२३]

काव्यनिर्मिती म्हणजे काय ? ''काव्यनिर्मिती म्हणजेच लघुमरण इंचाइंचाने होणारे प्रत्येक कविते गणिक''.[२४]

कोणतीही नवनिर्मिती करताना वेदना सोसाव्या लागतातच. ग्रेस यांच्या कवितेतून वेदना, दु:ख, करूणा, कातरता आणि भय अनुभवाला येते. काव्यनिर्मिती संबंधी अधिक बोलताना ते म्हणतात, ''केंव्हा तरी रात्री मला एकाएकी जाग येते. समोर साक्षात चित्रे दिसू लागतात. अगदी एकाएकी मी ती कागदावर उतरतो. आणि कमालीचा थकवा येऊन मग झोपून जातो''.[२५]

ग्रेस यांना त्यांच्या एक मित्राने काव्यनिर्मितीबद्दल छेडले असता, ग्रेस यांनी त्याला कळविले की, बरीवाईट कविता लिहितानाच नव्हे तर आस्वादतानाही मला अगदी ''बायॉलॉजिकल प्लेन'' वर जबर रिॲक्शन येते. 'पांढरे हत्ती' लिहिताना तर माझ्या रायटिंग टेबलाजवळच ते अरण्य निमूट बसलेले दिसले. . . . या रिॲक्शनचा उलगडा नीट शब्दात करणे कठीण . . . . माझे सगळे शरीर अगदी वाच्यार्थाने मला परागंदा होते. परदेशी होते की आणखी काही होते ते देवासच ठाऊक !''[२६]

स्वनिर्मितीबद्दलचे ग्रेस यांचे वरील स्वानुभवाचे विवेचन पाहिले की ग्रेसना Lyrical attacks येतात हे पटते.

**सारांश** - प्रबंधिकेच्या या प्रकरणात आपण ग्रेस यांची शब्दकळा कशी आहे याचा थोडक्यात अभ्यास केला. ग्रेस यांची भाषाशैली त्यांची पृथगात्म शैली विकसित करते, हे ही आपण पाहिले. नव्या जाणिवा, नवी प्रतीके, नव्या प्रतिमा आणि नवी शब्दजोडणी या वैशिष्ट्याबरोबरच नवीन विशेषण विशेष्याच्या जोड्या आपणास ग्रेस यांच्या भाषाशैलीतून पहावयास मिळाल्या. ग्रेस यांची शब्दजाणीव विलक्षण आहे. त्यामुळे त्यांचा वाचकवर्ग त्यांच्या कवितेतील अर्थापेक्षाही त्यांच्या काव्यभाषेवर अधिक मोहित होतो हेही आपण जाणून घेतले. ग्रेस यांच्या कवितेतून काही नवी संकल्पना नव्या क्रिया दर्शविणारे शब्द, क्रियापदे येतात असे त्यांच्या कवितांच्या अभ्यासातून लक्षात आले.

या प्रकरणात आपण 'संध्याकाळच्या कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या दोन काव्यसंग्रहातील प्रतिमांचे वर्गीकरण करून त्यांचा अभ्यास केला. या प्रतिमा अभ्यासताना आपणास काही प्रतीके प्रतिमा म्हणून तर काही प्रतिमा प्रतीके म्हणून येताना दिसतात. 'आई' हे मातृत्वाचे, वात्सल्याचे प्रतीक आहे. तरीही 'आई' ही जेंव्हा प्रतिमा म्हणून अवतरते. तेंव्हा ती अनेक अथच्छटा घेऊन येते. 'घोडा' हे अफाट कामवासनेचे, कामऊर्जेचे प्रतीक आहे पण काही ठिकाणी ते अनियंत्रित मोकाट सुटलेल्या मनाचे प्रतीक म्हणून येते.

'कावळा' हा पक्षी 'प्रतिमा' म्हणून येथे विचारात घ्यावा लागतो. तो जसा शुभशकुनाचे प्रतीक म्हणून येतो तसेच मृत्यूची जाणीव म्हणनही कवितेत येत राहतो.

ग्रेस यांच्या कवितेतून स्त्रीदेहाचे संदर्भ येतात. विशेषत: 'स्तन' या अवयवाचा उल्लेख आधिक्याने येतो. 'स्तन' ही प्रतिमा वात्सल्य, प्रेम, ममत्व, शृंगार, दैवी वैभव, सौंदर्य आणि शिल्प यांचे सूचन, संदर्भ व आशय घेऊन येते.

ग्रेस हे दु:खावर प्रेम करणारे कवी आहेत. त्यामुळेच त्यांच्या कवितेतील 'दु:खजाणीव' अभ्यासणे आवश्यक होते. या प्रकरणात आपण त्याचाही अभ्यास केला आहे. त्यांच्या दु:खाचे कारण, प्रत, प्रकार आणि स्वरूप याचा शोध घेतला आहे.

ग्रेस हे साठोत्तर काळातील 'वेगळ्या वाटेने जाणारे' आत्ममग्न कवी असल्याने त्यांची काव्यनिर्मिती प्रक्रिया समजून घेणे अगत्याचे होते. यादृष्टीने या प्रकरणात आपण ग्रेस यांचे काव्यनिर्मितीविषयीचे विचार समजून घेतले आहेत.

या प्रकरणात ग्रेस यांच्या कवितांचा अभ्यास केल्यानंतर साहजिकच त्यांच्या कवितांविषयी, काव्यलेखनामागील प्रेरणा, प्रवृत्ती-वृत्ती, याविषयी मते मांडणे क्रमप्राप्त आहे. याचा विचार सहाव्या प्रकरणात करावयाचा आहे.

## संदर्भसूची


१) त्र्यं. वि. सरदेशमुख : 'धुके आणि शिल्प', पृष्ठ ७९, ८०.

२) त्र्यं. वि. सरदेशमुख : 'तत्रैव', पृष्ठ ८६, ८७.

३) डॉ. नंदकुमार मुलमुले : 'रचनेच्या खोल तळाशी', समाविष्ट ग्रंथ, द्वैमासिक कविता रती, अंक ५ वा, संपादक : पुरूषोत्तम पाटील, पृष्ठ १५.

४) ग्रेस : ग्रेस : मुलाखत, 'एकांत आणि एकाकीपणा हा माझ्या निर्मिती प्रक्रियेचा स्वभाव', डॉ. अक्षयकुमार काळे यांनी ग्रेस यांची घेतलेली मुलाखत, ग्रंथमाला खॅड एक पृष्ठ १०९.

५) ग्रेस : 'तत्रैव', पृष्ठ ११०.

६) ग्रेस : 'तत्रैव', पृष्ठ १०९.

७) ग्रेस : 'मितवा', पृष्ठ २२२.

८) ग्रेस : ग्रेस : मुलाखत, 'एकांत आणि एकाकीपणा हा माझ्या निर्मिती प्रक्रियेचा स्वभाव', डॉ. अक्षयकुमार काळे यांनी ग्रेस यांची घेतलेली मुलाखत, ग्रंथमाला खॅड एक पृष्ठ १०९.

९) ग्रेस : 'चर्चबेल', पृष्ठ ६२.

१०) ग्रेस : 'तत्रैव', पृष्ठ ६३.

११) ग्रेस : 'तत्रैव', पृष्ठ ६३.

१२) ग्रेस : ग्रेस : मुलाखत, 'एकांत आणि एकाकीपणा हा माझ्या निर्मिती प्रक्रियेचा स्वभाव', डॉ. अक्षयकुमार काळे यांनी ग्रेस यांची घेतलेली मुलाखत, ग्रंथमाला खॅड एक पृष्ठ १०९.

१३) डॉ. नंदकुमार मुलमुले : 'रचनेच्या खोल तळाशी', 'द्वैमासिक कविता-रती', जुलै-ऑगस्ट, २००१, अंक ५ वा, संपादक : पुरूषोत्तम पाटील, पृष्ठ १५.

१४) ग्रेस : ग्रेस : मुलाखत, 'एकांत आणि एकाकीपणा हा माझ्या निर्मिती प्रक्रियेचा स्वभाव', डॉ. अक्षयकुमार काळे यांनी ग्रेस यांची घेतलेली मुलाखत, ग्रंथमाला खॅड एक पृष्ठ ११५.

१५) ग्रेस : 'सांध्यपर्व' ध्वनीचित्रफीत, 'कवी ग्रेस यांचे मुक्तचिंतन : स्वत:च्या कवितेविषयी'.

१६) ग्रेस : 'तत्रैव'.

१७) ग्रेस : 'मितवा', पृष्ठ १७१.

१८) ग्रेस : 'सांध्यपर्व' ध्वनीचित्रफीत, 'कवी ग्रेस यांचे मुक्तचिंतन : स्वत:च्या कवितेविषयी'.

१९) ग्रेस : 'मितवा', पृष्ठ १६८.

२०) ग्रेस : 'मला द्वैती तत्वज्ञानाची तहान' दैनिक सकाळ, सप्तरंग, रविवार दि. २३ नोव्हें. १९९७, पृष्ठ ७.

२१) जी. ए. कुलकर्णी : जी. ए. कुलकर्णी यांनी ग्रेस यांना लिहिलेले पत्र, संदर्भ : 'मितवा' ले-ग्रेस, पृष्ठ १६८.

२२) ग्रेस : 'मितवा', पृष्ठ ७०, ७१.

२३) ग्रेस : 'तत्रैव', पृष्ठ ११०.

२४) ग्रेस : 'तत्रैव', पृष्ठ ११५.

२५) ग्रेस : 'काव्यावतरण : एक विचार', युगवाणी दिवाळी, १९७२.

२६) त्र्यं. वि. सरदेशमुख : 'धुके आणि शिल्प', पृष्ठ ८८.

****